संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
२२ जानेवारी २०२२
मूल्य रु. ४०
(एकूण पृष्ठे : ४४)



## साहित्याचे नोबेल स्वीकारताना केलेले भाषण
अब्दुल रझाक गुरनाह

# डेस्मंड टुटू यांचं स्मरण

डेस्मंड टुटू यांच्या निधनाने मी दुःखी झालोच असतो. कारण, त्यांच्या देशात आणि इतर देशांमध्येसुद्धा नैतिक अधिकार प्राप्त झालेले ते बहुधा शेवटची व्यक्ती असावेत. ते दक्षिण आफ्रिकेच्या सदसदविवेकबुद्धीचं प्रतीक होते, त्यांनी वर्णद्वेष्ट्या राजवटीमधील वंशवादी क्रौर्याचा थेट सामना केला होता, आणि या राजवटीची समाप्ती झाल्यानंतर आफ्रिकन नॅशनल काँग्रेसकडून चालवल्या जाणाऱ्या सरकारमधील भ्रष्टाचार व साट्यालोट्याचे व्यवहार, यांवरही त्यांनी उघडपणे टीका केली. ज्यू वसाहती उभ्या करणाऱ्यांनी व इस्रायली राज्यसंस्थेने पॅलेस्टिनी लोकांवर केलेले अन्याय असोत, किंवा म्यानमारमध्ये नोबेलविजेत्या आँग सान सू की यांच्या नेतृत्वाखालील राजवटीने रोहिंग्यांवर केलेले अन्याय असोत, प्रत्येक वेळी टुटू यांनी या घटनांचा विरोध केला. खुद्द त्यांच्या अँग्लिकन चर्चने समलिंगींविषयी दाखवलेल्या तिरस्काराचाही त्यांनी निषेध केला.

रामचंद्र गुहा





उद्याच्या जगात वावरण्याचा आत्मविश्वास!
MS-CIT मध्ये आता शिका चौथ्या औद्योगिक क्रांतीची ओळख
Big Data
Augmented Reality
Machine Learning
Virtual Reality
Artificial Intelligence
Internet of Things
Robotics
3D Printing
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
mscit.mkcl.org
करियर ओरिएंटेड 'क्लिक्' कोर्सेस
Tally Prime with GST
Advanced Excel
Digital Freelancing
C & C++ Programming
DTP Corel & Photoshop
Mobile Apps Development
Coding
IT Hardware & Networking
Retail Management
Internet of Things (IoT)
BFSI
IT for Teachers
MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
klic.mkcl.org
MKCL
ज्ञानदीप लावू जगी
www.mkcl.org
कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी स्पेशल बॅच !
नव्या वर्षात आजच प्रवेश घ्या डिजिटल करियरच्या जगात !
अधिक माहितीसाठी MS-CIT केंद्राशी संपर्क साधा. 8956537496

# अनुक्रम

Follow us :
weeklysadhana.in
facebook.com/weeklysadhana/
twitter.com/WeeklySadhana
YouTube/WeeklySadhana

४ **अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि द्वेषयुक्त अभिव्यक्ती**
... संपादकीय

७ **डेस्मंड टुटू यांचं स्मरण**
... रामचंद्र गुहा

१० **साहित्याचे नोबेल स्वीकारताना केलेले भाषण**
... अब्दुल रझाक गुरनाह

१४ **फॅब्युलस फेबल्स**
... स्वाती राजे

१८ **जत्रेतील नाटक**
... विभूतीभूषण बंद्योपाध्याय

२४ **शिमग्याची सोंगं**
... मल्हार अरणकल्ले

२८ **किसिंजर भेटीची अर्धशताब्दी**
... अभय दातार

३१ **पुसून गेलेल्या पाऊलखुणा**
... दत्तप्रसाद दाभोळकर

३४ **बारा वर्षांपूर्वीचा युवा अभिव्यक्ती अंक**
... विनोद शिरसाठ

३७ **माझे शिक्षण, माझी जबाबदारी**
... अजय काळे

४0 **प्रतिसाद**
... डॉ.विश्वनाथ भालेराव, बाळकृष्ण शिंदे,
... विलास भांदिर्गे, गोविंद काजरोळकर

संस्थापकसंपादक: साने गुरुजी
Date of issue
२२ जानेवारी २०२२
वर्ष ७४ / अंक- २३

संपादक :
विनोद शिरसाठ
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक, अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव, रझिया पटेल

मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
व्यवस्थापक आणि अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **विनायक भंडारी**

'साधना' हे साप्ताहिकमालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, चंद्रशेखर जोशी, श्री.जे.प्रिंटर्स प्रा.लि. १४१६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 / Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तकविक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एकवर्षांसाठी : ९०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १८०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २७०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा वरील QR कोड स्कॅन करून, अथवा साधना साप्ताहिक, बचत खाते **क्र.60025586634, IFSC MAHB 0000001, बँकऑफमहाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी. आणि मग नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

संपादकीय

# अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि द्वेषयुक्त अभिव्यक्ती

डिसेंबर अखेरीस उत्तराखंड राज्यातील हरिद्वार येथे जी धर्मसंसद झाली तिचा उल्लेख सनातन, वैदिक, हिंदू यांपैकी एक वा अधिक नावाने केला जातो आहे. तिथे उपस्थित साधू व साध्वी यांनी या देशातील मुस्लिम, ख्रिश्चन व शीख या तिन्ही धर्मांच्या विरोधात आणि 'सर्व धर्मांचा मी प्रवक्ता आहे' असे म्हणणाऱ्या महात्मा गांधी यांच्या विरोधात प्रचंड आक्षेपार्ह भाषणे केली, अक्षरशः शिवीगाळ केली. आणि त्याच दरम्यान दिल्ली आणि छत्तीसगडची राजधानी रायपूर या दोन ठिकाणी तशाच कार्यक्रमांत त्याच प्रकारची भाषणे झाली. या संदर्भात ८ जानेवारीच्या अंकातील याच स्तंभात सविस्तर लिहिले आहे. त्या घटनांच्या संदर्भात त्यानंतरच्या दोन आठवड्यांत काय झाले, यांवर दृष्टिक्षेप टाकला तर त्या धर्मसंसदेमागचा हात आणि मेंदू कुठे आहे हे अधिक चांगले स्पष्ट होईल.

ती द्वेषयुक्त भाषणे झाली त्याला आता जवळपास एक महिना झाला आहे. यावर स्थानिक पातळीवर काही तक्रारी दाखल झाल्या आहेत. पंतप्रधान व केंद्रीय गृहमंत्री यांनी एकही विधान केलेले नाही. त्या भाषणांच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करावा अशी विनंती देशभरातील अनेक वकील, निवृत्त न्यायाधीश व अन्य क्षेत्रांतील मान्यवरांनी केली आहे. त्याबाबत सर्वोच्च न्यालयाने १२ जानेवारीला असा निर्णय दिला आहे की, आणखी दहा दिवसांनी यावर सुनावणी घेता येईल. दरम्यान राज्य सरकारांकडून स्पष्टीकरण मागवण्यात येईल. मात्र तोपर्यंत उत्तर भारतात आणखी काही ठिकाणी तशाच धर्मसंसदा होणार आहेत, त्याचे काय? या प्रश्नांवर सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, तिथे तशी काही वक्तव्ये झाली तर स्थानिक पातळीवर तक्रारी दाखल करा.

उत्तराखंड राज्यात भाजपचे सरकार असल्याने तिथे तक्रार दाखल करून घेण्याव्यतिरिक्त काही कारवाई झाल्याचे पुढे आलेले नाही. छत्तीसगडमध्ये मात्र काँग्रेसचे सरकार असल्याने, रायपूर येथील धार्मिक कार्यक्रमात केलेल्या वादग्रस्त वक्तव्यांसाठी कालीचरण महाराज या व्यक्तीला अटक करण्याची कार्यवाही झाली आहे. रायपूर पोलिसांनी कालीचरणची चौकशी करून त्याला महाराष्ट्र पोलिसांच्या हवाली केले आहे, कारण महाराष्ट्रात तशाच प्रकारची वक्तव्ये मागील महिन्यात कालीचरणने केल्याच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत. आता हा साधू वर्धा पोलिसांच्या ताब्यात असून, त्याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

यातील आश्चर्य असे की, रायपूरमध्ये कालीचरण विरोधात तक्रार दाखल झाल्यावर छत्तीसगड पोलीस त्याचा तपास घेऊ लागले तेव्हा हा महाराज मध्य प्रदेश या शेजारच्या राज्यात पळून गेला, कारण तिथे भाजप सरकार आहे. हे ओळखूनच, मध्य प्रदेश सरकारला सुगावा लागू न देता छत्तीसगड पोलिसांनी एका रात्री अचानक छापा टाकून आडबाजूला लपून बसलेल्या या महाराजाला अटक केली. त्यावर मध्य

प्रदेशचे गृहमंत्री नरोत्तम मिश्रा यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली. ती काय तर, आंतरराज्य प्रोटोकॉलचा भंग करून ही कारवाई का केली? 'संघराज्य व्यवस्थेला तडा देण्याचा हा प्रकार आहे,' असेही हे नरोत्तम म्हणाले आहेत. वस्तुतः 'गांधीजी हे तुमच्यासाठी प्रतीक असतील, पण आमच्या ते हृदयात आहेत', असे वक्तव्य पंतप्रधान मोदी यांनी देशाच्या संसदेत आणि जाहीर सभेतही अनेक वेळा केले आहे. भाजपने स्वातंत्र्य लढ्यातील बहुतांश काँग्रेस नेत्यांना पूर्णतः निकालात काढले आहे, मात्र गांधीजींना परम आदरणीय मानण्याचा जप (रणनीती म्हणून!) चालू ठेवला आहे. त्यामुळे तरी, कालीचरणला अटक झाल्याची बातमी आल्यावर नरोत्तम यांनी आनंद व्यक्त करायला हवा होता. कारण गांधीजींना अभद्र शिव्या देऊन, 'त्यांना ठार केले म्हणून मी नथुरामला वंदन करतो' असे वक्तव्य कालीचरणने केले आहे. 'कालीचरणला अटक केली हे स्वागतार्ह आहे, मात्र छत्तीसगड पोलिसांनी प्रोटोकॉल पाळायला हवे होते, ते पाळले नाहीत म्हणून त्यांच्यावरही कारवाई करायला हवी' असे हे गृहमंत्री म्हणाले असते तर नैतिक व कायदेशीर आदर्शांचा पुतळा म्हणून हे गृहमंत्री मोठ्या सन्मानास पात्र ठरले असते.

मात्र छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी जेव्हा असा सवाल केला की, 'गांधींना मारले ते योग्य केले असे म्हणणाऱ्याला आम्ही अटक केली, याचा मध्य प्रदेशाच्या गृहमंत्र्यांना आनंद झालेला आहे की नाही?' तेव्हा मात्र नरोत्तम यांचा नाईलाज झाला आणि मग 'तेही चूक आणि हेही चूक' असे ते कसेबसे म्हणाले. म्हणजे ते आक्षेपार्ह भाषण करणे आणि प्रोटोकॉलचे पालन न करणे या दोन्ही चुका एकाच प्रकारच्या किंवा सारख्याच आक्षेपार्ह, असा त्यांचा अर्थ. वस्तुतः त्यांना इतकीच जर नैतिकतेची व कायद्याच्या संकेतांची चाड असती तर ते असेही म्हणू शकले असते की, 'छत्तीसगड पोलिसांनी इतक्या दूरवर येण्याची गरजच नव्हती, त्यांनी आम्हाला कळवले असते तर आम्हीच कालीचा शोध घेऊन त्याला त्यांच्या हवाली केले असते. किंवा आम्हाला न सांगता छत्तीसगड पोलीस आले याचाच अर्थ आम्ही त्यांच्या विश्वासाला पात्र ठरलो नाही, याचे आम्हाला दुःख होते आहे.'

आता देशातील सर्वांत मोठे राज्य असलेल्या उत्तर प्रदेशातील मोठे उदाहरण पाहू. तिथे पुढील महिन्यात विधानसभा निवडणुका होणार आहेत. त्यामुळे नेहमीपेक्षा बरीच जास्त घुसळण चालू आहे. उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशवप्रसाद मौर्य यांची मुलाखत गेल्या आठवड्यात बीबीसी हिंदीने आयोजित केली होती. आधी मोठ्या समजदारीने (आम्ही फार शहाजोग आहोत अशा आविर्भावात), नंतर मोठ्या आवेशाने (विरोधक किती देशविघातक आहेत हे सांगताना) बोलत असलेले हे महाशय धर्मसंसद या विषयावरील प्रश्न व उपप्रश्न आल्यावर अक्षरशः तीन चार मिनिटांत संयम गमावून बसले- इतका की, बोलणे थांबवले, माईक काढून टाकला आणि सुरक्षाकर्मीला सांगून मुलाखतकर्त्याचा मास्क हटवला, कॅमेऱ्यातून व्हिडिओ डिलीट करून टाकला. त्यांचा सुरक्षा कर्मचारी इतका हुशार होता की, तो व्हिडिओ दोन ठिकाणी असतो हे त्याला माहीत होते, म्हणून दोन्हीकडचा डिलीट केला. पण खूप जास्त हुशार नव्हता, कारण दोन्हींकडचा व्हिडिओ डिलीट केला तरी एका छोट्या चीपमधून तो परत मिळवता येतो, हे त्याला बिचाऱ्याला माहीत नव्हते. त्यामुळे तो व्हिडिओ परत मिळवता आला आणि बीबीसीने जगभर पाहता येईल, अशी व्यवस्था केली. अर्थात, केशवप्रसाद इतके वाईट वागले की, त्यांनी बीबीसी प्रतिनिधींना धमकावून त्यांच्या कॅमेऱ्यातून तो व्हिडिओ जबरदस्तीने काढायला लावला. मात्र इतकेही जास्त वाईट वागले नाहीत की, तो कॅमेरा फोडून तोडून टाकला किंवा जप्त केला वा पळवून नेला. पुढे ते तसे करणारच नाहीत, असे नाही. पण तूर्त इतके वाईट वागले नाहीत याचे समाधान मानायलाच हवे. अन्यथा तो व्हिडिओ जगाला पाहायला मिळाला नसता, केवळ लिखित बातम्यांवर अवलंबून नेमके काय घडले आणि त्यातील खरे-खोटे किती याचे अंदाज बांधावे लागले असते.

तर आता जगभरात कुठेही पाहता येतो असा तो व्हिडिओ बारा मिनिटांचा आहे. त्यात मुलाखतीला सुरुवात करण्यापासून त्यांनी माईक काढून टाकण्यापर्यंतचे सर्व चित्रण व्यवस्थित पाहता/ऐकता येते आहे. त्यात त्यांची वर सांगितलेली तिन्ही रुपे दिसत आहेत. बीबीसी प्रतिनिधीने पहिला प्रश्न विचारला, निवडणुकीची तयारी काय म्हणते आहे? यावर मोठ्या प्रसन्नतेने व शहाजोगपणाने ते उत्तर देतात, मोदीजींनी त्यांना निवडणुकीपेक्षा देशसेवा महत्त्वाची आहे, हे कसे सांगितले आहे, याबाबत भाषण करण्याचाच पवित्रा ते घेतात. मग दुसरा प्रश्न विचारला जातो की, अखिलेश यादव असे म्हणताहेत की 'या निवडणुकीत भाजप खूप पैसा ओतत आहे, आम्हा विरोधी पक्षांकडे तितका पैसा नाही' याबाबत तुम्ही

काय सांगाल? त्यावर ते तुच्छतेने उत्तर देऊ लागतात आणि अखिलेश, त्यांचे नेते व कार्यकर्ते कसे माफियाशी जोडलेले आहेत, ते कसे दंगे घडवून आणतात हे सांगायला लागतात. त्याचवेळी ते असेही म्हणतात की, कारसेवकांनी बाबरी मशीद पाडली आणि त्यांच्यावर तत्कालीन मुख्यमंत्री कल्याणसिंह यांनी कारवाई केली नाही म्हणून, त्यांचा मृत्यू झाला तेव्हा त्यांच्या शोकसमाचाराला हे अखिलेश गेले नाहीत. ते विशिष्ट समाजाचे केवळ तुष्टीकरण करतात. मोहम्मद आझमपासून मोहम्मद आली जीनांपर्यंतच्या लोकांचे तुष्टीकरण. तिसरा प्रश्न येतो, तुम्ही उत्तर प्रदेश निवडणुकीसाठी एक जाहिरात केली आहे, तिच्यात काही माफियांची नावे आहेत, ती सर्व मुस्लिमांची का आहेत, त्यात विकास दुबे या माफियाचे नाव का नाही टाकले? या प्रश्नावर, केशवप्रसाद यांचा संयम ढळतो आणि कायदा आपले काम करेल, अशा लाईनवर ते आक्रमक होतात. त्यालाच जोडून मग चौथा प्रश्न येतो, उत्तराखंड येथे धर्मसंसद झाली, तिथल्या विखारी भाषणांबद्दल पंतप्रधान व भाजपनेते गप्प का राहिले, त्यामुळे तसे वर्तन करणाऱ्यांना बळ मिळत नाही का?

हा प्रश्न आणि त्यावरील उपप्रश्न यावर मौर्य यांचा तोल मोठ्या गतीने ढळत जातो. धर्मसंसदेत साधूंनी काय बोलावे हा त्यांचा प्रश्न आहे, त्यांच्या जागेवर ते बरोबर असतील, त्यांना हवे ते बोलण्याचा अधिकार आहे, तुम्हाला केवळ हिंदू धर्मातील साधूच दिसतात का, तुम्ही अन्य धर्मातील अशा भाषणांबद्दल का बोलत नाही, ३७० रद्द होण्यापूर्वी काश्मीरमधील हिंदूंची काय स्थिती होती, भाजपला तुमच्या प्रमाणपत्राची गरज नाही, तुम्ही पत्रकार नसून कोणाचे तरी एजंट आहात, तुम्ही मुलाखतीसाठीचे प्रश्न आधीच का पाठवले नाहीत, तुम्ही निवडणुकीबाबत प्रश्न का विचारत नाही... इत्यादी इत्यादी वाक्ताडन त्यांनी अखेरच्या तीन-चार मिनिटांत केले आहे. आणि मग बोलणे थांबवून, माईक काढून टाकणे इथपर्यंतचे चित्रण त्या व्हिडिओमध्ये आहे.

खरे तर धर्मसंसद आणि कालीचरण व तत्सम महाराज यांच्याकडे भंपक म्हणून दुर्लक्ष करायला हवे. त्यांना अतिरिक्त महत्त्व द्यायला नको. मात्र हे केवळ अद्वातद्वा बोलणे म्हणून सोडून देता येत नाही. कारण या लोकांकडे असलेली आर्थिक संपत्ती व भक्त गणांमध्ये असलेले माथेफिरूपणा लक्षात घेता हे अनेक दुष्कृत्यांमध्ये सहभागी असतात, पण प्रत्यक्षात क्वचितच सापडतात. मात्र यांना सत्तेचा वरदहस्त असेल किंवा भीती नसेल तर हे लोक नंगानाच करायला केव्हाही तयार असतात. त्यामुळे इथे सत्ताधारी वर्गाची जबाबदारी खूप जास्त असते. पण ते जेव्हा अशा वर्तनाचे अप्रत्यक्ष समर्थन करू लागतात तेव्हा काय करायचे हा प्रश्न असतोच. केशवप्रसाद मौर्य आणि नरोत्तम मिश्रा यांच्यासारखे भाजपचे वरिष्ट नेते जेव्हा उपमुख्यमंत्री व गृहमंत्री या पदावर असताना अशा भूमिका घेतात तेव्हा परिस्थिती खूपच गंभीर आहे, याची जाणीव होते आणि त्याहून अधिक गंभीर हे आहे की, केवळ बोलणे हा लोकशाही व्यवस्थेत गुन्हा मानला जात नाही, त्या बोलण्याप्रमाणे विघातक कृती प्रत्यक्षात घडली आहे का किंवा त्यांच्या बोलण्यामुळे विघातक कृती अन्य कोणी केली आहे का, या निकषांवर द्वेषयुक्त वक्तव्याची अपायकारकता ठरत असते. अन्यथा ती वक्तव्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भाग मानली जातात. भारतात यासंदर्भात असलेले कायदे संदिग्ध आहेत आणि त्यातही द्वेषयुक्त वक्तव्ये कशाला म्हणायचे किंवा ती तशी आहेत हे कसे ठरवायचे याबाबत न्यायालयात ही फार काही घडत नाही.

प्रवीण तोगडिया ते बाळासाहेब ठाकरे आणि आझमखान ते असुद्दिन ओवेसी यांच्यापर्यंतच्या अनेकांनी अशी वक्तव्ये कमी-अधिक तीव्रतेने केली तेव्हाही प्रकरणे न्यायालयात जाऊनही फार काही घडले नाही. कारण न्यायसंस्थेला काही घटनात्मक मर्यादा घालून दिल्या आहेत. आणि द्वेषयुक्त वक्तव्यांना काही ठोस निकष लावून कायदे केले जावे, तर 'रोगापेक्षा इलाज भयंकर' अशी स्थिती येणार, परिणामी अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संकोचाला आमंत्रण मिळणार असा हा तिढा आहे. त्यामुळे, हातात राहते काय? तर अशा द्वेषमूलक भाषणांचा कडक शब्दांत निषेध करणे, तसा निषेध सरकार दरबारी होईल यासाठी आग्रह धरणे, तशी भाषणे किती देशविघातक आहेत, यासाठी पोलिसांत तक्रार दाखल करून न्यायालयीन लढाया करत राहणे, प्रसारमाध्यमांतून जनजागृती करणे आणि प्रसंगी रस्त्यावर येऊन निषेधसभा व मोर्चे आंदोलने करणे हेच सनदशीर मार्ग राहतात. लोकशाहीचा मार्ग हा असाच असतो, खाचखळग्यांचा, डोंगर उतारांचा आणि दीर्घ पल्ल्याचा! या मार्गावर झटपट असे सतत वा प्रत्येक वेळी घडत नसते, मात्र आग्रह तसाच धरायचा असतो, त्यासाठी शक्य त्या मार्गाने लढायचे असते!

रामचंद्र गुहा

# डेस्मंड टुटू यांचं स्मरण

गेले काही आठवडे मी दक्षिण आफ्रिकेबाबत बराच विचार करतो आहे. तिथे सध्या सुरू असलेली कसोटी क्रिकेटची मालिका, हे यामागचं एक छोटं कारण आहे. पण मुख्यत्वे आर्चबिशप डेस्मंड टुटू यांच्या निधनानिमित्ताने हे विचार माझ्या मनात येत आहेत. टुटू यांच्या निधनामुळे वर्णद्वेषविरोधी चळवळीतील अखेरचा थोर नेता जगाने गमावला आहे. दक्षिण आफ्रिकेत केलेल्या कार्यासंदर्भात ते अधिक ओळखले जात असले, तरी त्यांच्या मायभूमी व्यतिरिक्त इतर देशांमधील अन्यायाबद्दल व दडपशाहीबद्दल ते बोलत असत, त्यामुळे त्यांना सर्वत्र आदराचं स्थान मिळालं होतं. जगाच्या सद्सद्विवेकबुद्धीची धुरा त्यांच्या इतर समकालीनांपेक्षा त्यांनी अधिक प्रमाणात वाहिली.

मी जानेवारी १९८६मध्ये डेस्मंड टुटू यांना पाहिल्यांदा टीव्हीच्या पडद्यावर पाहिलं. त्या वेळी मी अमेरिकेत अध्यापनाचं काम करत होतो, आणि आर्चबिशप टुटू तिथे दौऱ्यावर आले होते. दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेष्ट्या राजवटीला अमेरिकेचा व अमेरिकी लोकांचा छुपा आणि काही वेळा उघड पाठिंबा मिळत असताना याबाबतीत त्यांना खडबडून जागं करावं, हा टुटू यांच्या दौऱ्यामागील उद्देश होता. पाश्चात्त्य राष्ट्रांकडून आर्थिक दबाव आला तर दक्षिण आफ्रिकेतील सत्ताधाऱ्यांना वांशिक भेदभाव संपवण्यासाठी पावलं उचलणं भाग पडेल, अशी त्यांची धारणा होती. ते अमेरिकेतील उद्योगविश्वातील धुरीणांना (यात जनरल मोटर्सच्या प्रमुखांचाही समावेश होता) भेटले, तसेच तिथल्या सर्वोत्तम ज्ञानसंपन्न विद्यापीठांच्या प्रमुखांनाही भेटले. दक्षिण आफ्रिकेतील सघन व नफादायी गुंतवणुकी काढून घ्याव्यात, अशी आग्रहाची विनंती त्यांनी या मंडळींकडे केली.

अमेरिकेच्या या दौऱ्यामध्ये टुटू यांचं भुरळ घालणारं आणि धाडसी व्यक्तिमत्व सर्वांना पाहायला मिळालं. ते ताठ कण्याचे असले तरी त्यांचा वावर आकर्षक आणि नर्मविनोदी होता. अमेरिकेतील श्रीमंत व सत्ताधारी लोकांच्या भेटी घेत असतानाच टुटू यांनी १९६०च्या दशकात नागरी अधिकारांच्या चळवळीमध्ये भाग घेतलेल्यांशीही संवाद साधला. वारंवार त्यांची तुलना

> दक्षिण आफ्रिकेतील माझ्या दौऱ्यांमध्ये मी बहुतांशाने लेखकांशी व अभ्यासकांशी संवाद साधला, पण आर्चबिशप टुटू यांचं मला कधी दर्शनही होऊ शकलं नाही (भेटण्याची तर गोष्टच दूर). परंतु, २००५ साली टुटू एका खाजगी भेटीसाठी बंगळुरूला आले, तेव्हा त्यांच्या सन्मानार्थ आयोजित करण्यात आलेल्या लहानशा भोजनसमारंभात मलाही निमंत्रित करण्यात आलं होतं. या प्रसंगी मला त्यांच्याशी सुमारे वीस मिनिटं बोलायला मिळालं. सुरुवातीला आम्ही सचिन तेंडुलकरबद्दल बोललो. खेळताना होणारी सचिनच्या पायांची कुशल हालचाल आणि दक्षिण आफ्रिकी वेगवान गोलंदाजांविरोधातील त्याची थरारक तडाखेबंद फलंदाजी, यांबद्दल टुटू यांना अतिशय कौतुक वाटत होतं. मग मी त्यांना ट्रेव्हर हडलस्टोन यांच्याशी झालेल्या माझ्या भेटीबद्दल सांगितलं.

मार्टिन ल्यूथर किंग यांच्याशी केली जात होती. तेव्हा, अशी तुलना करणं रास्त नसल्याचं सांगत टुटू स्वतःच्या ठेंगण्या, लठ्ठ शरीराकडे व अस्ताव्यस्त केसांकडे निर्देश करत पत्रकारांना म्हणाले होते की, 'बाकीचे मुद्दे आहेतच, शिवाय मार्टिन ल्यूथर किंग माझ्यापेक्षा खूपच जास्त देखणे होते.'

दक्षिण आफ्रिकेत गुंतवणूक केलेल्या अमेरिकी विद्यापीठांमध्ये येल विद्यापीठाचाही समावेश होता, आणि मी त्या वेळी येलमध्येच होतो. टुटू यांच्या भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये, तसंच काही शिक्षकांमध्येही चैतन्य निर्माण झालं, आणि त्यांनी येल कॉर्पोरेशनला संपर्क साधला व दक्षिण आफ्रिकी कंपन्यांमधील समभाग काढून घ्यावेत अशी विनंती केली. कॉर्पोरेटरांनी असं करायला तुच्छतेने नकार दिला, त्यामुळे विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाबाहेरच्या मोकळ्या चौकाचा ताबा घेतला, तिथे लाकडाच्या नि पत्र्याच्या झोपड्या उभारल्या आणि ते तिथेच बसून गाणी गाऊ लागले, घोषणा देऊ लागले व भाषणं करू लागले. विद्यार्थ्यांनी तिथे नेल्सन मंडेला यांची चित्रं लावली होती. वीस वर्षांहून अधिक काळ तुरुंगात असलेले मंडेला वर्णभेदविरोधी संघर्षाचे आणि चळवळीतील त्यागाचे मूर्त प्रतीक झाले होते.

येलमधील या काळात पहिल्यांदाच मी भारताबाहेर होतो. त्या वेळी मी विशीच्या उत्तरार्धात होतो, पण अमेरिकन टीव्हीवर बिशप टुटू यांचं बोलणं ऐकेपर्यंत मला दक्षिण आफ्रिकेतील घडामोडींची फारशी वार्ता नव्हती. मी न-राजकीय होतो असं नाही, पण माझ्याच देशातील वाढते जातीय व धार्मिक तणाव माझं लक्ष खेचून घेत होते. व्हिएतनाम, इराण व इतर ठिकाणच्या वादळी राजकीय घडामोडींवर मी लक्ष ठेवून होतो. पण का कुणास ठाऊक, दक्षिण आफ्रिकेतील घडामोडींबाबत मी अनभिज्ञ होतो. याचा दोष कदाचित भारतीय प्रसारमाध्यमांनाही देता येईल. ही माध्यमं क्वचितच दक्षिण आफ्रिकेविषयीच्या बातम्या देत असत. तिथल्या वर्णभेदी राजवटीशी भारताचे राजनैतिक संबंध नसल्यामुळेही बहुधा तसं झालं असेल. आता टीव्हीवर टुटू यांचं बोलणं ऐकल्यावर आणि त्यांच्या भाषणांच्या बातम्या वाचल्यावर, तसंच येल विद्यापीठात बहुतांश गोऱ्या विद्यार्थ्यांवर पडलेला प्रभाव पाहिल्यावर मला दक्षिण आफ्रिकेमध्ये उशिरा का होईना रुची वाटू लागली.

भारतात परतल्यावर मी दक्षिण आफ्रिकेतील राजकारणावर अधिक काटेकोरपणे लक्ष ठेवून राहिलो. दरम्यान, दक्षिण आफ्रिकेवर निर्बंध टाकण्यासाठीची चळवळ जोर धरू लागली होती. आधी वर्णद्वेष्ट्या राजवटीवर टीका करण्यास अनिच्छुक असलेले मार्गारेट थॅचर व रोनाल्ड रेगन आता काही प्रमाणात निषेधाचा सूर नोंदवू लागले होते. नेल्सन मंडेला अजूनही तुरुंगात होते, पण अधूनमधून परदेशी पाहुण्यांना भेटण्याची मुभा त्यांना देण्यात आली. ऑस्ट्रेलियाचे माजी पंतप्रधान माल्कम फ्रेझर यांनीही त्या काळात मंडेलांची भेट घेतली होती. त्या वेळी मंडेलांचा पहिला प्रश्न होता- 'डॉन ब्रॅडमन अजून हयात आहेत का?'

१९९१ साली मी लंडनला होतो, तिथे गोपाळकृष्ण गांधी यांच्या घरी मला अँग्लिकन धर्मोपदेशक ट्रेव्हर हडलस्टोन भेटले. त्यांना १९५०च्या दशकात वर्णद्वेष्ट्या राजवटीवर टीका केली म्हणून दक्षिण आफ्रिकेतून हद्दपार करण्यात आलं होतं. जोहान्सबर्गमध्ये धर्मोपदेशक म्हणून काम करत असताना हडलस्टोन यांनी अनेक लक्षणीय तरुणांना मार्गदर्शन केलं. डेस्मंड टुटू हे त्यांपैकीच एक होते आणि जॅझ संगीतकार ह्यू मासेकेला हेसुद्धा त्याच तरुणांमधून पुढे आले. तर, हडलस्टोन १९९१ साली सत्तरीत होते. एके काळी वर्णद्वेषाविरोधात जोरदार मोहीम चालवणारं त्यांचं शरीर आता अशक्त आणि स्पष्टपणे आजारी वाटत होते. गांधी यांच्या घरी भोजनसमारंभावेळी उपस्थित असणाऱ्या दुसऱ्या एका पाहुण्याने तब्येतीची चौकशी केल्यावर हडलस्टोन म्हणाले, 'माझ्या मृत्यूआधी वर्णद्वेष्ट्या धोरणाचा शेवट पाहायला मिळेल, अशी मला आशा आहे.' हडलस्टोन यांची इच्छा पूर्ण झाली. त्यांना १९९४ साली नेल्सन मंडेला राष्ट्राध्यक्ष झाल्यावर थोड्या कालावधीसाठी दक्षिण आफ्रिकेला जाता आलं.

मी स्वतः १९९७ ते २००९ या काळात पाच वेळा दक्षिण आफ्रिकेला गेलो. या प्रसंगी मला वर्णद्वेषाविरोधात संघर्ष केलेल्या काही विलक्षण व्यक्ती भेटल्या. त्यात कवी माँगाने वॅली सेरोते यांचा समावेश होता; कला व संस्कृती यांची जोपासना करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या संसदीय समितीची जबाबदारी त्यांच्याकडे होती. तसंच, समाजवैज्ञानिक फातिमा मीर यांनासुद्धा मी भेटलो; वृद्धत्व आणि शारीरिक अशक्तपणा असूनही त्या अजूनही सक्रिय व सजग होत्या. कायदेतज्ज्ञ अल्बी सच्स यांचा एक हात आणि एक डोळा दक्षिण आफ्रिकी सुरक्षा दलांच्या हल्ल्यात

निकामी झाला, तरीही ते उत्साहाने आणि उमदेपणाने मला भेटले. इतिहासकार रेमंड सटनर यांना तुरुंगात रानटी छळाला सामोरं जावं लागल्याच्या खुणा त्यांच्या चेहऱ्यावर असतानाही ते समर्पणभावाने एक अकादमिक नियतकालिक चालवत होते. या सर्वांनी आणि त्यांच्यासारख्या इतरांनी इतिहासाच्या जखमा निधडेपणाने बाजूला सारल्या होत्या आणि आता ते सामूहिकपणे पूर्णतः बहुवांशिक लोकशाही उभी करण्यासाठी प्रयत्नशील होते.

या व्यक्तींचं शौर्य, त्यांचा निग्रह, त्यांची बुद्धिमत्ता, आणि– बहुधा सर्वांत महत्त्वाचं म्हणजे– त्यांच्यातील द्वेषाचा पूर्ण अभाव, हे सगळंच लक्षणीय होतं. या सर्वांची वांशिक पार्श्वभूमी वेगवेगळी होती– कोणी आफ्रिकी होतं, कोणी भारतीय, कोणी मिश्रवर्णीय, तर कोणी गोरं होतं. एक 'रेन्बो नेशन' अस्तित्वात येत असताना त्याचं प्रतिनिधित्व ही मंडळी करत होती ('रेन्बो नेशन' हा शब्दप्रयोग डेस्मंड टुटू यांनी चलनात आणला). भारतामध्ये १९४०च्या दशकाअखेरीला व १९५०च्या दशकारंभी शिक्षक, सामाजिक कार्यकर्ता, प्रशासकीय अधिकारी, न्यायाधीश असण्याचा अर्थही असाच राहिला असेल; त्यातही अशीच आदर्शवादाची प्रेरणा असेल आणि आपल्याहून उत्तुंग थोर नेत्यांकडून स्फूर्ती घेतली जात असेल, असं मला वाटलं.

दक्षिण आफ्रिकेतील माझ्या दौऱ्यांमध्ये मी बहुतांशाने लेखकांशी व अभ्यासकांशी संवाद साधला, पण आर्चबिशप टुटू यांचं मला कधी दर्शनही होऊ शकलं नाही (भेटण्याची तर गोष्टच दूर). परंतु, २००५ साली टुटू एका खाजगी भेटीसाठी बंगळुरूला आले, तेव्हा त्यांच्या सन्मानार्थ आयोजित करण्यात आलेल्या लहानशा भोजनसमारंभात मलाही निमंत्रित करण्यात आलं होतं. या प्रसंगी मला त्यांच्याशी सुमारे वीस मिनिटं बोलायला मिळालं. सुरुवातीला आम्ही सचिन तेंडुलकरबद्दल बोललो. खेळताना होणारी सचिनच्या पायांची कुशल हालचाल आणि दक्षिण आफ्रिकी वेगवान गोलंदाजांविरोधातील त्याची थरारक तडाखेबंद फलंदाजी, यांबद्दल टुटू यांना अतिशय कौतुक वाटत होतं. मग मी त्यांना ट्रेव्हर हडलस्टोन यांच्याशी झालेल्या माझ्या भेटीबद्दल सांगितलं. तेव्हा टुटू शोकाकुलपणे व प्रेमाने म्हणाले, 'आफ्रिकी माणसासारखं ट्रेव्हर यांचं अख्खं शरीर हसायचं.'

डेस्मंड टुटू यांच्यापासून स्फूर्ती घेतलेल्या विद्यार्थ्यांची अमेरिकेतील आंदोलनं मला पाहायला मिळाली आणि मागील दोन दशके मी राहतो त्या शहरात टुटू यांच्याशी ओझरती भेट झाली. पण हे तुरळक वैयक्तिक दुवे नसते, तरीही डेस्मंड टुटू यांच्या निधनाने मी दुःखी झालोच असतो. कारण, त्यांच्या देशात आणि इतर देशांमध्येसुद्धा नैतिक अधिकार प्राप्त झालेले ते बहुधा शेवटची व्यक्ती असावेत. ते दक्षिण आफ्रिकेच्या सद्सद्विवेकबुद्धीचं प्रतीक होते, त्यांनी वर्णद्वेष्ट्या राजवटीमधील वंशवादी क्रौर्याचा थेट सामना केला होता, आणि या राजवटीची समाप्ती झाल्यानंतर आफ्रिकन नॅशनल काँग्रेसकडून चालवल्या जाणाऱ्या सरकारमधील भ्रष्टाचार व साट्यालोट्याचे व्यवहार, यांवरही त्यांनी उघडपणे टीका केली. ज्यू वसाहती उभ्या करणाऱ्यांनी व इस्राएली राज्यसंस्थेने पॅलेस्टिनी लोकांवर केलेले अन्याय असोत, किंवा म्यानमारमध्ये नोबेलविजेत्या आँग सान सू की यांच्या नेतृत्वाखालील राजवटीने रोहिंग्यांवर केलेले अन्याय असोत, प्रत्येक वेळी टुटू यांनी या घटनांचा विरोध केला. खुद्द त्यांच्या अँग्लिकन चर्चने समलिंगींविषयी दाखवलेल्या तिरस्काराचाही त्यांनी निषेध केला.

टुटू यांच्या जीवनातून आणि त्यांच्या वारशामधून आपल्या देशालाही काही धडे घेण्यासारखे आहेत. विशेषतः आंतरधार्मिक सौहार्दाशी असणारी त्यांची उत्कट बांधिलकी भारतामध्ये प्रस्तुत ठरणारी आहे. ते धर्मोपदेशक होते, नंतर ते बिशप झाले आणि त्यानंतर आर्चबिशप झाले, पण स्वतःच्या ख्रिस्ती धर्माचं आचरण करण्याबाबत ते अजिबातच पोथिनिष्ठता पाळत नसत. इतर धार्मिक परंपरांमधील आदर्श व्यक्तींची प्रशंसा करताना ते स्वतःच एकदा म्हणाले होते, 'ईश्वर ख्रिस्ती नाहीये.' तसंच ईश्वर हिंदूसुद्धा नाहीये.

(अनुवाद– प्रभाकर पानवलकर)

**रामचंद्र गुहा,** बंगळुरु

(१९३१ ते २०२१ असे ९० वर्षांचे आयुष्य लाभलेल्या डेस्मंड टुटू यांचे निधन २६ डिसेंबर २०२१ रोजी झाले, त्यानिमित्ताने हा लेख लिहिला आहे.)

थेट सभागृहातून

अब्दुल रझ्झाक गुरनाह

# साहित्याचे नोबेल स्वीकारताना केलेले भाषण

दि.७ डिसेंबर रोजी अब्दुल रझ्झाक गुरनाह यांनी त्यांचे नोबेल पारितोषिक पदक स्वीकारले. ह्या कार्यक्रमाचे YouTube वर थेट प्रसारण करण्यात आले होते. हा एक छोटेखानी समारंभ होता. त्यात कौटुंबिक सदस्य आणि जवळचे सहकारी उपस्थित होते. या दरम्यान, गुरनाह यांच्या भाषणाचा आधीच रेकॉर्ड केलेला व्हिडिओ प्रसारित करण्यात आला. या भाषणात एक लेखक म्हणून आपला प्रवास कसा झाला त्याबद्दल ते सांगत आहेत. ज्या क्लेशकारक अनुभवांमुळे त्यांनी झांझिबार सोडले आणि ते इंग्लंडला गेले त्याविषयी त्यांनी सांगितले आहे. त्यातूनच त्यांना लेखनात रस कसा निर्माण होत गेला आणि स्वत:च्या कामातून त्यांनी कोणकोणत्या विषयांचा शोध घेतला ते समजते. हे एक प्रेरणादायी भाषण आहे, हे वाचताना आपला वेळ सार्थकी लागल्याचे समाधान मिळते.

''लिहिण्यात नेहमीच आनंद मिळतो. शाळेत असल्यापासून इतर कुठल्याही वर्गांपेक्षा, आमच्या शिक्षकांनी आम्हांला आवडेल असे काहीतरी लिहिण्यासाठी नेमून दिलेल्या लेखनवर्गाची मी जास्त वाट पाहत असे. अशा वेळी सगळे जण अगदी गप्प बसायचे आणि आपापल्या डेस्कवर झुकून आपल्या आठवणीतले किंवा कल्पनेतले काहीतरी खास सांगण्यासारखे कागदावर उतरवण्याचा प्रयत्न करत असत. त्या काहीशा बालिश प्रयत्नांमध्ये विशेष काही सांगण्याची, एखादा संस्मरणीय अनुभव आठवण्याची किंवा ठामपणे मत मांडण्याची किंवा एखादी तक्रार करण्याचीही असोशी नव्हती. तसंच आम्हांला लिहायला प्रवृत्त करणाऱ्या शिक्षकांशिवाय इतर कोणत्याही वाचकाची या प्रयत्नांमध्ये आवश्यकताही नव्हती. मला लिहायला सांगितले गेले म्हणून मी लिहीत असे आणि त्यातून मला आनंद मिळत गेला.

नंतर काही वर्षांनी जेव्हा मी स्वतः शाळेत शिक्षक झालो, तेव्हा याचीच दुसरी बाजू मला अनुभवायला मिळाली. माझे विद्यार्थी त्यांच्या कामात मग्न झालेले

२० डिसेंबर १९४८ रोजी, आफ्रिका खंडातील टांझानिया देशात अब्दुल रझ्झाक गुरनाह यांचा जन्म झाला. अंतर्गत युद्धात निर्वासित होऊन ते १९६० च्या दशकात इंग्लंडला गेले आणि तिथेच स्थायिक झाले. त्यांनी दहा कादंबऱ्या आणि अनेक कथा लिहिल्या आहेत. त्यांची 'मेमरी ऑफ डिपार्चर, पिलग्रिमस् वे, पॅराडाइज, ॲडमायरिंग सायलेन्स, बाय द सी, द लास्ट गिफ्ट' इत्यादी पुस्तके विशेष प्रसिद्ध आहेत. त्यांना सहित्यासाठीचा २०२१ चा नोबेल पुरस्कार दिला गेला.
तो पुरस्कार स्वीकारताना त्यांनी केलेले भाषण, त्यांच्यातील लेखकाची पार्श्वभूमी व प्रेरणास्रोत सांगणारे आहे. म्हणून ते संपूर्ण भाषण अनुवाद करून प्रसिद्ध करीत आहोत.
... संपादक

असताना मी शांत वर्गात बसलेला असे, तेव्हा मला डी.एच. लॉरेन्सच्या एका कवितेची आठवण होत असे. 'द बेस्ट ऑफ स्कूल' ह्या कवितेत ते म्हणतात, ''मी वर्गाच्या किनाऱ्यावर एकटा बसलो असताना, उन्हाळी कपडे घातलेली मुले त्यांची डोकी टेकवून लिहिताना दिसतात. मध्येच एखादा विचारमग्न चेहरा माझ्याकडे वळतो आणि जणू त्याला काहीच दिसत नाही. मग हवे ते सापडल्याचा रोमांच त्याच्या चेहऱ्यावर झळकतो आणि तो पुन्हा आपल्या कामाकडे वळतो.''

''मी ज्या लेखनवर्गाबद्दल सांगतोय, तो नंतरच्या काळातल्या लेखनासारखा नव्हता. ते लिखाण तसे निरुद्देश होते, त्याला काही विशिष्ट दिशा नव्हती, त्यावर पुन:पुन्हा काम करून त्यात सुधारणा केली जात नसे. त्या अतिउत्साही प्रयत्नांच्या काळात, मी अगदीच एकरेषीय लिहीत असे. त्या लिखाणात ना कसला संकोच होता ना कसली दुविधा होती. उलट एक प्रकारची निरागसताच होती. माझे वाचनदेखील तसेच कसलाही धरबंध नसलेले, दिशाहीन होते. ह्या दोन्ही गोष्टींचा एकमेकांशी किती जवळचा संबंध आहे हेसुद्धा मला त्या वेळी माहीत नव्हते. कधीकधी शाळेसाठी लवकर उठायची गरज नसायची, तेव्हा मी रात्री उशिरापर्यंत वाचत बसायचो. माझ्या वडलांना निद्रानाशाचा विकार होता, ते मग माझ्या खोलीत येऊन मला लाइट बंद करायला सांगत असत. 'तुम्ही अजून जागे कसे काय? मी का जागं राहायचं नाही?' असे विचारायची माझी हिम्मत होत नसे. कारण वडिलांशी असे बोलायचे नसते. काही झाले तरी, माझ्या आईला त्रास होऊ नये म्हणून ते स्वत:च्या निद्रानाशाचा वेळ अंधारात, लाइट बंद करूनच घालवत असत. त्यामुळे लाइट बंद करण्याची त्यांची सूचना काही बदलली नसती.

मी नंतर केलेले लेखन आणि वाचन तरुणाईतल्या स्वैर अनुभवाच्या तुलनेत बरेच व्यवस्थित होते. पण त्यातूनही तितकाच आनंद मिळत असे आणि लिहिण्यासाठी मला कधी झगडावे लागले नाही. हळूहळू त्यात एक निराळाच

अब्दुल रझाक गुरनाह



अद्भुत आनंद मिळत गेला. मी इंग्लंडमध्ये राहायला जाईपर्यंत हे माझ्या नीटसे लक्षात आले नव्हते. पण घराची ओढ लागलेली असताना आणि एका अनोळखी व्यक्तीच्या जीवनातील दु:खामुळे; मी ज्या गोष्टींवर आधी विचार केला नव्हता त्याविषयी चिंतन करू लागलो. दारिद्र्य आणि तुटलेपणाच्या अनुभवाच्या त्या प्रदीर्घ काळात वेगळ्या प्रकारचे लेखन करू लागलो. आणि मग मला काही तरी सांगायचे आहे, एक महत्त्वाचे काम करायचे आहे, वेगवेगळ्या बाबतींतला अन्याय आणि दु:ख माझ्या मनात साचून आहे आणि त्यावर मला विचार करायचा आहे याची मला जाणीव झाली.

सुरुवातीला, मी माझ्या घरातून कशाचीही पर्वा न करता बाहेर पडलो. त्या वेळी काय गमावले त्याचा मी विचार केला. १९६०च्या दशकाच्या मध्यात आमच्या जीवनात अराजकता आली, त्यातून जे काही बरेवाईट पडसाद उमटले ते १९६४ मधल्या क्रांतीतील क्रूरतेमुळे धूसर झाले होते. अटक, फाशी, हकालपट्टी, अंतहीन लहानमोठे अपमान आणि अत्याचार... या सगळ्यांमध्ये जे घडत होते त्याच्या ऐतिहासिक आणि भविष्यकालीन परिणामांबद्दल स्पष्टपणे विचार करणे माझ्या कुमारवयीन अबोध मनाला अशक्य होते. मी इंग्लंडमध्ये राहायला लागलो तेव्हा सुरुवातीच्या काळात मी अशा समस्यांवर चिंतन करू शकलो. आपल्या वागणुकीमुळे एकमेकांवर किती भीषण परिणाम होऊ शकतात त्यावर विचार करता आला. आपल्या गैरसमजुती आणि आपले भ्रम यांचा पुनर्विचार करू शकलो.

आमचा इतिहास अर्धवट होता, अनेक क्रूरतांबद्दल त्यात मौन बाळगलेले होते. आमचे राजकारण वंशवादावर आधारलेले होते आणि त्याने क्रांतीनंतर थेट जुलुमाकडे नेले. मुलांसमोर त्यांच्या वडिलांची कत्तल केली जात होती आणि मुलींना त्यांच्या आईसमोर मारहाण केली जात होती. या घटनांपासून दूर इंग्लंडमध्ये राहूनदेखील माझ्या मनात खूप अस्वस्थता आहे. कदाचित असेही असेल की ज्यांना प्रत्यक्ष परिणाम भोगावे लागले, अशा लोकांपेक्षा त्या आठवणींचा प्रतिकार करायला मी पुरेसा सक्षम नव्हतो. पण या घटनांशी संबंध नसलेल्या इतर आठवणींचाही मला त्रास झाला. पालकांचे आपल्या मुलांशी निर्दयपणाने वागणे, सामाजिक कट्टरपणामुळे किंवा लिंगभेदामुळे लोकांना अभिव्यक्ती नाकारण्यात येणे, विषमतेमुळे येणारी गरिबी आणि असहायता – या काही अपवादात्मक बाबी नाहीत. त्या तर मानवी जीवनात सगळीकडेच दिसून येतात. परंतु जोपर्यंत परिस्थितीमुळे तुम्हांला त्यांची जाणीव होत नाही, तोपर्यंत त्या गोष्टी सतत तुमच्या मनात जाग्या नसतात. मला अशी शंका वाटते की जे लोक एखाद्या आघातातून निसटले आहेत आणि मागे राहिलेल्या लोकांपासून दूर सुरक्षितपणे जगत असतात, त्यांच्या मनावर कायम हे ओझे असते.

अखेरीस, मी यांपैकी काही आठवणींबद्दल लिहायला सुरुवात केली. त्याला फार काही शिस्त नसली, तरीदेखील माझ्या मनातील संभ्रम आणि अनिश्चिततेला काहीशी स्पष्टता देण्यासाठी त्याचा उपयोग झाला. पण कालांतराने हे स्पष्ट झाले की, काही तरी अस्वस्थ करणारी गोष्ट घडत आहे. एक नवीन सोपा इतिहास रचला जात होता. जे वास्तवात घडले होते त्याऐवजी इतिहासाची एक नवीनच सोईस्कर पुनर्रचना केली जात होती. हा नवा आणि सुलभ इतिहास म्हणजे केवळ विजेत्यांच्या आवडीचे कथानक तयार करण्याचे अपरिहार्य काम नव्हते, ते करायचे स्वातंत्र्य तर त्यांना नेहमीच होते. परंतु ज्यांना आमच्यामध्ये प्रत्यक्षात काहीच रस नव्हता अशा विद्वान, भाष्यकार आणि अगदी लेखकांनादेखील हे सुलभीकरण सोयीचे होते. त्यांना जगाविषयीच्या त्यांच्या दृष्टिकोनाशी जुळणारे असे वांशिक मुक्ती आणि प्रगतीविषयीचे परिचित कथानक हवे होते आणि ते त्याच एका चौकटीतून आमच्याकडे पाहत होते. म्हणूनच पूर्वीच्या काळाची साक्ष देणाऱ्या इमारती, भौतिक वस्तू, कर्तृत्व आणि जीवनातल्या कोमलतेच्या इतिहासाला नकार देणे त्यांना आवश्यक झाले होते.

बऱ्याच वर्षांनंतर मी ज्या शहरामध्ये लहानाचा मोठा झालो त्या शहराच्या रस्त्यांवरून फिरलो. तेव्हा मला भूतकाळाची स्मृती हरवण्याच्या भीतीने अनेक दातपडक्या आणि काळवंडलेल्या जागा, इमारती आणि लोक दिसले. लोकांचे जगणे, त्यांच्या कहाण्या आणि त्यांचे विचार यांबद्दल लिहिण्यासाठी त्यांच्या त्या स्मृती जपण्याचा प्रयत्न करणे आवश्यक होऊन बसले. आमच्या राज्यकर्त्यांना आत्मगौरवासाठी ज्या छळाच्या आणि क्रौर्याच्या आठवणी निपटून काढायच्या होत्या,

त्यांच्याविषयी लिहिणे गरजेचे होते.

मी इंग्लंडमध्ये जाऊन राहिल्यावर माझ्या लक्षात आले की इतिहासाच्या एका निराळ्या आकलनालादेखील सामोरे जाणे आवश्यक आहे. झांझिबारमध्ये वसाहतवादाच्या प्रभावाखालचे शिक्षण घेत असताना ते माझ्या तितकेसे लक्षात आले नव्हते.

आम्ही वसाहतवादाच्या प्रभावाखालच्या पिढीतली मुले आपल्या पालकांपेक्षा वेगळी होतो. आमच्या नंतरची पिढी आणखीनच निराळी होती. याचा अर्थ मला असे म्हणायचे नाही की आमच्या पालकांनी ज्या गोष्टींना महत्त्व दिले, त्यापासून आम्ही अगदीच दुरावलेले होतो. किंवा जे आमच्या नंतर आले ते वसाहतवादी प्रभावापासून मुक्त होते, असेही नाही. मला असे म्हणायचे आहे की निदान आपल्या जगापुरते तरी आम्ही एका उच्च शाही आत्मविश्वासाच्या काळात शिकलो. तेव्हा वर्चस्ववादावर गोड शब्दांचा मुलामा दिला जात असे आणि आम्हीदेखील त्या क्लृप्तीला बळी पडत गेलो. मी त्या काळाबद्दल बोलतोय जेव्हा वसाहतीकरणाच्या मोहिमेने संपूर्ण प्रदेशाला व्यापून टाकले नव्हते आणि वसाहतवादी राजवटीची अगदीच अवनती झाली नव्हती. आमच्या नंतरच्या पिढीत वसाहतकालानंतर तयार झालेले त्यांचे स्वत:चे भ्रम आणि भ्रमनिरास होते. आणि कदाचित वसाहतवादाशी आलेल्या संपर्कामुळे आमचे जीवन कसे बदलले ते त्यांनी स्पष्टपणे किंवा पुरेसे सखोल समजून घेतले नाही. आमच्या इथे असलेला भ्रष्टाचार आणि कुशासनदेखील काही प्रमाणात त्या वासाहतिक वारशाचाच एक भाग आहेत, हे त्यांना तितकेसे उमजले नाही. यापैकी काही बाबी मला इंग्लंडमध्ये स्पष्ट झाल्या. त्याचे कारण मला संभाषणातून किंवा वर्गातल्या शिकवण्यातून स्पष्टीकरण देणारे लोक भेटले म्हणून नव्हे, तर त्यांच्याकडील कथांमध्ये माझ्यासारख्या एखाद्या व्यक्तीचे कसे चित्रण केले आहे ते पाहून आणि तिथल्या अनौपचारिक संभाषणात किंवा टीव्हीवर आणि लिखाणात सुरू असलेल्या वर्णद्वेषी विनोदांमधून मला ही समज येत गेली. मला रोज दुकानात, ऑफिसमध्ये, बसमध्ये जे कडवट अनुभव येत होते त्यांविषयी काहीही करणे माझ्या हाती नव्हते. पण जसजशी माझी समज वाढत गेली, तशी आम्हांला तुच्छ लेखणाऱ्या आत्ममग्न लोकांच्या संकल्पनांना खोडून काढणारे काही लिहिण्याची इच्छा वाढली.

परंतु लेखन हे कितीही चैतन्याने भारलेले असले किंवा आश्वासक असले तरीही ते केवळ लढाया आणि वादविवादांबद्दल असू शकत नाही. लेखन हे एका ठरावीक मुद्द्याविषयी, एखाददुसऱ्या समस्येविषयी किंवा चिंतेविषयी नसते. लेखन हे कोणत्या ना कोणत्या प्रकारे मानवी जीवनाविषयीच असते. त्यामुळे लवकरच प्रेम, क्रौर्य आणि दुर्बलता हे लिखाणाचे विषय बनतात. माझा असा विश्वास आहे की साध्या डोळ्यांनी जे दिसू शकत नाही ते लेखनाने दाखवले पाहिजे. वरवर पाहता मामुली दिसणाऱ्या लोकांमध्ये इतरांच्या तिरस्काराची पर्वा न करण्याचा आत्मविश्वास कुठून येतो, याविषयीसुद्धा लिहिणे मला आवश्यक वाटले. माणसांना सुलभीकरण आणि साचेबंदपणातून बाहेर काढायचे असेल तर जीवनातली कुरूपता आणि सद्गुण दोन्ही प्रामाणिकपणे मांडणे गरजेचे आहे. जर ते करता आले तर त्यातून एक निराळ्या प्रकारचे सौंदर्य बाहेर येते. अशा प्रकारे आयुष्याकडे पाहण्यामुळे क्रूरतेच्या अनुभवांतूनदेखील कोमलता, दुर्बलता आणि दयेचे स्रोत सापडू शकतात. या कारणांमुळेच लेखन हा माझ्या जीवनाचा एक चित्तवेधक आणि मौल्यवान भाग आहे. अर्थातच माझ्या आयुष्यात इतर अनेक बाबी आहेत, पण त्याबद्दल आत्ता काही नको. मी सुरुवातीला म्हणालो तसे लिहिण्यातला तो अद्भुत आनंद आजही कित्येक दशकांनंतरही तसाच टिकून आहे.

मला आणि माझ्या कार्याला हा महान सन्मान बहाल केल्याबद्दल स्वीडिश अकादमीचे मनापासून आभार व्यक्त करून मी माझं भाषण संपवतो. मी खूप कृतज्ञ आहे.

(अनुवाद : वंदना खरे)

(या संपूर्ण भाषणाचा व्हिडिओ यु-ट्युबवर उपलब्ध आहे. आणि या भाषणाचा इंग्रजी मसुदा नोबेलच्या वेबसाईटवर आहे)

स्वाती राजे

# फॅब्युलस फेबल्स

वाघा-सिंहांच्या, कोल्ह्या-लांडग्यांच्या कथा आशिया-युरोपात व्यापाऱ्यांच्या तांड्यांबरोबर वाहिल्या. कृष्णवर्णीय गुलामांनी आपल्या मातीचं गाणं हृदयाशी जपत साता समुद्रापार अमेरिकेपर्यंत नेल्या. आफ्रिकेच्या जंगलात शेकोटीभोवती मुला-माणसांनी रात्र-रात्र त्या पालवल्या. तशा काही कहाण्या धर्मप्रसाराचा भाग म्हणून अति पूर्वेकडे गेल्या. बुद्ध धर्माच्या प्रसाराबरोबर चीनमधे चौथ्या ते सहाव्या शतकात पोचलेल्या जातक कथा 'बोरे जिंग' या नावानं प्रसिद्धीला आल्या. चीनमधे खरं तर राशिचक्र प्राण्यांशी संलग्न. त्यामुळं लोकजीवनात प्राणिकथा खोलवर रुजलेल्या होत्या. त्याची फारशी माहिती दीर्घ काळ जगाला नव्हतीच. याचं मुख्य कारण म्हणजे भाषेचा अडसर. चिनी कथा ज्या ग्रंथांत समाविष्ट केल्या गेल्या होत्या ते अगदी विशिष्ट प्रकारचा उच्च व्यासंग असलेल्या व्यक्तींनाच वाचता येणं शक्य होतं आणि जे काही लिखित ग्रंथ मिशनरी मंडळींसाठी उपलब्ध होतं, त्यातील पुस्तकी भाषा आणि प्रचलित असलेली कहाण्यांची बोलीभाषा यांत कितीतरी अंतर होतं. आजपर्यंत बाह्य जगापासून दूर राहिलेला हा खजिना विसाव्या शतकात प्रथम इंग्रजीत भाषांतरित झाला आणि पाश्चिमात्य जगाला याचा परिचय झाला.

या अतिशय सहज-सुंदर कथांत आपल्याला कोल्होबा भेटतोच. पण इथला खेकडा कोल्होबावर मात करतो. गरुड आणि भातपिकावर उपजीविका करणाऱ्या 'राइस बर्ड' पक्ष्याच्या अनाठायी स्पर्धेत त्यांची बाळं बदलतात. पण प्रत्येक जणाचं आपापलं रंगरूप ठरलेलं असतं. ते बदलता येत नाही हा धडा दोघांना मिळतो. यात नेहमीच्या प्राणिकथांत भेटणाऱ्या सिंह, हत्ती, मुंगी या वन्य प्राण्यांबरोबरच मांजरी, कोंबड्या, खेचर असे पाळीव प्राणीही दिसतात. या प्राणिकथांत बऱ्याचदा चढाओढ, स्पर्धा, वादंग यांच्या कथा आढळतात. या भांडकुदळ प्राण्यांची 'कॉम्बिनेशन्स' ही वेगळीच! मधमाश्या आणि गोगलगाय, कोंबड्या आणि कासव, सिंह आणि डास एकमेकांशी वाद घालताना दिसतात. स्वतःच्या हक्काच्या 'जागे'साठीचा प्राण्यांचा झगडा बऱ्याच कथांतून प्रत्ययाला

> प्राणिकथा कायमच अशा मुलं आणि मोठ्या माणसांच्या दोन्ही परिसरांत रेंगाळत राहिल्या. सर्वच अर्थानं हा बहुगुणी साहित्यप्रकार. समाजातील दंभाचा समाचार घेण्यासाठीचं साधन, अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीचं अवजार, आपल्या दडपलेल्या स्वप्न- आकांक्षांचा सूर प्रकट करण्यासाठी वापरलेलं माध्यम, वर्णभेद-विरोधातलं हत्यार अशी प्राणिकथांची अनेक उपयोजनं प्राणिकथांच्या विकसनाच्या कालखंडात दृष्टीला पडतात. या इतक्या मूलभूत, लवचीक आकृतिबंधाची भुरळ भल्याभल्यांना न पडली तरच नवल! या खऱ्या अर्थानं 'फॅब्युलस' फॅब्युलिस्ट्सनी 'फेबल्स' हा फॉर्म निरनिराळ्या कालखंडांत आपापल्या परिप्रेक्ष्यातून जगात सर्वत्र हाताळला. फेबल्सच्या पुनर्रचनेची ओढ प्रत्येक संस्कृतीत, प्रत्येक कालखंडात, प्रत्येक संवेदनशील सर्जनशील मनाला होती. आणि म्हणून प्राणिकथा सातत्यानं निरनिराळ्या रंगांत-पोतांत बाजात सामोऱ्या आल्या.

येतो. या सर्व कथांना तात्पर्य असतं. आणि इथंही इसापच्या कथांप्रमाणं दुर्बलांना आवाज उठवण्यासाठी हक्काची जागा प्राणिकथांतून राखलेली दिसते.

चिनी लोककथा-प्राणिकथांच्या अभ्यासाची सुरुवात व्हायला विसाव्या शतकाची पहिली दशपदी उजाडली. नव्या सांस्कृतिक चळवळीच्या उंबरठ्यावर चिनी बोलीभाषांना प्रतिष्ठा येऊ लागली तशी या लोकपरंपरेतून आलेल्या कथांच्या अभ्यासाला गती मिळाली.

दरम्यान जपानमधे सोळाव्या शतकात जेझुइट धर्मोपदेशकांबरोबर इसापकथा पोचल्या. परंतु जपानी लोकजीवनात त्यापूर्वी कित्येक शतकं आपली स्वतःची म्हणून प्राणिकथांची परंपरा रुजलेली होती. या कथा जातक कथांच्या प्रभावातून विकसित झालेल्या दिसतात. माकड आणि कोल्हा ही पारंपरिक जपानी प्राणिकथांतून दिसणारी महत्त्वाची पात्रं. इथलं माकड म्हणजे दुष्ट, धूर्त, लबाड व्यक्तिरेखा. पण त्याच वेळी तो देवाचा, बुद्धाचा दूतही. ते पात्र चतुर, विनोदी आणि सर्वांचं लाडकंही! या विरोधाभासाचं कारण म्हणजे आदिम शिकारी अवस्थेत माकड हे सहज उपलब्ध होणारं खाद्य होतं. पण पुढं कृषिसंस्कृतीच्या विकासकाळात शेतीची नासधूस करणारा उपद्रवी प्राणी म्हणून त्यानं माणसाचा रोष ओढावून घेतला. माकड हे जपानी प्राणिकथांत देवाचा दूत बनून येतं, तेव्हा माणसाला त्याच्या वर्तणुकीप्रमाणं वर किंवा शिक्षा देण्याचा हक्क बजावतं!

माकड जसा बुद्धाचा दूत तसा कोल्हा हा इनारी देवतेचा दूत! इनारी ही भाताची देवता. कोल्ह्याची हुशारी, चपळपणा आणि रात्रीचा दबकत वावर- त्यामुळं कोल्ह्याला एक गूढतेचं वलय जपानी प्राणिकथांत आलं आहे. त्याला जादूई शक्ती असतात. तो माणसाला ठकवण्यात बहाद्दर असतो! एकंदरीत कोल्हा हा प्राणिकथांचा सार्वत्रिक सार्वकालिक रहिवासी! जगात बहुतांश भूभागावर असलेला त्याचा अधिवास हे याचं रहस्य असावं!

धर्मप्रसाराच्या माध्यमातून जशा प्राणिकथा प्रसृत होत राहिल्या; तशा धनिकांच्या हौसेपोटी, राज्यकर्त्यांच्या आग्रहाखातर राजाश्रयाच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पाठबळानं प्राणिकथांच्या विकासप्रसाराला हातभार लागल्याचं दिसतं. प्राणिकथांचं प्रांगण खास करून मुलांसाठी खुलं होण्यात याचा मोलाचा वाटा ठरावा. चौदाव्या लुईच्या सहा वर्षांच्या मुलासाठी मूल्य शिक्षण देण्यासाठी ला फॉन्तेननं इसापकथा पुरस्कृत केल्या. लुईनं इसापच्या अडतीस निवडक कथांवर आधारित जलस्तंभ शिल्पं व्हर्सायच्या राजवाड्यात उभारली असं सांगितलं जातं. इटालिअन राज्यकर्ता लोरेन्झो मेडिची यानं आपला मुलगा पिएरो याच्यासाठी १४८० मधे एक खास भेट दिली. मुद्रणकला जवळजवळ दुर्मिळ असताना मेडिची यानं मुलांसाठी इसापकथांची खास एकमेव मुद्रित प्रत तयार करवून घेतली. बालवाचकांसाठी मुद्रित केलेलं फेबल्सचं, प्राणिकथांचं हे पहिलं ज्ञात उदाहरण.

दरम्यान, प्राणिकथांची आणि त्यातून रेनॉर्ड कोल्हा आणि लांडग्याच्या गोष्टीची समाजमनातली लोकप्रियता लक्षात घेऊन विल्यम्स कॅक्स्टन या पहिल्या इंग्रज मुद्रकानं या कथा रूपांतरित करून लाकडी ठोकळे कोरून मुद्रित केल्या. दि.२६ मार्च १४८४ ला कॅक्स्टननं इसापकथा छापली आणि यातून प्राणिकथांची, तात्पर्यानं मुलांसाठीच्या मूल्यशिक्षणाची 'सोपी पायवाट' घालून दिली!

इंग्रजीच काय, मराठी मुद्रणकलेच्या इतिहासाचं आणि प्राणिकथांचं नातंही अतिशय मोलाचं! मराठीमधे पुस्तक मुद्रित व्हायला सुरुवात झाली, ती इंग्रजीच्या प्रभावातून. आणि पहिलंवहिलं पुस्तक इंग्रजीतून मराठीत अनुवादित झालं ते इसापनीती! १८०६ मधे तंजावरचे राजे सरफोजी भोसले यांनी सख्खन पंडित यांच्याकडून ते भाषांतरित करवून घेतलं. खरं तर या पुस्तकाचं नाव होतं 'बाळबोध मुक्तावली'. हे पुस्तक आज प्रचलित नाही- पण याची एक प्रत ब्रिटिश म्युझियममधे जतन करून ठेवलेली आहे. यानंतर १८१५मधे वैजनाथशास्त्रींनी 'पंचतंत्र आणि हितोपदेश' यांचे अनुवाद बंगालीतून मराठीत आणले. म्हणजे बाल साहित्याच्याच नव्हे; तर एकंदरीतच मुद्रित साहित्याचा मराठीतील प्रारंभ प्राणिकथांनी झाला! १८२२ मधे 'मुंबई हैंद शिक्षण मंडळी' या नावानं स्थापन झालेल्या शिक्षण खात्यानं किंवा तत्कालीन विद्याखात्यानं १८२५ मधे जी शालेय पुस्तकं लिहवून घेतली, प्रसिद्ध केली आणि अभ्यासक्रमात लावली त्यात वैजनाथशास्त्रींच्या पंचतंत्रावरून मराठीत उतरलेल्या 'पंचोपाख्याना'चा समावेश होता.

त्याच सुमाराला १८२३ मधे शिक्षण समितीवर बापू छत्रे यांची नेमणूक झाली. इंग्रजीतून अनुवाद होऊन मराठी गद्य

सुबोध पुस्तकाची प्रथा त्यांनी सुरू केली आणि इंग्रजीतून अनुवादित होऊन ‘बाळमित्र’ व ‘इसापनीती’ या दोन पुस्तकांच्या रूपानं मुद्रित बालवाङ्मय मराठी साहित्याच्या दालनात प्रकटलं. याचं स्वरूप क्लिष्ट नव्हतं. ‘इसापनीती’ बालसुलभ, रंजक बनवण्यासाठी चित्रांचा वापर करण्यात आला. बाल साहित्य सचित्र असण्याची गरज या निमित्तानं सर्वप्रथम व्यक्त झाली. या इसापनीतीतील कथा पहिल्या पुस्तकापेक्षा व पंचोपख्यानापेक्षा सोप्या, सुटसुटीत होत्या. तात्पर्य– ही बुद्धीत भरावयास अवघड नव्हती. त्यामुळं ही इसापनीती लोकप्रिय ठरली. मराठी बाल साहित्याचा श्रीगणेशा असा प्राणिकथांनी केला!

विसाव्या शतकात मुलांसाठी म्हणून प्राणिकथा रुजता रुजता त्यात अनेक प्रयोग होत गेले. दूरदेशींशी विविध कारणांनं झालेल्या सांस्कृतिक अभिसरणातून नवनवे स्रोत प्रकटत चालले. भाषांतरयुगानं या देशोदेशीच्या प्राणिकथांशी मुलांची गट्टी करून दिली. अगदी रेनॉर्ड कोल्हाही मराठमोळ्या मातीत ‘राणा कोल्हा’ म्हणून अवतरला! प्राणिकथा हा जॉनर लेखकांचा आजही आवडता! आजही जगभरात प्राणिकथा विपुल लिहिल्या जातातच! या सर्व काळात प्राणिकथा तीन अंगांनी विकसित झालेल्या दिसतात. एकीत प्राणी सर्वार्थानं माणसांचीच बोली बोलतात. पंचतंत्र, इसापकथा यांचा उल्लेख यात करता येईल. दुसरीत प्राणी प्राण्यांसारखं बोलतात–वागतात. त्यांच्या विश्वातले ताळमेळ नीतिनियम चितारण्याऱ्या या कथा. ‘जंगल बुक’सारख्या प्राणी आणि माणसांच्या सीमारेषेवरच्या कथांचं अभिनव प्रयोगशील अनुकरण यात केलं गेलं. आणि तिसऱ्या कथा प्राण्यांविषयीच्या प्राणिजीवनाविषयी, त्यांचा वेध आपण बाहेरून घेऊन लिहिलेल्या. अलीकडच्या काळातल्या ‘वॉर हॉर्स’सारख्या कथांचा यात समावेश करता येईल किंवा पर्यावरणाशी नातं राखणाऱ्या कथांची यात वर्गवारी करता येईल.

निरनिराळ्या कालखंडांतील प्राणी आणि माणूस यांच्यातील भावबंध अतिशय बहुपेडी. बहुमिती. प्राणी हे माणसासाठी अस्तित्व टिकवण्यासाठीचं आव्हान होतं. भक्ष्य ते कृषिसंस्कृतीचं अवजार असं प्राण्यांचं स्थित्यंतर झालं. त्यानंतरच्या काळात माणसानं प्राण्यांना आपल्या जगण्यात जागा दिली. आपल्या भावनांचं आरोपण करून पंचतंत्र, इसापकथा आणि नंतरच्या अन्य मध्ययुगीन साहित्यानं प्राण्यांना 'questioning beasts and dreamland dragons' ची भूमिका देऊ केली. आपल्या सामाजिक–राजकीय व्यवस्थेचा, सभ्यतेचा कल्पित भाग बनवून त्यांना साहित्याच्या माध्यमातून मानवी जीवनाच्या वेशीच्या आत घेतलं. दरम्यान रेनेसान्स या काळात प्राणिकथांचं महत्त्व काही काळ लोपल्यासारखं वाटता वाटता प्राण्यांबद्दलच्या एकोणिसाव्या शतकातल्या ‘ब्लॅक ब्यूटी’सारख्या कथांनी प्राणिकथांना पुन्हा एकवार उजाळा दिला.

प्राणिकथा कायमच अशा मुलं आणि मोठ्या माणसांच्या दोन्ही परिसरांत रेंगाळत राहिल्या. सर्वच अर्थानं हा बहुगुणी साहित्यप्रकार. समाजातील दंभाचा समाचार घेण्यासाठीचं साधन, अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीचं अवजार, आपल्या दडपलेल्या स्वप्न– आकांक्षांचा सूर प्रकट करण्यासाठी वापरलेलं माध्यम, वर्णभेद–विरोधातलं हत्यार अशी प्राणिकथांची अनेक उपयोजनं प्राणिकथांच्या विकसनाच्या कालखंडात दृष्टीला पडतात. या इतक्या मूलभूत, लवचीक आकृतिबंधाची भुरळ भल्याभल्यांना न पडली तरच नवल! या खऱ्या अर्थानं ‘फॅब्युलस’ फॅब्युलिस्ट्सनी ‘फेबल्स’ हा फॉर्म निरनिराळ्या कालखंडांत आपापल्या परिप्रेक्ष्यातून जगात सर्वत्र हाताळला.

फेबल्सच्या पुनर्रचनेची ओढ प्रत्येक संस्कृतीत, प्रत्येक कालखंडात, प्रत्येक संवेदनशील सर्जनशील मनाला होती. आणि म्हणून प्राणिकथा सातत्यानं निरनिराळ्या रंगांत–पोतांत बाजात सामोऱ्या आल्या.

ला फॉन्तेनने या कथा फ्रान्समध्ये लोकप्रिय केल्या. क्रायलोव्हने रशियात त्यांना आपल्या मातीचा पोत दिला. भारतीय प्राणिजीवनाचे रंग ल्यालेल्या रुडयार्ड किपलिंगच्या ‘जस्ट सो स्टोरीज’पासून हॅन्स अँडरसनपर्यंत आणि बिॲट्रिक्स पॉटरपासून टॉल्किनपर्यंत अनेकांनी या प्राणिकथांत आपापले रंग भरले. आकाशाला गवसणी घालणारा रिचर्ड बाखचा जोनाथन लिव्हिंगस्टन सीगल आपली निराळीच धून लेऊन लहानमोठ्या मनाच्या अवकाशात पंख पसरून उडत राहिला. जेम्स थर्बरनं ससा आणि कासवाच्या गोष्टीला दिलेलं 'A new broom may sweep clean but never trust an old saw' हे व्यंगोसवषपूर्ण परिमाण वाचकाला रुचत गेलं आणि स्टॅलिनच्या एकाधिकारशाहीला पुरेपूर व्यंगोक्तिपूर्ण लेखणीने प्रतिकार करणारी ऑरवेलची ‘ॲनिमल फार्म’



आज पंचाहत्तर वर्षांनंतरही जगात सर्वाधिक अभ्यासली जाणारी 'पोलिटिकल फेबल' म्हणून गौरवली जात राहिली. खलील जिब्रानसारख्या मातब्बरानं सुंदर अल्पाक्षरी रूपककथांच्या वाटेनं 'चार बेडूक'सारख्या, सत्याचा केवळ शाब्दिक उदो उदो करणाऱ्या पण वास्तवात अर्धसत्याचे घुटके घुटके घेत जगण्याची चव घेणाऱ्या दांभिक जगाचं दर्शन घडवलं. तसं 'दोन गरुड, एक कोकरू'सारख्या कथेच्या चिमुकल्या अवकाशातून शांततेसाठीच्या प्रतीक्षेचं स्वप्न दाखवलं.

सभ्यतेच्या विकासात चतुष्पाद आणि द्विपादांचं नातं सतत संक्रमणशील राहिलं. या नात्यातील एक महत्त्वाचा तिठा म्हणजे डार्विनचा उत्क्रांतिवाद. प्राणिजीवनाच्या उतरंडीवर माणूस सर्वांत वरच्या स्थानावर आहे, याची खूणगाठ एकदा सिद्धतेच्या निकषावर माणसानं बांधली आणि आजवरच्या anthropomorphismपेक्षा, प्राण्यांच्या मानवीकरणापेक्षा एक वेगळी हालचाल फेबल्समधे दिसू लागली. काफ्काचं 'मेटॅमॉरफॉसिस' हे त्याचं उदाहरण. प्राण्यांचं मानवीकरण करणाऱ्या माणसाचं आता प्राण्यात रूपांतर होणं ही एक निराळीच प्रक्रिया या निमित्तानं साहित्य जगताला डार्विनोत्तर फेबल्समधे पाहायला मिळाली. माणूस आणि प्राण्याच्या या डार्विनोत्तर संबंधांच्या अनुषंगानं अनेक विद्यापीठांत साहित्याभ्यास सुरू झाला. त्याच वेळी जमिनीकडं नजर असणारा चतुष्पाद प्राणी आणि आकाशाचा वेध घेऊ शकणारा द्विपाद माणूस यांच्या नात्याचाही विचार निराळ्या परिप्रेक्ष्यातून सुरू झाला. याचा भाग म्हणून अमुक-अमुक राजाला मान खाली घालून निमूट ओझं वाहणाऱ्या गाढवाच्या तोंडाचा शाप मिळणं किंवा नेबुचेदनेझ्झारला 'शिक्षा' म्हणून गवतात चरणारा चतुष्पाद बनवलं जाणं या गोष्टींचाही मानवाच्या दोन पायांवर उभं राहण्याच्या उत्क्रांतीच्या परिप्रेक्ष्यातून विचार करणं अगत्याचं ठरावं. तसा 'गाढवासारखा चरतोय', 'अजगरासारखा सुस्तावलाय', 'डुकरासारखा लोळतोय' अशा भाषिक अंगानंही 'अधोमुख' प्राणी आणि 'ऊर्ध्वगामी, ऊर्ध्वरेषी' माणसाच्या नात्याचा प्राणिविश्वाच्या उतरंडीवरून विचार करता येतो का हे पाहणं रोचक ठरावं!

माणसानं आपल्या बुद्धिश्रेष्ठतेच्या बळावर अन्न, वस्त्र, निवाऱ्याच्या मूलभूत गरजांपासून उत्क्रांतीच्या प्रत्येक टप्प्यावर हर्षोल्हासासाठी, मनोरंजनासाठी, सुकर जगण्यासाठी प्राणिसृष्टीला हवं तसं वाकवून घेतलं तरी माणसाचं नातं या पायाखालच्या मातीशी निगडित राखलं ते प्राणिकथेनंच! एका विशिष्ट अवकाशात प्राण्यांशी एकरूपत्व पावल्याशिवाय, माणसाला या प्राणिकथेचा आस्वाद घेणं अवघड! द्विपाद प्राण्यानं ही वस्तुस्थिती कुठंतरी खोलवर स्वीकारली आहे आणि म्हणून प्राणिकथा अडीच हजार वर्षं कालनदीच्या पात्रावर तरली आहे. मानवी सभ्यता-संस्कृतीच्या मूलभूत मूल्यांना, स्वप्नांना, आकांक्षांना या ओंजळीतून नव्या कोवळ्या पिढीच्या ओंजळीत निगुतीनं सोपवण्याच्या माणसाच्या आंतरिक ऊर्मीतच प्राणिकथांच्या चिरंजीवित्वाची शक्यता सामावली आहे!

**स्वाती राजे**, पुणे
Mob. 98224 01876
swatijraje@gmail.com

मुलांसाठी
'पथेर पांचाली'

विभूतीभूषण
बंद्योपाध्याय

# जत्रेतील नाटक

चरक पूजा काही दिवसांवर आली होती आणि गावात सर्वत्र उत्साहाचे वातावरण होते. एके दिवशी वैद्यनाथ मजुमदार हरिहरकडे आला व म्हणाला, ''या वर्षी आपण उत्सव फार धूमधडाक्यात करणार आहो. मी वर्गणी गोळा करतो आहे. तुम्ही एक रुपया वर्गणी द्यावी अशी आमची इच्छा आहे.''

हरिहर म्हणाला, ''तुम्हाला माझी आर्थिक परिस्थिती माहीत आहेच. मी काही एक रुपया देऊ शकणार नाही.'' *

या वर्षी गावातील लोकांनी नीलमणी हाजराची नाटक कंपनी बोलावली होती. ही नाटक कंपनी आजूबाजूच्या भागात फार प्रसिद्ध होती. पूजेचा दिवस जसजसा जवळ येत चालला तसतसे गावात दूरदुरून संन्याशी येण्यास सुरुवात झाली. हे संन्याशी भजने गात गावातून फिरत व लोकांकडे भिक्षा मागत. गावातील बरीच माणसे त्यांना डाळ, तांदूळ, गहू किंवा गूळ देत. ते एकदा हरिहरकडेही भिक्षा मागण्यास आले. त्या वेळी सर्वजया त्यांना फक्त हलक्या प्रतीचा तांदूळ देऊ शकली. नंतर पुन्हा ते तिच्याकडे आले नाहीत. मात्र दुर्गा, अपू आणि गावातील बहुतेक मुले दिवसभर या संन्याशांच्या मागेमागेच फिरत.

संन्याशांची भजने बारा दिवस चालली. तेरावा दिवस हा शंकराच्या पूजेचा दिवस होता. मुलांना कुणीतरी सांगितले की, या दिवशी संन्याशी स्मशानात जातात आणि नाच करतात. उत्सवासाठी एका विशिष्ट झाडाची पाने व फांद्या तोडली जात. दुर्गाने बातमी आणली की, या वर्षी संन्याशांनी पाने तोडण्यासाठी एक वेगळेच झाड निवडले आहे. दुर्गा, राणू, पुती, टूनी या साऱ्याजणी ते झाड पाहण्यास गेल्या. अपूदेखील त्यांच्यासोबत गेला. वाटेत मुलांच्या गप्पाचा विषय संन्याशी व भुतांच्या करामती हाच होता. राणू म्हणाली, ''तुम्हांला माहीत आहे का? आज रात्री एक संन्याशी मेल्याचे सोंग करील. दुसरे त्याला स्मशानात नेतील. तेथे मंत्राने त्याला जिवंत केले जाईल. येताना ते काही खऱ्या कवट्या घेऊन येतील.''

''खऱ्या कवट्या?''

> अपू बाहेर आला आणि त्याने दोन पैशांचे शेंगदाणे विकत घेतले. तेवढ्यात त्याला राजकुमार अजयचे काम करणारा मुलगा दिसला. तो जवळजवळ अपूच्याच वयाचा होता. त्याला भूक लागली होती, तो दुसऱ्या एका नटाला काहीतरी खाण्यासाठी मागत होता. पण त्या नटाने त्याला काहीच दिले नाही. तो हिरमुसला झाला. ते पाहून अपूला फार वाईट वाटले. तो त्या मुलाकडे जाऊन त्याला म्हणाला, ''तुला थोडे शेंगदाणे पाहिजेत का?'' 'अजय'ने 'हो' म्हटले आणि अपूने आपल्याजवळील अर्धे शेंगदाणे त्याला आनंदाने दिले. दोघे जण एकमेकांचे मित्र बनले. अपूच्या आईने राजपुत्र अजयच्या अनेक गोष्टी अपूला सांगितल्या होत्या. त्यामुळे 'अजय' त्याला चांगलाच माहीत होता. हा मुलगा अजयची भूमिका करतो आहे हे पाहिल्यावर अपूला त्याच्याबद्दल अधिकच आकर्षण वाटू लागले.

* ही गोष्ट शंभर वर्षांपूर्वीची आहे. त्या वेळी एका रुपयात एका कुटुंबाचा महिन्याभराचा खर्च भागत असे.

‘‘हो. आज रात्री कुणी येथे आले तर त्याला ते दिसेल.’’

‘‘पण आजच्यासारख्या भयानक रात्री येथे कोण येणार?’’ एक जण म्हणाली.

‘‘आजच्यासारख्या म्हणजे?’’ अपूने विचारले.

‘‘ते समजून घेऊन तुला काय करायचे आहे? काही गोष्टी मुलांच्यासाठी नसतात. तू घरी जा बरे. राणू म्हणाली.’’

मुलीही घरी निघाल्या. मात्र त्या आपल्या गप्पांच्या नादात होत्या आणि अपू आजची रात्र भयानक आहे म्हणजे काय आहे याचाच विचार करीत होता. त्यामुळे काही वेळाने अपूच्या ध्यानात आले की, सारे जण पुढे निघून गेले आहेत, तो एकटाच मागे राहिला आहे. संध्याकाळ झाली होती. त्यातच आकाशात ढग जमा झाले, अंधार अधिकच भासू लागला. अपूला भीती वाटू लागली. त्यातच त्याला कसलातरी उग्र वास आला. हा कसला वास आहे, त्याला समजेना. तेवढ्यात त्याला दुरून एक म्हातारी येताना दिसली. तो अधिकच घाबरला. पण जवळ आल्यावर त्याला दिसले की ती त्याच्या मित्राची आजी आहे. त्याला थोडे हायसे वाटले. त्याने विचारले, ‘‘आजी, हा वास कसला आहे?

‘‘ ‘ते’ बाहेर पडले आहेत. तो हा वास आहे.’’ ती म्हणाली.

‘‘ ‘ते’ म्हणजे कोण?’’

‘‘आणखी कोण? तेच. शंकराचे सोबती. रात्रीच्या वेळी त्यांचे नाव घेत नसतात. राम...राम...राम...’’

अपूचे भय आणखी वाढले. तो थरथरत म्हणाला, ‘‘आजी, मी आता घरी कसा जाणार?’’

आजीला त्याच्या आवाजातील भीती जाणवली. ती म्हणाली, ‘‘तू या वेळी घराबाहेर आलासच का? ठीक आहे. माझी पूजा आटोपली की मी तुला तुझ्या घरी नेऊन सोडते.’’

0

गावातील मध्यवर्ती चौकात नाटकासाठी स्टेज उभारण्याचे काम जोरात सुरू झाले होते. अपू आणि त्याचे मित्र ज्या ठिकाणी कवड्या खेळायचे ती जागा आजूबाजूची झुडुपे तोडून रुंद आणि प्रशस्त बनविण्यात आली होती. आता सारा गाव नाटकात काम करणारी नटमंडळी केव्हा येते याची वाट पाहत होता. अपूला तर रात्री झोपदेखील येत नव्हती. ज्या दिवशी मंडळी येणार म्हणून नक्की बातमी आली त्या दिवशी अपू व त्याचे मित्र दुपारीच गावाबाहेर जाऊन त्यांच्या स्वागतास उभे राहिले. मोठ्या आकाराच्या पाच बैलगाड्यांतून नाटकासाठी लागणारे सामान आणले जात होते. सोबत नमुनेदार कपडे घातलेली अनेक माणसे चालत होती. मंडळींना जेथे उतरण्यासाठी जागा दिली होती तिकडे या गाड्या जात असताना गावातील सगळी मुले त्यांच्यामागून धावत होती.

मुलांनाच काय, सगळ्या गावालाच आनंद झाला होता. गाड्या आल्या हे सांगण्यासाठी अपू घरी आला. त्याने पाहिले, बाबा नाटकातील एक पद गुणगुणत होते. तो म्हणाला, ‘‘बाबा, किती गाड्या होत्या माहीत आहे? पाच. केवढे सामान होते! तुम्हांला कल्पनाही करता येणार नाही.’’

सकाळ झाली. आपण कधी घराबाहेर पडतो आणि जत्रा कधी सुरू होते असे अपूला झाले होते. मात्र नेमके त्या दिवशी बाबांनी त्याला पुस्तकातील एक धडा लिहून काढायला सांगितले. तो म्हणाला, ‘‘बाबा, मी जाऊ का? जत्रा सुरू झाली असेल.’’

मात्र बाबा म्हणाले, ‘‘अरे, जत्रा सुरू झाली की ते लाउडस्पीकरवरून सांगतील. तू आजचा अभ्यास पूर्ण कर आणि मग बाहेर जा.’’

अपू हिरमुसलेला चेहरा घेऊन आईकडे गेला आणि त्याने बाबांची तक्रार केली. त्याच्या डोळ्यांतील अश्रू पाहून सर्वजया हरिहरला म्हणाली, ‘‘आजच त्याने अभ्यास केला पाहिजे असे काही आहे का? तुम्ही वर्षातले नऊ महिने फिरतीवर असता त्या वेळी त्याचा अभ्यास कोठे असतो? जाऊ द्या त्याला. एक दिवस अभ्यास केला नाही तर काही बिघडणार नाही.’’

खरे तर नाटक संध्याकाळी सुरू होणार होते. पण अपू दिवसभर त्या मंडळींच्या आगेमागेच फिरत राहिला. त्यांचे पोशाख, त्यांचे बोलणे-चालणे, त्यांनी सोबत आणलेले सामान, वगैरे इतके चमत्कारिक होते की अपूने त्यापैकी कित्येक वस्तू तर कधीच पाहिल्या नव्हत्या. भूक लागली म्हणून नाइलाजाने तो दुपारी घरी परतला आणि कसेबसे चार घास खाऊन पुन्हा बाहेर पळण्याच्या विचारात होता तर हरिहरने त्याला पुन्हा पकडले. तो म्हणाला, ‘‘नाटक संध्याकाळी सुरू होणार आहे. आताच जायची गरज नाही. मी तुला शुद्धलेखन सांगतो. ते मला लिहून दाखव आणि मग जा.’’

शुद्धलेखन लिहून दिल्यावर कशीबशी अपूची सुटका झाली. जाण्यापूर्वी दुर्गा हलकेच त्याला म्हणाली, ‘‘अपू, आईला सांग ना! म्हणावे दीदीलाही जत्रा पाहायला जाऊ दे.’’

अपू आईला म्हणाला, ‘‘आई, दीदीला माझ्याबरोबर येऊ दे ना! तेथे बायकांसाठी खास सोय केली आहे. दीदी तेथे बसू शकेल.’’

आई म्हणाली, ‘‘नको. मी नंतर जाणारच आहे. दुर्गा माझ्यासोबत येईल.’’

आई आपल्याला नेते म्हणाली याचा दुर्गाला आनंद झाला. तिने अपूला बोलाविले व हळूच त्याच्या हातात दोन आणे देत ती म्हणाली, ‘‘भूक लागली तर काही घेऊन खा.’’

0

मागच्या महिन्यात अपूने दुर्गाला एकदा पैसे मागितले होते.

‘‘तुला पैसे कशासाठी हवे आहेत?’’ दुर्गाने विचारले होते.

‘‘मी आज पाहिले, बाजारात पिकलेल्या लिची आल्या आहेत. एका पैशाला सहा. अशा मोठमोठ्या, लालभडक. त्या मला घ्यायच्या होत्या...तुझ्याजवळ एक पैसा आहे का दीदी?’’ पण दुर्गाजवळ त्या वेळी एक पैसाही नव्हता. त्याचा हिरमुसला चेहरा पाहून तिला फार वाईट वाटले होते. तिच्या भावावर तिचे अतिशय प्रेम होते, आणि त्याची साधी इच्छाही आपल्याला पूर्ण करता येत नाही याचे तिला दुःख झाले. काही दिवसांपूर्वी हरिहर गावाहून आल्यानंतर तिने काही सामान आणण्यासाठी म्हणून त्याच्याकडून दोन आणे मागून घेतले होते. ते तिने अपूला देण्यासाठी जपून ठेवले होते.

पैसे हातात आल्यावर त्याचा चेहरा खुलला. तो चेहरा पाहूनच दुर्गाला खूप आनंद झाला.

संध्याकाळ झाली आणि नाटक सुरू झाले. पाहतापाहता अपूचे नेहमीचे ओळखीचे जग मागे पडले, आणि एक अनोळखी, जादूने भरलेले जग त्याच्यासमोर उलगडू लागले. आता तो होता आणि त्याच्यासमोर नाटकातली ती पात्रे होती जी त्याला खरीच वाटत होती. नाटक सुरू होण्यापूर्वीच काही गायक-वादकांनी मंचावर येऊन गाणी म्हणण्यास सुरुवात केली. अपूने इतके सुंदर आणि मधुर संगीत कधीच ऐकले नव्हते. त्याच्या मनाच्या तारा त्या संगीताने छेडल्या होत्या. रंगमंचावर वावरणाऱ्या पात्रांचे पोशाख भरजरी होते आणि त्यांनी भडक असा मेकअप केला होता. पण अपूला तो भडकपणा हा दोष वाटत नव्हता. उलट त्याचे लक्ष त्या हावभावांवर अधिकच खिळले होते. तो भान हरपून त्यांच्याकडे पाहत होता. मंचावर मोठे कंदील लटकवलेले होते, त्यांचा प्रकाश वातावरणाला अधिकच प्रभावी करीत होता. तेवढ्यात त्याला पाठीमागून आवाज ऐकू आला, ‘‘तुला नीट दिसते आहे ना, अपू?’’

हा हरिहरचा आवाज होता. गर्दीतून अपूला शोधत तो त्याच्या मागे येऊन बसला होता.

‘‘दीदी आली आहे ना, बाबा?’’ अपूने विचारले.

‘‘हो. तिकडे बायकांत, तिच्या आईसोबत बसली असेल.’’

अपू पुन्हा नाटकाकडे लक्ष देऊ लागला. राजाच्या विरुद्ध त्याच्या मंत्र्याने कट-कारस्थान केल्यामुळे राजाला त्याची पत्नी आणि मुलांसोबत वनवासात जावे लागते. हा प्रसंग पाहताना अपूच्या डोळ्यांत पाणी आले. पुढच्या प्रसंगात राजाची मुले अजय आणि इंदुलेखा रानात रस्ता चुकतात. नंतर त्या दोघांचीही ताटातूट होते. इंदुलेखा भुकेने व्याकूळ होऊन काही रानफळे खाते. ती विषारी असतात, त्यामुळे ती मरण पावते. राजपुत्र अजय तिचा शोध घेत भटकत असताना त्याला ती नदीच्या किनारी मारून पडलेली दिसते. तो एक अतिशय करुण गीत गाऊ लागतो. ते गाणे ऐकताना तर अपूला अश्रू आवरेनात.

नंतर आलेला कलिंगचा राजा आणि विचित्रकेतू यांच्यातील लढाईचा प्रसंग मात्र सारे काही विसरावयास लावणारा होता. काय जबरदस्त लढाई होती ती! एवढ्या त्वेषाने ते आपल्या तलवारी फिरवू लागले की प्रेक्षकांना मंचावरील दिवे फुटतील की काय याची भीती वाटू लागली. ‘‘दिवे सांभाळा, दिवे सांभाळा’’ ते ओरडू लागले.

काही वेळानंतर हरिहरने मागून आवाज दिला, ‘‘अपू, तू पेंगतो आहेस. आपण घरी जायचे का?’’

पण आपण पेंगतो आहो हे अपूला मान्य नव्हते. तो घरी येण्यास तर मुळीच तयार नव्हता. मग हरिहरने त्याला दोन पैसे दिले व तो म्हणाला, ‘‘हे पैसे घे आणि तुला खाण्यासाठी काही पाहिजे असेल तर घेऊन खा. मी घरी चाललो.’’

अपू बाहेर आला आणि त्याने दोन पैशांचे शेंगदाणे विकत घेतले. तेवढ्यात त्याला राजकुमार अजयचे काम करणारा मुलगा दिसला. तो जवळजवळ अपूच्याच वयाचा होता. त्याला भूक लागली होती, तो दुसऱ्या एका नटाला काहीतरी खाण्यासाठी मागत होता. पण त्या नटाने त्याला काहीच दिले नाही. तो हिरमुसला झाला. ते पाहून अपूला फार वाईट वाटले. तो त्या मुलाकडे जाऊन त्याला म्हणाला, ''तुला थोडे शेंगदाणे पाहिजेत का?''

'अजय'ने 'हो' म्हटले आणि अपूने आपल्याजवळील अर्धे शेंगदाणे त्याला आनंदाने दिले. दोघे जण एकमेकांचे मित्र बनले. अपूच्या आईने राजपुत्र अजयच्या अनेक गोष्टी अपूला सांगितल्या होत्या. त्यामुळे 'अजय' त्याला चांगलाच माहीत होता. हा मुलगा अजयची भूमिका करतो आहे हे पाहिल्यावर अपूला त्याच्याबद्दल अधिकच आकर्षण वाटू लागले. जत्रेच्या दिवसांतील नाटकात जी माणसे भूमिका करीत त्यांना गावातील लोक आपल्या घरी जेवायला बोलावीत. अपूने 'अजय'ला दुसऱ्या दिवशी आपल्या घरी जेवण्यास बोलाविले. तो मुलगा म्हणाला,

''तुला माझे गाणे कसे वाटले?''

''खूपच छान.''

''आता यानंतर माझे आणखी एक गाणे आहे. ते ऐक. मी जेवायला येईन. पण नाटक संपायलाच रात्रीचे बारा वाजून जातील. मी उद्या दुपारी आलो तर चालेल काय?''

अपू म्हणाला, ''ठीक आहे. मी तसे आईला सांगतो.''

तेवढ्यात पुढला अंक सुरू होण्याची घंटा झाली व 'अजय' धावतच मंचाकडे गेला. त्या दिवशी नाटक इतके रंगले की ते संपले तेव्हा मध्यरात्र होऊन गेली होती. नाटक संपले तरी अपूच्या डोक्यात ते चालूच होते. त्याला नाटकातील प्रसंग आठवत होते, कित्येक वाक्ये आठवत होती, त्याच्या मनात नाटकातील पदांच्या चाली फेर धरून नाचत होत्या. इतका उशीर झाला तरी अपू घरी आला त्या वेळी त्याची आई आणि दुर्गा दोघीही जाग्या होत्या व त्याची वाट पाहत होत्या. दुर्गाने त्याला नाटकाबद्दल अनेक प्रश्न

पथेर पांचाली सिनेमात अपू आणि दुर्गा



विचारले. पण गम्मत म्हणजे त्याच्या डोक्यात मात्र भावाला हाका मारणाऱ्या इंदुलेखाचाच आवाज घुमत होता. मात्र झोपण्यापूर्वी तो आठवणीने आईला म्हणाला,

''आई, नाटकात अजयचे काम करणाऱ्या मुलाची व माझी मैत्री झाली आहे. मी त्याला उद्या घरी जेवायला बोलावले आहे.''

ते ऐकून सर्वजया काळजीने म्हणाली, ''अपू, आपल्याकडे कुणी दुसरा नट येणार होता ना? मी दोघादोघांना जेवण कुठून घालणार?''

अपू म्हणाला, ''तो दुसरा नट येणार नाही. फक्त 'अजय'च येणार आहे.''

रात्री अंथरुणावर पडल्यावर अपूला लवकर झोप आली नाही. नाटक पाहण्याचा हा अनुभव त्याला इतका मोहित करून गेला होता की, झोपेतही त्याला नाटकातील प्रसंग दिसत होते. संगीत ऐकू येत होते. दुसऱ्या दिवशी त्याला लवकर जाग आली नाही. डोळ्यांवर ऊन आल्यामुळेच तो उठला. सकाळी दुर्गा त्याला उठविण्यास आली तेव्हा त्याला वाटले, नाटकातील राजकन्या इंदुलेखाच आपल्याला उठवीत आहे. कालच्या नाटकात इंदुलेखाचे काम एका मुलाने केले होते. ते काम चांगले होते. पण अपूला वाटले की आपली बहीण खरी इंदुलेखा आहे. तिने ते काम कितीतरी चांगले केले असते. तिचे डोळे किती सुंदर आहेत!

दुपारच्या वेळी अपू आपल्या मित्राला बोलावण्यासाठी गेला. दोघे जण घरी आल्यावर सर्वजयाने त्यांना जवळजवळ बसविले व ती अजयला अनेक प्रश्न विचारू लागली. अजयने सांगितले की तो एका गरीब ब्राह्मणाचा मुलगा असून, त्याचे आईवडील तो लहान असतानाच मरण पावले आहेत. आता त्याचे जवळचे असे कुणीच नाही. त्याचा आवाज चांगला असल्यामुळे या नाटक कंपनीच्या मालकाने त्याला आपल्या कंपनीत ठेवून घेतले आहे. हे ऐकून सर्वजयाला फार वाईट वाटले. तिने जे काही पदार्थ बनविले होते ते आग्रह करून त्याला खाऊ घातले. जेवण झाल्यानंतर दुर्गा आईला म्हणाली, ''आई, काल अजयने इतके छान गाणे म्हटले! त्याला ते म्हणायला सांग ना.''

''म्हण की रे!'' सर्वजया अजयला आग्रह करीत म्हणाली.

अजयने ते गाणे म्हणण्यास सुरुवात केली. त्या गाण्याचे करुण सूर आणि शब्द ऐकून सर्वजयाच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. जगात आपले असे म्हणण्यासारखे कुणीच नसणाऱ्या त्या पोरक्या मुलाविषयी करुणेने तिचे मन भरून गेले. तो जाताना ती म्हणाली, ''तू जोपर्यंत येथे आहेस तोपर्यंत रोज आमच्याकडे जेवायला येत जा. लाजू नकोस.''

जेवणानंतर दोघे मित्र गावात भटकण्यासाठी निघाले. अपू अजयला नदीच्या किनारी घेऊन गेला. वाटेत अजय म्हणाला, ''अपू, तुझी आई म्हणत होती की तूसुद्धा छान गाणे म्हणतोस. मला एखादे म्हणून दाखव ना.''

अपूलाही गाणे म्हणून दाखवावे वाटत होते, पण त्याला थोडी लाज व थोडी भीतीही वाटत होती. शेवटी अजय हा मोठ्या गावात राहणारा, नाटकात काम करणारा नट होता. त्याच्यासमोर गाणे म्हणायचे म्हणजे...त्याला जर आवडले नाही तर? पण गाणे म्हणण्याची इच्छाही त्याला गप्प बसू देईना. तसेही ते गावापासून दूर आले होते. येथे त्यांचे गाणे ऐकणारे दुसरे कुणी नव्हते. त्याने वडिलांनी शिकविलेले एक गाणे म्हणावयास सुरुवात केली. त्याचा आवाज ऐकून अजय आश्चर्यचकित झाला. खेड्यातील एका मुलाचा आवाज इतका सुरेल असू शकेल असे त्याला वाटलेच नव्हते. तो म्हणाला, ''अपू, तुझा आवाज तर फार सुरेख आहे. तू गाणे शिकत का नाहीस? लोक तुझे गाणे आनंदाने ऐकतील. आणखी एक गाणे म्हण ना.''

अपूला आता फारसा आग्रह करावा लागला नाही. दुर्गाने त्याला शिकविलेले एक गीत त्याने म्हणावयास सुरुवात केली. दुर्गा हे गाणे कोठूनतरी शिकून आली होती व तिने अपूलाही ते शिकविले होते. घरी कुणी नसताना ते दोघे मिळून हे गाणे म्हणत.

अजय म्हणाला, ''अपू, तू एखाद्या नाटक कंपनीतच जायला हवे. त्यांना उत्तम गाणाऱ्यांची फार गरज असते. ते तुला महिन्याला पंधरा रुपयेसुद्धा देतील. पण एक आहे, कंपनीत गाण्याची प्रॅक्टिस मात्र खूप करावी लागते.''

अपू म्हणाला, ''तू आईसमोर जे गाणे म्हणालास ते मला शिकवशील का?''

अजयने त्याला ते गाणे शिकविले आणि मग दोघे मिळून ते गाणे गाऊ लागले. असा कितीतरी वेळ गेला. गाणी संपल्यावर काही काळ ते शांतपणे एकमेकांसोबत बसून राहिले. मग अपू म्हणाला, ''अजय, तू आमच्या बरोबरच का राहत नाहीस?''

या प्रश्नाच्या उत्तरादाखल अजयने आपली स्वप्ने त्याला

सांगितली. ज्याला तो हे सारे सांगू शकेल असा कुणी जिवाभावाचा मित्र त्यालाही आजवर मिळाला नव्हता. त्याला एका मोठ्या नाटक कंपनीत जायचे होते. आणखी चांगल्या, मोठ्या भूमिका करायच्या होत्या. एखाद्या खेड्यात राहून ते शक्य नव्हते. त्याचा सध्याचा मालक अनेकदा त्याला मारतो, वेळेवर आणि पोटभर जेवण देत नाही. जो काय थोडासा पगार मिळतो त्यातून अजयने चाळीस रुपये जमविले आहेत. आणखी थोडे जमले की तो ही कंपनी नक्कीच सोडणार. त्याने एक कंपनी पाहूनही ठेवली होती. त्या कंपनीत रोज जेवणाबरोबर लिची दिली जाते. आणि जर आपल्याला जेवायचे नसेल तर तीन आणे दिले जातात...

संध्याकाळ झाली तेव्हा या दोन मित्रांना आपल्या गप्पा नाइलाजाने आवराव्या लागल्या.

जत्रा आणखी तीन दिवस चालली. जोपर्यंत गावात जत्रा होती तोपर्यंत गावकऱ्यांना बोलण्यासाठी दुसरा विषयच नव्हता. रस्त्यावरून चालणारी माणसे, तळ्यावर पाणी भरणाऱ्या बायका, नाव चालविणारे नावाडी एवढेच नव्हे- तर गुरे हाकणारे गुराखीदेखील नाटकातील गाणी म्हणू लागले. या काळात अपूने अजयकडून आणखी तीनचार गाणी शिकून घेतली. एके दिवशी अजय त्याला आपल्या कंपनीतील सोबत्यांकडे घेऊन गेला. त्या माणसांना त्याने अपूविषयी खूप गोष्टी सांगितल्या होत्या त्यामुळे तो भेटताच त्यांनी त्याला गाणे म्हणण्याचा आग्रह केला. अपूने प्रथम खूप आढेवेढे घेतले; पण त्याला गाणे म्हणावेच लागले. त्यांना त्याचे गाणे फार आवडले, ते त्याला घेऊन कंपनीच्या मॅनेजरकडे गेले. आता अपूला त्याच्यासमोरदेखील गावे लागले. ते गाणे ऐकू मॅनेजर इतका खूश झाला की त्याने लगेच अपूला आपल्या कंपनीत काम करण्यास येण्याचे निमंत्रण दिले. मात्र तो म्हणाला की, काही दिवस अपूला लहान मुलीच्या वगैरे किरकोळ भूमिका कराव्या लागतील. अपूला तर लढाई करणारा राजपुत्र किंवा वीर व्हायचे होते. त्याने आणखी थोडा मोठा झाल्यावर नाटक कंपनीत जाण्याचे मनात ठरविले.

जत्रेतील शेवटचे नाटक झाले आणि दुसऱ्या दिवशी कंपनी पुढील गावाला जाण्यासाठी निघाली. हे पाच दिवस अजय रोज अपूच्या घरी दुपारी जेवण्यासाठी येत होता. त्याला हे घर आपलेच वाटत होते. अपू तर त्याला आपला भाऊच समजत होता. पण सर्वजयादेखील आपल्या मुलाप्रमाणे त्याच्यावर प्रेम करू लागली होती. दुर्गालाही तो खूप आवडला होता. तिने त्याच्याकडून काही गाणी शिकून घेतली. अजयच्या आयुष्यातील हा प्रेमाचा पहिला अनुभव होता. आजवर त्याला कुणी जेवलास का, असेदेखील विचारले नव्हते. आज त्याचे पोट भरल्यावरदेखील आणखी खाण्याचा आग्रह करणारी आई त्याला भेटली होती. त्याला या माणसांपासून दूर जावेच वाटत नव्हते.

पण शेवटी त्याला जावे लागलेच. निरोपाचा क्षण आला आणि अचानक त्याच्या मनात एक विचार आला. त्याने आपल्या पिशवीत हात घातला व त्याच्या जवळच्या साठवलेल्या पैशांतून पाच रुपयांची एक नोट काढून तो सर्वजयाला देऊ लागला. तो म्हणाला, ''या पैशांनी दीदीच्या लग्नात माझ्याकडून तिला साडी घ्या.''

पण सर्वजया त्याच्याकडून पैसे कसे घेणार होती? ती म्हणाली, ''अरे, तू दीदीसाठी काही करू पाहतोस ही चांगली गोष्ट आहे. पण मी तुझ्याकडून पैसे घेणार नाही. या पैशांची तुला अधिक गरज आहे.''

अजयने खूप आग्रह केला. पण सर्वजयाने त्याला ते पैसे परत पिशवीत टाकावयास लावले. सारे जण फाटकापर्यंत त्याला निरोप देण्यासाठी गेले. अजय वळला. दिसेनासा झाला. सर्वजया मनाशी म्हणाली, ''लहान असून कसा मोठ्यासारखं वागतो आहे हा मुलगा! बिचाऱ्याला या वयात जगण्यासाठी किती कष्ट करावे लागतात! किती दुर्दैवाची गोष्ट!''

अनुवाद : **विजय पाडळकर**, पुणे
vvpadalkar@gmail.com
Mob. 9867598836

जानेवारी २०२२ अखेर येत आहे...

साधना प्रकाशनाचे नवे पुस्तक
**मुलांसाठी विवेकानंद**
- दत्तप्रसाद दाभोळकर

संपर्क : साधना प्रकाशन
Ph. : 020-24459635

गावगोष्टी

मल्हार अरणकल्ले

# शिमग्याची सोंगं

गावात होलिकोत्सवाची नुसती धमाल असे. मोठ्या वाड्यांच्या प्रशस्त अंगणात किंवा वाड्या-वस्त्यांत होळ्या पेटायच्या; पण तरीही गावाची म्हणून एक मोठी होळी पेटविली जायची. नाथाच्या देवळापुढचं मैदान म्हणजे कुठल्याही सार्वजनिक उत्सवाचं-कार्यक्रमाचं ठरलेलं ठिकाण. गावाची होळीही तिथंच होई. गावकरी मंडळींना या होळीचे वेध आधीपासूनच लागलेले असत. तरुणांचा उत्साह त्यात मोठा असे. आधीच्या दोन-तीन आठवड्यांपासून त्यांच्या शोधक नजरा गावभर भटकू लागत. होळीत टाकण्यासाठी चांगली वाळलेली लाकडं कुठं कुठं आहेत, ते या नजरा डोळ्यांत बंद करून ठेवीत. कुणाच्या घरांच्या परसांत वाळलेल्या लाकडांचे मोठे ओंडके साठवलेले आहेत, कुणाच्या उंच लाकडी शिड्या बऱ्याच दिवसांपासून घराबाहेर खुंट्यांना लटकावून ठेवलेल्या आहेत, कुठं सरपणाचे ढीग आहेत, कडब्याच्या गंजी एकत्रित कुठं आहेत, बंबफोडीच्या तुकड्यांच्या, हातांच्या मुठींतही न बसू शकणाऱ्या कोळशांच्या गोण्या कुठं भरून ठेवलेल्या आहेत, शेलकी- मोठी लाकडं वखारीत कुठल्या बाजूला आहेत, त्यांची खडान्खडा माहिती या तरुणांनी जमा करण्याचा सपाटाच लावलेला असे. कुठल्या आडांवरचे लाकडी रहाट लांबविता येतील, कुणाच्या पडवीतील जुन्या लाकडी टेबल-खुर्च्यांवर हात मारता येईल, कुणाचे पलंग किंवा त्यांच्यावर ठेवायच्या लाकडी फळ्या हातोहात उचलता येतील, त्याच्या योजना या मंडळींच्या डोक्यात पक्क्या झालेल्या असत. अशा भटकत्या मंडळींच्या 'व्रात्य' नजरांना काही दिसणारच नाही, या दृष्टीनं काहींनी आधीच 'व्यवस्था' करून ठेवलेली असे. काहींची ही व्यवस्था यशस्वी ठरे; पण असलीही काही ठिकाणं चाणाक्ष तरुणांनी नोंदवून घेतलेली असत. आपल्या मालकीचं असलं काही 'घबाड' गायब झाल्याचं बहुतेकांना ते तिथून नाहीसं झाल्यावरच कळायचं. गावात आणखीही एक रीत पडलेली होती : असल्या गोष्टींबद्दल कुणाला दोष द्यायचा नाही, कुणावरही ठपकाही ठेवायचा नाही आणि भांडण वगैरे तर करायचंच नाही. त्यातूनही एखादा तक्रारदार पुढं आलाच, तर त्याचा सामूहिक 'उद्धार'

समईनृत्यातली ही 'नर्तकी' कोण? नंतर चौकाचौकांत हा प्रश्न रंगत असे; आणि प्रत्येक ठिकाणी तो अनुत्तरित राहून पुढच्या चौकात पुन्हा नव्यानं पडत राही. सर्वांत शेवटच्या चौकात तो शोध लागे. आणि नर्तकीची ओळख पुढं येई : ती नर्तिका म्हणजे बाबू कुंभार! कुणाचाही त्यावर विश्वासच बसायचा नाही. गावात बाबू कुंभाराचं हॉटेल होतं. तो कायम तिथं दिसे. कधी चहाची उकळी पातेल्यात ओगराळ्यानं फिरविताना. कधी भज्याचे खमंग घाणे तळताना. कधी शेव-पापडी तयार करताना. कधी बुंदी पाडताना. जिलेबी करताना. कधी भेळीचे पुडे बांधून देताना. बाबू कुंभार. मध्यमवयीन. गोरापान. अंगानं चांगलाच मजबूत, काहीशा नाजूक आवाजाचा. गरीब स्वभावाचा. त्याचा आवाज कधीच चढायचा नाही. बाबू कुंभार म्हणजे ती नर्तिका, हे काही केल्या खरं वाटत नसे.

पेटलेल्या होळीच्या साक्षीनं होणार, हे जवळजवळ ठरलेलंच असे. त्यामुळंही सहसा कुणीच अशा 'तक्रारी'च्या भानगडीत पडत नसे. कुणाचं काय उचलून नेलं, त्याच्या चर्चांच्या वावटळी गावात पुढचे कित्येक दिवस फिरत राहत आणि ते गावगप्पांचे विषय होऊन जात.

होळीच्या निमित्तानं असला 'खोडकरपणा' होत राही; आणि त्याचीही एक धमाल रंगून जाई. होळीच्या सणाचं आणखी एक आकर्षण असे. ते आकर्षण होतं 'सोंगां'चं. कोकणात तर ही प्रथाच आहे. देशावर मात्र ती क्वचितच आढळते; मात्र आमच्या गावात तेव्हा तरी अशी सोंगं आणली जायची. सोंग म्हणजे आपण जे नाही, ते वठविणं. म्हणजे माणूस मुळात वेगळा, त्याचा व्यवसाय-कामधंदा वेगळा; पण तो वठवितो, ते सोंग मात्र त्यापेक्षा किती तरी भिन्न. ते केवळ वेशांतर नसे. आवाजाची पट्टी, बोलण्याची ढब, हावभाव, विशिष्ट लकबी यांची ती अगदी हुबेहूब नक्कल असे. 'हा मूळचा आहे तरी कोण?' असा प्रश्न वारंवार पडावा, इतक्या या भूमिका हुबेहूब असत. त्यातलं कुणीही कलाकार नव्हतं. कलेच्या शिक्षणाची बातच सोडा, त्याचं साधं शिक्षणही जुजबी अक्षरओळख आणि अंकओळख यांपलीकडं सरकलेलं नव्हतं. मग या मंडळींत एवढ्या विविध कला आल्या कुठून? या विद्यांत त्यांना कुणी गुरू नव्हता, ना त्यांनी कुणाचा गंडा बांधला होता. आणखी एक गंमत म्हणजे, सोंग वठविण्यापुरता काळ सोडला, तर ही माणसं पुन्हा त्यांच्या मूळ कामाधामांत दिसायची. त्यांचं कौतुक कुणी करायचं नाही आणि त्यांनाही तशी काही अपेक्षा असायची नाही. त्यांचे रोजचे पेहरावही तेच असायचे. साधे. फाटलेल्या जागी ठिगळांचे जोड दिलेले. रंग उडून गेलेले.

होळी धडाडली म्हणजे मोठमोठी लाकडं, गोवऱ्यांचे ढीग टाकून ती आणखी पेटती राहण्याची व्यवस्था केली जाई. पिवळट-केशरी ज्वाळांची धाव दहा-बारा फुटांपर्यंत उंच झेपावत असे. ज्वाळांची वरची टोकं पाहताना काहींच्या डोक्यांवरच्या टोप्या घरंगळून खाली पडत; आणि काहींचे खोडकर हात या टोप्या उचलून होळीच्या पोटात भिरकावून देत. ज्वाळा बघण्यात गुंग झालेल्याचा हात टोपी सारखी करायला डोक्यावर जाई; तेव्हाच 'काय होऊन गेलं आहे' याची कल्पना त्याला येई आणि टोप्या भिरकावण्याच्या खेळात मग तोही सरसावून पुढं होई. होळीचा आकार चांगला गोलाकार झाला, म्हणजे घराघरांतून पुरणपोळीच्या नैवेद्याची ताटं नाथाच्या देवळाच्या दिशेनं निघालेली असत. वेगवेगळ्या रंगांच्या दोऱ्यांनी विणलेले रुमाल अंथरलेली नैवेद्याची ताटं घेऊन, जरीच्या नव्या साड्यांतल्या स्त्रिया एका हातानं जरीकाठाची पट्टी डोक्यावरून इकडंतिकडं सरकणार नाही, याची दक्षता घेत चाललेल्या असत. पाण्यानं भरलेला गडू किंवा तांब्या घेऊन एखादं पोर धांदरटपणानं पावलं उचलीत तिच्या आगंमागं चाललेलं असे. नाथाच्या देवळाच्या परिसरात पेटत्या होळीचा भगभगता उजेड सगळीकडं पसरलेला असे. भरारत्या वाऱ्याबरोबर होळीची धगही जाणवत असे. ''आजूबाजूची झाडं तेवढी सांभाळा रे बाबांनो,'' असे काही वयस्क आवाज 'कारभाऱ्यां'ना दिले जात. या आवाजांची दखल घेतल्याचा देखावा करण्यासाठी होळीच्या आजूबाजूनं थांबलेले कारभारी काही हालचाली करीत, आणि होळीच्या ज्वाळा पुन्हा आधी होत्या, तशाच उंच उंच होत जात.



घरोघरी पुरणपोळीचा तृप्त बेत असे. 'होळी रे होळी, पुरणाची पोळी' ही पारंपरिक घोषणा आधी सगळ्यांच्या ओठांत, आणि मग भरलेल्या पोटांत जाऊन बसलेली असे. घराबाहेर पडवीत किंवा अंगणात मंडळींची शतपावली सुरू होत असे. पुरणपोळीच्या जेवणानंतर ती आवश्यकच असे; पण मंडळींचा आणखी एक हेतू असे. थोड्या वेळातच 'शिमग्याची सोंगं' सुरू व्हायची असत. बाहेरची ये-जा वाढल्यावर किंवा कुणाकडं विचारपूस केल्यावर 'सोंगं' कधी निघणार, त्याचा नेमका अंदाज येत असे. आटीव केशरदुधाच्या पृष्ठभागावर तरंगताना दिसणारं पिवळेपण घेऊन पौर्णिमेचं चांदणं आकाशातून निथळत असे. त्या दाट प्रकाशात अख्खं गाव न्हाऊन गेलेलं असे. रात्रीच्या कुठल्याही प्रहरी रस्त्यावर मुक्तपणे फिरण्याचा परवाना या चांदण्यानं बहाल केलेला असे. हलगी कडकडू लागल्याचा तरणाबांड आवाज गावाच्या एखाद्या कोपऱ्यातून यायचा आणि सारं गावच त्या ठेक्यांबरोबर ताजंतवानं होऊन सरसावून बसायचं. हा आवाज यायचा गावातल्या एखाद्या चौकातून. गावाच्या रचनेत या चौकांचं वेगळेपण होतं. यात्रेच्या वेळी ग्रामदैवताची पालखी नगरप्रदक्षिणेसाठी निघे. गावाच्या बाजारपेठेच्या रस्त्यावर मधेमधे अशा चौकांचे थांबे लागत. या प्रत्येक चौकात पालखी उभी राही. मधली काही जागा मोकळी ठेवून बाजूनं गर्दीचा गोल उभा होत असे; आणि ढोल-लेझिमांची नजरबंदी करणारा 'कडक' डाव तिथं काही वेळ रंगत असे. शिमग्याच्या सोंगांचं सादरीकरण त्याच ठिकाणी व्हायचं. हलगी जोरजोरानं घुमायला लागली, म्हणजे कान टवकारले जात आणि मंडळी त्या चौकात हजर होत. चांदणं असलं, तरी तिथं तीन-चार गॅसबत्त्या पेटविलेल्या असायच्या. तो झगमगता प्रकाशही गर्दी ओढून घ्यायचा. पाहता पाहता चौक भरून आणि बहरूनही जाई. कडाडणाऱ्या हलगीचा आवाज वारा पडावा तसा मधेच थांबे आणि तोच 'कडकपणा' पकडून गर्दीतून पुढं निवेदकाचा आवाज सुरू होई : ''कोळ आलं बघा! डोळे मोठे करून बघा. चश्मे लावून बघा. आला, आला, घोडेस्वार आला! सावरून उभे राहा. घोडं थोडं नाठाळ आहे. मधेच गर्दीत घुसतं. घोडेस्वाराला नाचविता नाचविता अचानक भिरकावूनही देतं.'' कान सावध व्हायचे. उत्सुक नजरा डोळ्यांतून बाहेर पडायच्या. गर्दीतून वाट काढीत घोडेस्वार पुढं यायचा. डोक्याला जरीकाठी पागोटं. वाऱ्यावर लहरणारा त्याचा सोगा. घोडेस्वारानं रुबाबात ठोकलेली मांड, घोडाही ऐटदार. थोराड. उंच उभारलेले कान. विस्फारलेले डोळे. फुरफुरणाऱ्या नाकपुड्या. घोडेस्वारानं वेसण खेचताच नृत्य बदलतं. घोडेस्वाराचे केस लांब. पागोट्याखालून पाठीवर रुळणारे. रंगविलेला चेहरा. लाल. पिवळा. कपाळावर मळवट. त्यावर वर्खाची नक्षी. गिरक्या घेत घोडा नाचत राही. पायांतल्या घुंगरांचा शब्द त्याबरोबर साथ देत राही. घोडेस्वार मधूनच कमरेची तलवार उपसून नाचवायचा. कधी गर्दीच्या बाजूला घोडा हाकायचा. घोडेस्वारानं तलवार पुढे करण्याआधीच गर्दीत पळापळ व्हायची. नाचण्यात रंगलेला असतानाच घोडा अचानक दिसेनासा व्हायचा. गर्दीत चर्चा सुरू व्हायची : कोण होता? काही नावं पुढं यायची. 'हो-नाही'ची उत्तरं गोलाकारात फिरत राहायची. नंतर कळायचं : हा आपला पंडा होता. पंडा म्हणजे पंढरीनाथ; पण सगळा गाव ओळखायचा ते पंडा म्हणूनच. घोडेस्वाराचा रंगविलेला चेहरा आठवणीतून नजरेपुढं आणला, की त्याच्याशी पंडाची ओळख पटायची. पंडा पेशानं चर्मकार. रोज येता-जाता दिसायचा. हसून हात करायचा. चपला-बूट सांधीत बसायचा. कधी कुणाच्या पायाचे आकार पेपरच्या कागदावर काढून त्याबरहुकूम चपला बांधायचा. त्याची अभिनयाची ही हुनर 'शिमग्याच्या सोंगा'तच लक्षात यायची.

तेवढ्यात पुढच्या आकर्षणाची घोषणा सुरू होई. ''मंडळी लक्ष द्या. नीट ऐका. आता येणार आहेत सोवळ्यातले बामन आन् त्यांचा नाऱ्या. बामन लई कडक हा. त्येला शिवू नका.'' अचानक एक काहीशा कृश अंगकाठीचे, उंचेपुरे, गोरेपान 'बामन' एका हातात ताम्हण घेऊन लगबगीनं यायचे. शुभ्र धोतर. खांद्यावर उपरणं. त्यांना उपरणं सारखं करण्याचा चाळा. दुसऱ्या हातात घंटी. एकसारखी किणकिणणारी. अंगावर फक्त उपरणंच. कपाळावर भस्माचे तीन आडवे पट्टे. त्याच्या मधोमध एक गंधाचा टिळा. भुरूभुरू उडणारी लांब शेंडी. तोंडानं स्तोत्र पुटपुटणारे. नजर मागं वळून सारखं काहीतरी शोधणारी. मधेच अनुनासिकातल्या आवाजात त्यांची त्रासिक विचारणा : ''अरे नाऱ्या, आहेस कुठे?'' नाऱ्या मागं कुठंतरी गर्दीत. घाबराघुबरा. गोंधळलेला. 'बामनकाकां'चे कुलदीपक शोभेल असंच पात्र. उंच. काटकुळं. कमरेला फक्त पंचा. त्या कुडीचा वस्त्राशी तेवढाच संबंध. ''अरे नाऱ्या, आहेस कुठं?'' या प्रश्नाला नारायणाचं चिरक्या

आवाजातलं उत्तर; तेसुद्धा अनुनासिकच : ‘‘हे काय तुमच्याच मागे.’’ पुन्हा प्रश्न : ‘‘मागे दिसला नाहीस तें!’’ नारायण : ‘‘पावलांवर पाऊल ठेवतो तुमच्या, मग दिसू कसा?’’ काका विचारतात : ‘‘अरे नाऱ्या, पळीपंचपात्र कुठें?’’ उत्तर : ‘‘अहो, मी बसलों होतों तिथें!’’ प्रश्न : ‘‘बसला होता कुठें?’’ उत्तर : ‘‘पळीपंचपात्र होतें तिथें!’’ हे सवाल-जबाब वेगवेगळ्या आरोह-अवरोहांत सुरू राहत. काकांना नाऱ्या कधीच दिसला नाही; पण तो मागंच असे. काकांना फक्त त्याच्या उत्तरांचे आवाज ऐकू येत. हसून हसून गर्दीची पुरेवाट होई. गर्दीत कुजबुज सुरू होई : ‘‘बामनकाका कोण बरं? आणि नाऱ्या तर ओळखताच येत नाही बुवा!’’ एखादा बुजुर्ग खात्रीनं सांगायचा : ‘‘आरं ह्ये बामनकाका म्हंजे आपला परसराम नव्हं का? आन त्ये प्वार नाऱ्या तितलंच की, कुंभारवाड्यातलं!’’ परशुराम म्हणजे नाभिक व्यावसायिक. धोकटी अडकवून ये-जा करणारा. त्याचा ‘बामनकाका’ शंभर नंबरी! दुसऱ्या दिवशीपासून ‘नाऱ्या’मागं एकच प्रश्न सुरू राही : ‘‘अरे नाऱ्या, पळीपंचपात्र कुठें?’’ ‘नाऱ्या’ मात्र मित्रांच्या त्या प्रश्नांनं बेजार होऊन जाई. अशा ‘शिमग्याच्या सोंगां’त कधी कडक शिस्तीचे मास्तर, आणि त्यांना पाहताच हार्मोनियमच्या भात्यातल्या सगळ्या स्वरांचा आवाज काढीत रडणारी वर्गातली पात्रं डोकावत. कधी कथेकरी बुवा येऊन जात आणि शेवटी आरतीचं व दक्षिणेचं तबक फिरवलं जाताना त्यांची केली जाणारी गंमतही धमाल आणी. पिठानं अंघोळ केल्यासारखा सगळीकडं वावरणारा गिरणीतला चंद्रकांत सोंगातून समोर येई; आणि त्याची तिथली धांदल पाहताना हास्याचे धबधबे कोसळत राहत.

सोंगांचा चौकातला शेवट व्हायचा तो समई नृत्यानं. मोठी गोलाकार परात. त्यात ठेवलेल्या पेटत्या समया. परातीत मधे पंचारती. ही समई डोक्यावर घेऊन हे नृत्य केलं जाई. ही ‘नर्तकी’ पैंजणांचे शब्द बोलते करी. हातांच्या बोटांच्या विविधाकारी मुद्रा करी. गोल फिरे. गिरक्या घेई. एका पायावर तोल सावरीत बराच वेळ उभी राही. परात डोक्यावर ठेवूनच ती मैदानातली फुलं उचलून घेई. हे सगळं करताना ‘नर्तकी’चा मुद्राभिनयही सुरू असे. इतक्या नृत्यकसरती करताना एकही समई जागची हलत नसे; किंवा कुठल्या समईची ज्योतही विझून जात नसे. नर्तिकेनं जरीची हिरवी नऊवारी साडी अगदी चापूनचोपून नेसलेली असे. पदर पूर्ण अंगाभोवती लपेटून घेऊन कमरेच्या एका बाजूला तो घट्ट खोचलेला असे. पायाशी आलेली साडी पैंजणांच्या पट्ट्यांसह बांधलेली असे. ढोलकीवर महादू भोई यांची बोटं कडकडत असत. हे म्हादबाही असलेच अवलिये. ढोलकी, पखवाज वाजविण्यात तरबेज. त्यातलं त्यांचं शिक्षण शून्य; पण बोटांना परमेश्वरी देणगी लाभलेली. हे समईनृत्य डोळ्यांचं पारणं फेडून जाई. एका चौकात ते पाहूनही समाधान होत नसे; म्हणून अनेक मंडळी प्रत्येक चौकाचौकात पुन:पुन्हा येऊन जागा धरून बसत. चौकातलं समईनृत्य संपलं, की हेच कलाकार पुढल्या चौकात येत आणि तिथं पुन्हा नव्यानं तीच सोंगं रंगवीत. ती कितीही वेळा पाहिली, तरी त्यातली गंमत कमी होत नसे. समईनृत्यातली ही ‘नर्तकी’ कोण? नंतर चौकाचौकांत हा प्रश्न रंगत असे; आणि प्रत्येक ठिकाणी तो अनुत्तरित राहून पुढच्या चौकात पुन्हा नव्यानं पडत राही. सर्वांत शेवटच्या चौकात तो शोध लागे. आणि नर्तकीची ओळख पुढं येई : ती नर्तिका म्हणजे बाबू कुंभार! कुणाचाही त्यावर विश्वासच बसायचा नाही. गावात बाबू कुंभाराचं हॉटेल होतं. तो कायम तिथं दिसे. कधी चहाची उकळी पातेल्यात ओगराळ्यानं फिरविताना. कधी भज्याचे खमंग घाणे तळताना. कधी शेव-पापडी तयार करताना. कधी बुंदी पाडताना. जिलेबी करताना. कधी भेळीचे पुडे बांधून देताना. बाबू कुंभार. मध्यमवयीन. गोरापान. अंगानं चांगलाच मजबूत, काहीशा नाजूक आवाजाचा. गरीब स्वभावाचा. त्याचा आवाज कधीच चढायचा नाही. बाबू कुंभार म्हणजे ती नर्तिका, हे काही केल्या खरं वाटत नसे. दुसऱ्या दिवशी कुंभाराच्या हॉटेलवरून आमच्या अनेक चकरा होत. आता बाबू कुंभार कसा दिसतो, ते आम्ही निरखून पाहत असू; पण बाबू कुंभार नेहमीचाच असे. तो नर्तिका झाला, की पूर्ण बदलून जाई.

शिमग्याला सुरू झालेली ही सोंगं थेट गुढीपाडव्यापर्यंत रोज आम्हांला भेटत राहत. आता खूप मोठा काळ पुढं सरकला आहे. आता तेव्हाची ती ‘शिमग्याची सोंगं’ ही संपून गेली आहेत. अजूनही कधीतरी त्या आठवणी जाग्या होतात. सोंगांतली माणसं डोळ्यांपुढं येतात आणि मन तेव्हाच्याच उत्साहानं गावाच्या चौकाचौकांतून धावत सुटतं.

**मल्हार अरणकल्ले,** पुणे
arankalle.malhar@gmail.com
Mob. 98810 99007

इंग्रजी पुस्तक

अभय दातार

# किंसिंजर भेटीची अर्धशताब्दी

२०२१ हे जसे बांगलादेशच्या स्वातंत्र्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष, तसे ते अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि जागतिक ख्यातीचे आंतरराष्ट्रीय संबंधांचे अभ्यासक डॉ. हेन्री किंसिजर यांनी चीनला दिलेल्या भेटीचेदेखील सुवर्णमहोत्सवी वर्ष. त्याच वर्षी विविध देशांतील वरिष्ठ पदांवरील व्यक्तींनी इतर देशांना भेटी दिल्याच असणार. मग किंसिंजर भेटीला एवढे महत्त्व का? तर त्यामुळे २०व्या शतकाच्या उत्तरार्धातील राजकारणाला कलाटणी तर मिळालीच पण भारतावरदेखील त्याचे थेट परिणाम त्या वेळी झाले. आजदेखील या भेटीचे परिणाम जगाला आणि भारताला जाणवत आहेत इतकी ती भेट महत्त्वाची होती.

या भेटीचे महत्त्व जाणून घेण्यासाठी त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजावून घेणे आवश्यक आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर शीत युद्धाला सुरुवात झाली. एकीकडे सोव्हिएत युनियन तर दुसरीकडे अमेरिका अशी ढोबळ मानाने जगाची विभागणी झाली. १९४९मध्ये चीनच्या साम्यवादी पक्षाचा देशातील गृहयुद्धात विजय झाला आणि त्याने देश ताब्यात घेतला. पराभूत झालेल्या राष्ट्रवादी सरकारने तायवान या बेटावर आश्रय घेतला. आपला चीनच्या भूमीवर आता ताबा नसला तरी आपणच चीनचे अधिकृत सरकार आहोत असा या तायवानस्थित सरकारचा दावा होता. चीन हा संयुक्त राष्ट्रसंघाचा संस्थापक सदस्य तर होताच, पण महत्त्वाचे म्हणजे सुरक्षा परिषदेचा कायम सदस्य होता. त्यामुळे १९४९ नंतर संयुक्त राष्ट्रसंघात आणि पर्यायाने सुरक्षा परिषदेत चीनच्या स्थानावर साम्यवादी चीनचा हक्क आहे, का तायवानस्थित राष्ट्रवादी सरकारचा हक्क आहे– हा प्रश्न निर्माण झाला. इंग्लंड आणि इतर काही पाश्चात्त्य देशांनी साम्यवादी चीनला देशाचे अधिकृत शासक म्हणून मान्यता दिली. मात्र अमेरिकेने शीत युद्धातील गणित पाहून तसे करण्यास नकार दिला.

मात्र १९६०च्या दशकात साम्यवादी चीनला असे दूर ठेवणे योग्य नाही अशी जाणीव अमेरिकेतील अनेक उच्च पदस्थांना होऊ लागली. याच दशकातील सोव्हिएत

या भेटीचा आणि त्यानंतरच्या घडामोडींचा वेध दोन ज्येष्ठ अभ्यासक संजय बारू आणि राहुल शर्मा यांनी आपल्या संपादित पुस्तकात घेतला आहे. बारू हे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे माध्यम सल्लागार होते. एरवी भारतात चीनबद्दलचे जे लेखन वाचायला मिळते ते पाश्चात्त्यांचे असते. चीनचा अभ्यास करणाऱ्या भारतीयांची संख्या तशी कमीच आहे. त्यामुळे आपल्या समोर चीनबद्दलचे काहीच पैलू येतात. मात्र या पुस्तकात पाश्चात्त्य आणि भारतीय अभ्यासकांच्या मांडणीसोबत रशिया, जपान, दक्षिण कोरिया, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशांतील अभ्यासकांचेदेखील लेख आहेत. त्यामुळे या इतर देशांत चीनबद्दल काय चिंतन होते हे आपल्याला कळते आणि हे पुस्तकाचे बलस्थान आहे.

युनियन आणि चीन यांच्यातील वाढता तणाव तसेच व्हिएतनाम युद्धातील अमेरिकेची वाढती नामुश्की पाहता साम्यवादी चीनशी संबंध प्रस्थापित करणे आवश्यक आहे असे १९६८मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झालेल्या रिचर्ड निक्सन यांना वाटले आणि त्यांनी ही जबाबदारी डॉ. किंसिजर यांच्याकडे सोपविली. या बाबत गुप्तता पाळण्यात येत होती. या प्रक्रियेत काही देशांनी मध्यस्थाची भूमिका बजावली. पण प्रमुख सहभाग होता तो पाकिस्तानचा. म्हणूनच डॉ. किसिंजर हे आग्नेय आशिया आणि भारताच्या भेटीनंतर १९७१मध्ये पाकिस्तानला गेले. तेथे आजारी पडल्याचे नाटक केले आणि पाकिस्तानच्या मदतीने बीजिंग गाठून चीनचे पंतप्रधान चाऊ एन लाय यांची भेट घेतली. ही भेट म्हणजे १९७२ मध्ये निक्सन यांनी चीनला दिलेल्या भेटीची नांदी होती. यामुळे शीत युद्धाला कलाटणी मिळाली. साम्यवादी चीन–अमेरिका संबंध प्रस्थापित झाले आणि सुधारत गेले, चीन संयुक्त राष्ट्रसंघाचा आणि सुरक्षा परिषदेचा सदस्य झाला व चीनच्या वेगवान आर्थिक–लष्करी प्रगतीला सुरुवात झाली. डॉ. किंसिंजर यांची गुप्त भेट ही चीनच्या प्रगतीच्या प्रवासाचा एका अर्थाने आरंभबिंदू होय आणि हेच त्याचे महत्त्व होय.

या भेटीचा आणि त्यानंतरच्या घडामोडींचा वेध दोन ज्येष्ठ अभ्यासक संजय बारू आणि राहुल शर्मा यांनी आपल्या संपादित पुस्तकात घेतला आहे. बारू हे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे माध्यम सल्लागार होते. एरवी भारतात चीनबद्दलचे जे लेखन वाचायला मिळते ते पाश्चात्त्यांचे असते. चीनचा अभ्यास करणाऱ्या भारतीयांची संख्या तशी कमीच आहे. त्यामुळे आपल्या समोर चीनबद्दलचे काहीच पैलू येतात. मात्र या पुस्तकात पाश्चात्त्य आणि भारतीय अभ्यासकांच्या मांडणीसोबत रशिया, जपान, दक्षिण कोरिया, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशांतील अभ्यासकांचेदेखील लेख आहेत. त्यामुळे या इतर देशांत चीनबद्दल काय चिंतन होते हे आपल्याला कळते आणि हे पुस्तकाचे बलस्थान आहे.

अलीकडच्या काळात चीन–अमेरिका संबंध पुनःप्रस्थापित झाले ते केवळ निक्सन–किंसिजर यांच्यामुळेच, असा समज निर्माण झाला आहे. तसेच आज चीनचा जो काही उदय होऊन त्याच्या महत्त्वाकांक्षा वाढल्या आहेत आणि ज्यांमुळे आता अमेरिकेच्या (जगातील अव्वल) स्थानाला धोका पोहोचत आहे त्याला हे दोघे जबाबदार आहेत असा समजदेखील निर्माण झाला आहे. हे दोन्ही समज चुकीचे कसे आहेत हे अनुभवी अमेरिकन राजदूत तेरेसिता शॅफ्फर, प्रा. कांती बाजपाई, ऑक्सफर्ड विद्यापीठातील चीन अभ्यासक प्रा. राणा मित्तर आणि फ्रेंच अभ्यासक फ्रेडेरिख ग्रार यांनी मांडले आहे. निक्सन–किंसिजर जोडगोळीच्या आधीदेखील जॉन एफ. केनेडी आणि लिंडन जॉनसन यांनी या बाबत चाचपणी केली होती. तसेच निक्सन–किंसिजर यांच्या या प्रयत्नांचे हेतू तसे मर्यादित होते आणि ते राजकीय स्वरूपाचे होते. सोव्हिएत युनियन–चीन तणावांचा फायदा घ्यायचा आणि व्हिएतनाम युद्धातून माघार घेण्यासाठी चीनचे सहकार्य आवश्यक असल्याने ते मिळविणे एवढेच मर्यादित हेतू यामागे होते. मात्र पुढील काळात चीनचे सर्वोच्च नेते तंग शाओपिंग यांनी आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारले आणि अमेरिकेने त्यास प्रतिसाद दिला. येथून चीनच्या उदयाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली आणि त्याला जसे चिनी नेतृत्व जबाबदार आहे तसेच रोनाल्ड रीगन, जॉर्ज बुश आणि बिल क्लिंटन या अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची धोरणेही जबाबदार आहेत, अशी मांडणी या लेखांमध्ये केली आहे. १९८०च्या दशकात चीनला अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञान पुरविले गेले, लष्करी मदतही मिळाली. त्या बदल्यात अमेरिकेच्या अफगाणिस्तान–मधील सोव्हिएत रशिया–विरोधी मोहिमेला चीनने मदत केली. चीनला जागतिक व्यापार संघटनेत सामील करून घेणे हा या धोरणांचाच भाग होता आणि त्यामागे अमेरिकी बहुराष्ट्रीय कंपन्यांचा प्रभाव आणि दबाव होता. एकूणच संबंध प्रस्थापित करण्यासाठी चीनपेक्षा अमेरिकेची अधिक इच्छा होती असा या लेखांचा रोख आहे.

या सगळ्यांत पुढाकार अर्थातच अमेरिकेचा होता. मग चीनने याची तयारी का दर्शविली असेल? गरज दोन्ही बाजूंची होती असे प्रा. मित्तर यांचे मत आहे. तर अनुभवी दक्षिण कोरियन राजदूत चुंग मीन ली आणि बारू यांच्या मते आग्नेय आशियातील देशांची अमेरिकेच्या सहकार्याने झालेली जलद आर्थिक प्रगती पाहून चीनने एक धडा घेतला. तो म्हणजे आपली आर्थिक प्रगती साधायची असेल तर अमेरिकेशी जुळवून घेण्याशिवाय गत्यंतर नाही.

पण हे धोरण तंग शाओपिंग यांच्या काळातील आहे. किंसिंजर-निक्सन भेटींच्या दरम्यान माओ त्से तुंग हे चीनचे सर्वेसर्वा होते. त्यांनी संबंध सुधारण्याची तयारी का दर्शविली असेल या बाबत पुस्तकात फारसे नाही. रशियन राजकीय व्यवस्थेतील उच्च पदस्थ इगॉर युरगेन्स यांनी माओ यांच्या धोरणामागे सोव्हिएत युनियनशी युद्धाचा धोका असेल असे सूचित मात्र केले आहे.

पुस्तकात इतर अनेक पैलूंची चर्चा आहे. चीन हा जागतिक अर्थव्यवस्थेचा अविभाज्य भाग झाला की, मुक्त अर्थव्यवस्थेसोबत तेथे लोकशाही अवतरेल असा आशावाद अनेकांनी बाळगला होता. जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारण्यामागे चीनचा हेतू लोकशाही प्रस्थापित करण्याचा नसून आपली शक्ती वाढविणे हा होता, ही बाब प्रा. मित्तर यांनी अधोरेखित केली आहे. इगॉर युरगेन्स यांनी चीन-रशिया संबंध उत्तम नाहीत ही बाब नोंदवताना रशियाला चीनशी जवळीक साधण्याशिवाय पर्याय नाही हे सांगितले आहे. चुंग मीन ली यांनी चीन-अमेरिका यांच्यातील वाढत्या तणावांमुळे आग्नेय आशियातील देशांमध्ये चिंतेचे वातावरण असून, या दोन्ही सत्तांनी जुळवून घ्यावे अशी त्यांची अपेक्षा आहे. तर भारताने आपल्या क्षमता- विशेषतः आर्थिक क्षमता वाढविल्या नाहीत तर चीनशी सामना करणे अवघड आहे ही बाब भारतीय लेखकांनी सूचित केली आहे. चीनचे आव्हान पेलण्यासाठी अमेरिकेने काय केले पाहिजे याबाबत सिंगापूरचे अनुभवी राजदूत किशोर महबूबानी यांनी काही उपाय सुचविले आहेत. शिवाय चिनी नेतृत्वाच्या वैचारिक भूमिकांमागे मार्क्सवादाची प्रेरणा किती आणि चीनच्या इतिहासाची प्रेरणा किती हा बुद्धीला चालना देणारा प्रश्न उपस्थित केला आहे.

याबरोबरच पुढे काय होणार याचीदेखील पुस्तकात चर्चा आहे. डॉ. किसिंजर यांच्या मते अमेरिका आणि चीन यांनी संघर्ष न करता जुळवून घेतले पाहिजे याची नोंद काही लेखांत आहे. आजदेखील अमेरिकेतील अनेक धोरणकर्ते डॉ. किसिंजर यांची मते गांभीर्याने घेत असतात. अशा जुळवून घेण्याचे भारतावर तसेच आग्नेय आणि पूर्व आशियावर काय परिणाम होतील हा महत्त्वाचा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो. म्हणूनच या मुद्द्याची चर्चा विस्ताराने व्हायला पाहिजे होती. संजय बारू यांनी आपल्या लेखात एक वेगळा पैलू मांडला आहे. राजकारणातून निवृत्त झाल्यानंतर डॉ. किसिंजर यांनी किंसिजर असोसिएट्स ही कंपनी स्थापन केली. हिचा व्यवसाय म्हणजे ज्या अमेरिकन कंपन्यांना इतर देशांमध्ये गुंतवणूक करायची आहे त्यांना तसे करण्यास मदत आणि सल्ला देणे. या इतर देशांच्या यादीत चीनचा समावेश असणारच आणि चीनची बाजारपेठ आपल्याला मिळावी यासाठी बड्या अमेरिकन कंपन्या चीनशी संबंध सुधारा, असा आग्रह धरणारच. या सगळ्यांत डॉ. किसिंजर यांचे स्थान नेमके काय होते आणि आहे असा प्रश्न उपस्थित होतो. तसेच चीनशी संबंध सुधारा, या त्यांच्या मांडणीमागे वैचारिक भूमिका किती आणि व्यवसायिक हितसंबंध किती याचीदेखील चर्चा व्हायला पाहिजे होती.

प्रारंभीच बांगलादेशची स्थापना आणि ही भेट एकाच वर्षात झाली होती हे नोंदविले आहे. समारोप करताना आता या दोहोंचा काय संबंध हे सांगितले पाहिजे. पाकिस्तानच्या मध्यस्थाच्या भूमिकेचा उल्लेख झाला आहेच. हेच अमेरिकेच्या दृष्टीने त्या काळातील पाकिस्तानचे महत्त्व होते आणि म्हणूनच पूर्व पाकिस्तानात याह्या खान यांची लष्करी राजवट जे काही करीत होती त्यास अटकाव करण्यास अमेरिकेची काहीच इच्छा नव्हती. उलट याह्या खानांची राजवट स्थिर राहिली तरच चीनशी संबंध सुधारण्याचे प्रयत्न सुकर होतील अशी धारणा होती. पाकिस्तानच्या ऐवजी दुसऱ्या एखाद्या देशाने मध्यस्थाची भूमिका बजावली असती तर स्थिती वेगळी राहिली असती असा मुद्दा ज्येष्ठ पत्रकार सुहासिनी हैदर यांनी आपल्या लेखात मांडला आहे. मग नेमका काय बदल झाला असता? अमेरिकेने पाकिस्तानची पाठराखण न करता तेथील राजकीय पेचप्रसंगावर तोडगा काढण्यासाठी दबाव टाकला असता आणि मग कदाचित बांगलादेशाची निर्मितीच झाली नसती. भारताच्या दृष्टीने किंसिंजर भेटीचे हेदेखील महत्त्व आहे.

**अभय दातार,** नांदेड

abhaydatar@hotmail.com

अ न्यू कोल्ड वॉर : हेन्री किसिंजर अँड
द राइझ ऑफ चायना,
संपादन : संजय बारू आणि राहुल शर्मा
हार्पर कॉलिन्स पब्लिशर्स इंडिया, रु. ७९९/-

नवे पुस्तक

दत्तप्रसाद दाभोळकर

# पुसून गेलेल्या पाऊलखुणा

मी साताराचा. १९३२ ते १९५५ अशा शालान्त परीक्षेपर्यंतची माझी आयुष्यातली पहिली सतरा वर्षे सातारला गेली. त्या वेळी डॉ. मो. ना. आगाशे हे नाव कानांवर जायचे, पण हिमखंडाचा फक्त आठवा भाग आपणाला वर दिसतो, तसाही तो प्रकार नव्हता. गावातील एक नावाजलेले मोठे डॉक्टर एवढीच ती ओळख होती. त्यानंतर ४७ वर्षांनी देशातील आणि देशाबाहेरचे वास्तव्य संपवून मी २००२ मध्ये सातारला परत आलो. पुढील जवळजवळ २० वर्षांत कोणत्याही निमित्ताने त्यांचे नावही कानांवर पडले नाही.

नाही म्हणायला, एका वेगळ्या कारणाने त्यांची पुसटशी आठवण झाली. दोनेक वर्षांपूर्वी 'गावोगावचे दीपस्तंभ' म्हणून 'साधने'त एक सदर सुरू करावे, अशी चर्चा मी आणि विनोद शिरसाठ करत होतो. त्यातला पहिला लेख मी लिहावा असे विनोदने सुचवले. माझ्यासमोर लगेच आले ते डॉ. रविंद्र हर्षे. वयाची ७५ वर्षे ओलांडलेले डॉ. हर्षे बी. जे. मेडिकल कॉलेजमधून एम. डी. पदवी मिळवल्यावर सातारला आले. वयाच्या २५व्या वर्षी त्यांनी सातारसारख्या छोट्या गावात व्यवसाय सुरू केला. ते साम्यवादी पक्षाचे कार्यकर्ते होते. सातारा नगरपालिकेच्या निवडणुकीत आपला उमेदवार नक्की पडणार, हे माहीत असूनही घरोघरी त्याचा प्रचार करायला जात. नंतर ते संतवाङ्मयाकडे वळले. संतवाङ्मय समाजवाद कसा यथार्थपणे सांगतो, हे सांगत त्यांनी प्रवचनेपण दिली. मात्र त्यांचे मोठेपण जाणवले, ते वयाची ऐंशी वर्षे ओलांडलेल्या आमच्या एका मित्राचा रौप्य महोत्सव आम्ही त्यांच्या हस्ते साजरा केला त्या वेळी! आमच्या या मित्राला पंचवीस वर्षांपूर्वी एक जबरदस्त हार्टअॅटॅक आला. अॅब्युलन्स बोलावून त्याला बायपास सर्जरीसाठी पुण्याला नेण्याची तयारी सुरू होती. डॉ. हर्षे ठामपणे म्हणाले, ''मला या ऑपरेशनची अजिबात गरज वाटत नाही. थोडा व्यायाम, थोडे पथ्य, थोडी औषधे यामुळे तो ठणठणीत होईल.'' मित्राचा रौप्य महोत्सव साजरा करताना जाणवले, की सातारा शहराच्या आसपास असे किमान शंभर जण सापडतील, ज्यांना डॉ. हर्षेंनी असा मोलाचा सल्ला दिलाय.

त्या वेळी 'साधने'त डॉ. हर्षेंवर लिहिलेल्या लेखात मी

हे सारे मी सांगतोय, याचे कारण वेगळे. हे पुस्तक वाचेपर्यंत हे डॉ. मो. ना. आगाशे हे केवढे मोठे महाआयामी व्यक्तिमत्त्व आहे, हे मला अजिबात माहीत नव्हते. ते तसे ठीक आहे– पण डॉ. मो. ना. आगाशेंच्या नातवंडांनासुद्धा त्यांच्याबद्दल 'आपले आजोबा' यापलीकडे फारशी किंवा अजिबात काही माहिती नसावी.
हे सारे सांगण्याचे कारण म्हणजे, खरे तर प्रत्येक गावात दोन पिढ्यांपूर्वी प्रचंड ऊर्जा आणि प्रतिभा असलेली आणि अंधारात चाचपडत या देशाच्या नवनिर्माणासाठी आजन्म प्रयत्न करणारी माणसे होती. प्रत्येक गावात आपण त्या माणसांना स्मृतीआड केलंय. हे पुस्तक पथदर्शक ठरावे आणि प्रत्येक गावात पुसून गेलेल्या पाऊलखुणा शोधत आणि सांगत अशी पुस्तके साकार व्हावीत.

त्यांची जडणघडण, बालपण यांवर लिहिलेले आहे. त्यांचे बालपण फार वेगळे होते. पणजोबा सनातनी हिंदू. पुण्यात प्रचंड मोठा वाडा. सनातन धर्माचे नीटपणे पालन झाले नाही, म्हणून हा देश पारतंत्र्यात पडला असे समजणाऱ्या सनातनी मंडळींचे ते कदाचित एक प्रतिनिधी असणार. मात्र डॉ. हर्षेंच्या आजोबांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. वाडा सोडला. चाळीतील एका खोलीत येऊन राहायला लागले. हिंदू धर्मातील न संपणारी घृणास्पद जातिव्यवस्था ही या देशाच्या अवनतीचे एकमेव कारण आहे, असे सर्वप्रथम गौतम बुद्धाने सांगितले आहे. ख्रिश्चन धर्म स्वीकारणाऱ्या रेव्हरंड टिळकांपासून अनेकांच्या मनात अशीच काही वादळे असणार. मात्र डॉ. हर्षेंच्या वडिलांना प्रश्न पडला, आता माझा धर्म कोणता? आजोबांचा की वडिलांचा? त्यांनी सरळ महात्मा गांधींना पत्र पाठवले. गांधीजींनी पोस्टकार्ड पाठवले. ''प्रत्येकाने आपला धर्म शोधायचा असतो. तो व्रतस्थ होऊ पाळायचा असतो.'' डॉ. हर्षेंच्या चाळीतील खोलीत ते पत्र कायम भिंतीवर लटकलेले होते. हर्षेंची मुलाखत घेताना, एका गोष्टीचा उलगडा झाला. त्यांनी सातारला येऊन व्यवसाय सुरू केला, याचे कारण म्हणजे डॉ.मो.ना.आगाशे हे त्यांच्या आईचे वडील– त्यांचे नाना. आईला मुलाने माहेरच्या गावी जावे असे वाटत असणार!

मात्र तरीही हे पुस्तक हातात येईपर्यंत डॉ. मो. ना. आगाशे हे डॉ. हर्षेंचे नाना– याहून त्यांची ओळख मला झालेली नव्हती. मात्र हे पुस्तक हातात आले आणि आपण सारेच जण आज आपल्या आधीच्या पिढीतील त्यागी, समर्पित, अस्वस्थपणे पारतंत्र्यात नव्या वाटा शोधणाऱ्या पथदर्शक माणसांना पूर्णपणे विसरून गेलोय, याची दाहक जाणीव झाली. या पुस्तकाचा ब्लर्ब सदानंद मोरे यांनी लिहिलाय. त्यांचा ब्लर्ब तसा पानभर आहे. त्यात त्यांनी या पुस्तकाचे वेगळेपण व गरज दोन्ही गोष्टी सांगितल्यात. त्यांनी लिहिलंय, ''एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या चरणात महाराष्ट्रात सर्व क्षेत्रांत जागरणाची आणि पुनरुत्थानाची प्रक्रिया सुरू झाली. विशेष म्हणजे ही प्रेरणा फक्त राजकीय कार्यापुरती मर्यादित नव्हती. शिक्षण, अर्थ, उद्योग इ. मानवी जीवनाची अंगोपांगे तिने व्यापली होती. साताऱ्यातील अर्कशाळा आणि अगदी अभिनव अशा आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाचे प्रणेते डॉ. मो. ना. आगाशे यांना या प्रक्रियेचे प्रातिनिधिक प्रतीक मानता येईल.''

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांनी या पुस्तकाला दहा पानी विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे. अशा पुस्तकांची आज समाजाला असलेली गरज बेडकिहाळ यांनी नेमक्या शब्दांत मांडली आहे. त्यांनी लिहिलंय, 'Bliss was it in that dawn to be alive and to be young was very heaven' हे उद्‌गार आहेत सुप्रसिद्ध आंग्ल कवी विल्यम वर्ड्‌सवर्थचे. ते उद्‌गार फ्रेंच राज्यक्रांतीच्या संदर्भातील आहेत. वर्ड्‌सवर्थला जे फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळेचे वातावरण वाटले, तेच मला आपल्याकडील एकोणिसाव्या शतकाबद्दल वाटते. भारतासाठी आणि महाराष्ट्रासाठीही एकोणिसावे शतक हे नव्या सर्जनशील विचारांचे होते. वसाहतकाळात सुरू झालेल्या महाराष्ट्राच्या प्रबोधनपर्वात या समाजाला एका चैतन्याचा स्पर्श झाला. नव्या सामाजिक रचनेची नांदी झाली. सर्वस्वी नवा मध्यम वर्ग या काळात अवतरला. जरुरीपुरते अर्थार्जन करून समाजाची सेवा करणे याला महत्त्व आले. स्वत:ची राजकीय मते असूनही ती बाजूला ठेवून विधायक रीतीने संस्था निर्माण करणारे, तिचे जिवापाड संगोपन करणारे, सर्वसमावेशक दृष्टिकोन व संवादाचा मार्ग सतत पत्करणाऱ्या लोकांची एक मांदियाळीच महाराष्ट्रात निर्माण झाली. याच परंपरेत साताऱ्याचे डॉ. मो. ना. आगाशे अतिशय चपखल बसतात. साताऱ्याचे संस्थापुरुष म्हणूनही त्यांचा उल्लेख रास्तपणे करता येतो. महर्षी धोंडो केशव कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील या मंडळींनी ज्या एकल उद्दिष्टासाठी आपले आयुष्य बांधून घेतले, त्याप्रमाणे स्वत:चे आयुष्य आयुर्वेद आणि पाश्चात्त्य वैद्यकशास्त्र यांच्या सहकार्यासाठी व समन्वयासाठी वाहून घेतले.

सातारचे आर्यांग्ल महाविद्यालय व आयुर्वेद अर्कशाला यांतले डॉ. आगाशेंचे योगदान अलौकिक आहे, पण त्याचबरोबर जवळजवळ सर्व संस्थांत त्यांचा सक्रिय सहभाग होता. युनायटेड वेस्टर्न इन्शुरन्स कंपनीपासून युनायटेड वेस्टर्न बँक अशा अनेक संस्थांच्यात कार्यकर्ता ते संचालक– अशा अनेक भूमिका त्यांनी सहजपणे सांभाळल्या. सातारचे सामाजिक जीवन त्या वेळी केवढे मैत्रीपूर्ण होते, याचा एक किस्सा या पुस्तकात येतो. डॉ. आगाशेंची अखंड धावपळ पाहून कर्मवीर भाऊराव पाटील त्यांना म्हणाले, ''डॉक्टर, खूप काम करून तुम्ही थकणार. प्रत्येक क्षेत्रात तुमचे मोलाचे योगदान आहे, त्यामुळे फार थकलात तर मला सांगा. तुमचा हा भाऊ तुम्हांला खांद्यावर

बसवून प्रत्येक ठिकाणी घेऊन जाईल.''

'डॉ. मो. ना. आगाशे – एक राजस योगी' या पुस्तकात डॉक्टरांच्या आयुष्यातील अनेक संस्था, अनेक व्यक्ती, अखंड धडपड आणि धावपळ, अनेक क्षेत्रांतील त्यांचे मोलाचे, अतुलनीय कार्य अगदी सहजपणे आपल्या समोर उलगडते. या पुस्तकाचे आणखी एक वेगळे वैशिष्ट्य आहे. हे चरित्र नाही. हा गौरवग्रंथपण नाही. चरित्र आणि गौरवग्रंथ यांच्या संगमावर हे पुस्तक उभे आहे. त्यामुळे प्रथम त्यांचे विस्तृत चरित्र आहे आणि त्याचबरोबर त्या वेळच्या त्यांच्या सहकाऱ्यांनी त्या वेळी त्यांच्या कार्याला दाद देत, त्यांचे प्रामाणिक मूल्यमापन करणारे जे लेख लिहिलेत, त्यांचाही यात समावेश आहे. त्यामुळे डॉ. आगाशे यांचे प्रचंड कार्य आणि मनस्वी स्वभाव अगदी सहजपणे आपल्या समोर साकार होते.

आर्यांग्ल महाविद्यालय सुरू झाल्यावर डॉक्टरांनी काय केले? आपण एम.बी.बी.एस. आहोत. सातारा शहरातील आपण एकुलते एक एम.बी.बी.एस. डॉक्टर आहोत, आपला व्यवसाय धो धो पैसे देणारा आहे, मात्र आयुर्वेद मूल संस्कृतमधून नीट समजावून घेतले, तरच आपण खऱ्या अर्थाने आर्यांग्ल स्थापन करू. म्हणून डॉक्टरांनी मूळ संस्कृतमधून सर्व आयुर्वेद समजावून घेण्याचे ठरवले. त्या वेळी काय झाले, हे यतेश्वरशास्त्री केळकर, महामहोपाध्याय यांनी आपल्या लेखात दिलंय. ते लिहितात, ''डॉक्टर मला म्हणाले, मी तुम्हांला महिना शंभर रुपये देणार. (त्या वेळी सोने पन्नास रुपये तोळा होते.) तुम्ही साडेतीन वर्षे रविवार सोडून दररोज सकाळी ९ ते १०.३० आणि दुपारी ३ ते ४.३० असे तीन तास मला संपूर्ण आयुर्वेद मूळ संस्कृत ग्रंथांमधून समजावून द्यायचा. साडेतीन वर्षांत डॉक्टरांनी रविवार सोडून एकही सुट्टी घेतली नाही. साडेतीन वर्षे संपली त्याच वेळी त्यांना एकसष्टावे वर्ष लागले होते. त्यांचा षष्ट्यब्दिसमारंभ साताऱ्यात मोठ्या समारोहाने साजरा झाला. मला लाज वाटली की, साठी उलटताना असलेला डॉक्टरांचा उत्साह कोणीकडे आणि चाळिशीची आमची पेन्शनर वृत्ती कोठे?''

डॉक्टरांच्या उमदेपणाची एक गोष्ट डॉ. एन. आर. आपटे यांनी सांगितली आहे. ते लिहितात, ''भारत सरकारने एक कमिटी नेमली होती, एतद्देशीय औषधोपचार पद्धतींचा विचारविनियम करण्यासाठी. त्या समितीसमोर डॉ. आगाशे यांना एकतज्ज्ञ म्हणून आमंत्रित केले होते. त्यामुळे त्यांच्या बरोबर फक्त एक पाहुणा म्हणून मी हजर होतो. त्या चर्चेत भाग घेण्याचा कोणताही अधिकार मला नव्हता. नेहमीच्या पद्धतीने उथळपणे चर्चा होत राहिल्या. जेवणाची सुट्टी झाली, तेव्हा डॉक्टरांनी मला विचारले की, माझी पंचमहाभूतांसंबंधीची कल्पना दुपारच्या चर्चेत समितीसमोर विस्ताराने मांडली पाहिजे. माझी ही कल्पना डॉक्टरांनी समजावून घेतलेली होती व त्यांना ती महत्त्वाची वाटली होती. दुपारच्या सत्रात ही कल्पना मांडण्याचे ठरले. चर्चासत्राच्या अध्यक्षांना ही कल्पना आवडली आणि त्यांनी डॉ. आगाशेंना तो विचार समजावून देण्यास सांगितले. पण डॉ. आगाशे त्यांना एकदम म्हणाले की, तुम्ही या अशा शास्त्रीय चर्चेत बंदिस्तपणा का आणता? या माझ्या मित्राची ही कल्पना आहे. तो आमंत्रित नसला तरीही त्याला ती मांडावयास मिळाली पाहिजे. – मी हा प्रसंग जन्मात विसरणार नाही. स्वत: बाजूला होऊन नव्या माणसाला संधी देण्यासाठी मनाचा फार मोठेपणा लागतो. तो त्यांच्याकडे पुरेपूर आहे.'' या अशा वेगवेगळ्या लेखांमधून डॉ. आगाशे आणि त्या वेळचा अस्वस्थ कालखंड अगदी सहजपणे आपल्या समोर साकार होतो.

आणखी एक गोष्ट आहे. साधनेच्या वाचकांना रमेश आगाशे हे नाव परिचित आहे. अभ्यासू, समतोल, सविस्तर वाचकपत्रे ते साधनेत लिहीत असतात. 'सेंट्रल ग्राउंड वॉटर बोर्ड' या संस्थेत ते चंदीगड येथे अनेक वर्षे संचालक होते. डॉ. मो. ना. आगाशे यांच्या चौदा (१४) मुलांपैकी ते एक. आज वय वर्षे फक्त ८५. प्रकृती तशी यथातथाच. पण एक वर्ष झपाटून माहिती गोळा करून त्यांनी हे पुस्तक साकार केलंय. त्यांची अर्धांगिनी सौ. सुनेत्रा आगाशे यांनी त्यांना भरपूर मदत केली. सुनेत्रा आगाशे यांनी बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेज, पुणे येथून पदवी घेतलेली आहे. विजय केळकर आणि शरद पवार हे त्यांचे सहविद्यार्थी. मात्र आयुष्यभर त्यांनी फक्त गृहिणी ही पदवी बरोबर ठेवली. म्हणजे 'लव-कुश रामायण गाती' असे काहीसे किंवा 'ज्योतीने तेजाची आरती'.

**दत्तप्रसाद दाभोळकर,** सातारा

**डॉ. मो. ना. आगाशे** (एक राजस योगी)
प्रकाशक : रमेश आगाशे.
यशोधन प्राइड अपार्टमेंट, शनिवार पेठ, सातारा,
Mob. 75229 66469
पृष्ठे १९०, मूल्य – २५०/-

मागोवा

विनोद शिरसाठ

# बारा वर्षांपूर्वीचा युवा अभिव्यक्ती अंक




१२ जानेवारी २०२२ रोजी कर्तव्य साधना या डिजिटल पोर्टलवरून आणि साधना साप्ताहिकाच्या वेबसाईटवरून १२ वर्षांपूर्वीचा म्हणजे २०१० च्या युवक दिनाला काढलेला युवा अभिव्यक्ती विशेषांक पुनर्भेट म्हणून सादर केला. त्या अंकाची पार्श्वभूमी सांगणारे निवेदन त्यासोबत दिले होते. ते निवेदन व तो अंक बरेच सर्वदूर पोहोचले आणि वाचले गेले. त्याची चांगली चर्चाही झाली. मात्र जे वाचक डिजिटल माध्यमाचा वापर अद्याप पुरेसा किंवा अजिबात करीत नाहीत, त्यांच्यापर्यंत तो अंक व ते निवेदन पोहोचले नाही. ते पोहोचणे आवश्यक वाटते, कारण मूलतः तो अंक साधना साप्ताहिकाचा आहे. शिवाय, संपादन प्रक्रिया कशी चालते याचे एक उदाहरण पाहता यावे म्हणून आणि त्याची नोंद छापील स्वरूपात राहावी म्हणून ते निवेदन इथेही प्रसिद्ध करीत आहोत.

– संपादक

प्रिय वाचकहो,

आज १२ जानेवारी २०२२. राष्ट्रीय युवक दिवस. या निमित्ताने दिवसभरात बरेच वेगवेगळे लेख प्रसिद्ध झाले आहे, होत आहेत. युवकांसाठी सतत काही ना प्रसिद्ध करणे ही साधना साप्ताहिकाची परंपरा पूर्वीपासून आहे. मागील आठ वर्षांपासून तर स्वतंत्र युवा दिवाळी अंक प्रकाशित केला जातो. मात्र डिजिटल माध्यमाच्या वरदानामुळे आज १२ वर्षांपूर्वीचा 'युवा अभिव्यक्ती अंक' पुनर्भेट म्हणून सादर करीत आहोत.. त्या अंकाची थोडक्यात पार्श्वभूमी सांगतो, म्हणजे त्यातील लेख वाचण्यात अधिक गंमत येईल..

२००७ ते २००९ ही तीन वर्षे मी साधनाचा 'युवा संपादक' होतो, त्यानंतर मला 'कार्यकारी संपादक' हे लेबल लागणार होते. तर माझे 'युवा संपादक' हे लेबल काढले जाणार आहे, हे ठरले तेव्हा त्या लेबलखाली काढलेला हा शेवटचा अंक आहे. यात नऊ युवांची अभिव्यक्ती आहे. यातील सर्वजण तेव्हा आपापल्या आयुष्याच्या नवीन पर्वात प्रवेश करत होते. आता सर्वजण स्थिरस्थावर झाले आहेत, सर्वजण आपापल्या क्षेत्रांत कमी-अधिक प्रसिद्ध आहेत. यातील काहींना तर चांगलेच ग्लॅमर प्राप्त झाले आहे.

हा अंक काढला तेव्हा हे सर्वजण वय वर्षे १६ ते ३२ या गटात बसणारे होते. यातला सर्वांत तरुण विनायक पाचलग होता, तेव्हा तो कोल्हापुरात इयत्ता १२वी विज्ञान शाखेत होता. तो एका लग्नसमारंभासाठी पुण्यात आला होता, ज्या मंगल कार्यालयात लग्न होते त्याच्या समोर साधनाचे ऑफिस दिसले म्हणून तो तिथे आला. आणि अतिशय धीटपणे स्वतःची ओळख करून देऊन तो कोल्हापुरात काय व किती प्रकारची शालाबाह्य कामे करतोय हे सांगत राहिला. तेव्हा त्याची ओळख झाली आणि त्याच वेळी तो चेतन भगतच्या प्रेमात पडून, नंतर त्याच्याविषयी चिकित्सक विचारही करायला लागला होता. तेव्हा त्याने चेतनला लिहिलेले अनावृत्त पत्र या अंकात घेतले होते. त्यानंतर विनायक इंजिनियर झाला आणि मग माध्यम क्षेत्रांत बऱ्याच आघाड्यांवर काम करीत राहिला. आता

त्याचे 'थिंक बँक' हे युट्युब चॅनल मराठीतील सर्वाधिक लोकप्रिय मानले जाते. अनेक दिग्गजांच्या मुलाखती हे 'थिंक बँक'चे प्रमुख वैशिष्ट्य झाले आहे.

त्याच दरम्यान दुसरा एक तरुण साधना कार्यालयात भेटला होता. त्याचे नाव संकल्प गुर्जर. तेव्हा तो फर्ग्युसन कॉलेजमध्ये एफ.वाय.बी.ए. करीत होता. तो आधीच्या वर्षी बदलापूरला असताना त्याला तेथील ग्रंथालयात साधना साप्ताहिक थोडेबहुत माहीत झाले होते. त्यामुळे, पुण्यात आल्यावर तो साधनात आला तेच मुळी युवा संपादक आपल्यासाठीच असणार तर त्याला भेटावे या हेतूने. तेव्हा तो कविता करीत होता आणि त्याचे तोपर्यंतचे वाचनही बरेच जास्त व गहन-गंभीर होते. त्यानंतरच्या भेटीत त्याने फर्ग्युसनमधील एका उपक्रमात तो सहभागी झाला तेव्हाची लगबग सांगितली होती. त्यावरच त्याने लिहिलेला '२ ऑक्टोबर' हा लेख त्या युवा अभिव्यक्ती अंकात घेतला होता. नंतर संकल्पने खूप लेखन साधनात केले. पुढे तो दिल्लीत गेला, सार्क विद्यापीठातून इंटरनॅशनल रिलेशन्स या विषयात पीएच डी घेतली आणि आता दिल्लीतच एका थिंक टँकमध्ये काम करतो आहे.

त्याच दरम्यान नीलेश मोडक हा वाशिम येथून आलेला तरुण मला भेटला. तेव्हा तो पुण्यात आला होता, एम. एस्सी. मायक्रोबायलॉजी झाला होता. तो साधना ऑफिसमध्ये आला होता, डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना भेटायला आणि 'अंनिस'च्या उपक्रमांत सहभागी व्हायला. पण तिथे बैठकीला येता येता तो मला भेटू लागला. तेव्हा डॉ. दाभोलकर त्याला गंमतीने म्हणाले होते, ''तू विनोदला जास्त भेटू नकोस, तो माझा होऊ शकणारा अंनिसचा एक कार्यकर्ता पळवील.'' नीलेश साधनात अधूनमधून लिहायला लागला आणि त्याच दरम्यान त्याने कोकणात केलेल्या सहलीवर लिहिलेला लेख त्या अंकात घेतला होता. पुढे हा नीलेश बंगलोर येथे स्थायिक झाला आणि संशोधन क्षेत्रांत त्याने बरीच वेगळी वाट निवडली. ती इतकी अनोखी व रोचक आहे की, पुढे कधी तरी त्यावर त्याचा स्वतंत्र लेखच मागवायचा आहे.

पुणे विद्यापीठातील जे थोडे चमकदार व सिन्सियर तरुण त्या आधीच्या दोन-तीन वर्षांत साधनात अधून मधून भेटत होते, त्यातील एक होता दीपक जाधव. पुणे विद्यापीठातून एम.ए. (राज्यशास्त्र) करून एका दैनिकात तो नोकरी करू लागला होता.. त्याने गणपत धुमाळे या त्याच्या मित्राविषयी त्या अंकात लिहिले आहे. तो गणपत आता जळगाव येथे लॉ कॉलेजवर विद्यार्थीप्रिय प्राध्यापक आहे. आणि दीपकने सुरू केलेले 'जागल्या' हे वेबपोर्टल आता चांगलेच बाळसे धरू लागले आहे, अलीकडच्या काळात त्याने पुणे विद्यापीठातील अनेक गैरप्रकार ज्या निर्भयपणे पुढे आणले आहेत, ते कौतुकास्पद आहे.

नांदेड येथून आलेला चंद्रशेखर पाटील हा तरुण मात्र माझा कॉलेज काळापासूनचा मित्र आहे. तो आता चार्टर्ड अकाऊंटंट आहे. तो आणि मी बारावीनंतर एकाच हॉस्टेलवर राहत होतो तेव्हा मित्र झालो. त्याचे वाचन उत्तम आहे आणि राजकीय, सामाजिक समज खूपच रॅशनल आहे. 'लाटा लहरी' व 'थर्ड अँगल' ही माझी साधनेतील सदरे लिहिताना जे प्रॅक्टिकल मित्र माझ्यापेक्षा परिपक्व आहेत असे मला वाटत होते, त्यातील हा एक. माजी खासदार हरिभाऊ महाले यांचे निधन झाले तेव्हा (२००५ मध्ये) 'हरिभाऊंच्या सहवासातील ते दिवस' हा लेख त्याने माझ्या आग्रहास्तव लिहिला होता, आणि तो खूपच गाजला होता. इतका की, ग.प्र. प्रधान सरांनी त्याला कौतुकाचे पत्र पाठवले होते. त्यानंतर त्याने चार्टर्ड अकाऊंटंट एस.बी. झावरे यांच्यावर लिहावे असा आग्रह मी केला, तेव्हा त्याने लिहिलेला लेख त्या युवा अभिव्यक्ती अंकात घेतला होता. त्याने आतापर्यंत लिहिलेले तेवढेच दोन लेख. नंतरच्या कोणत्याही आग्रहाला त्याने अद्याप दाद दिलेली नाही.

प्रसन्न जोशी याने पुण्यातून पत्रकारितेचे शिक्षण घेऊन त्या वेळी मुंबईतील 'एबीपी माझा' या टीव्ही चॅनेलवर काम करायला सुरुवात केली होती. त्यादरम्यान एकदा त्याने अचानक फोन करून स्वतःची ओळख करून देऊन रानडे इन्स्टिट्यूट कॅन्टीनमध्ये भेट ठरवली होती. भेट संपल्यावर तो म्हणाला, डॉ. दाभोलकर यांच्यासोबत वावरणारा युवा संपादक आहे तरी कसा (म्हणजे कितपत खोल आहे?) हे मला समजून घ्यायचे होते, म्हणून मी तुझी ओळख करून घेतली. नंतर टीव्ही चॅनेलवरील डायनॅमिक पत्रकार म्हणून प्रसन्न संपूर्ण महाराष्ट्राला परिचित झाला. स्पष्टवक्ता आणि थेट व आखीव रेखीव मांडणी यासाठी तो ओळखला जातो. आता तो 'साम टीव्ही'वर संपादक आहे. त्याने त्या अंकात तरुणाईविषयी लिहिले

आहे, आजही त्याची मांडणी तशीच धारदार असते. युवांना अपील होणारी!

त्याच दरम्यान अशोक पवार या तरुणाला राष्ट्रीय स्तरावर विशेष प्रतिष्ठेचा समजला जाणारा 'संस्कृती सन्मान' मिळाला होता, त्या निमित्ताने त्याची ओळख मी स्वतःहुन करून घेतली होती. आणि त्याला साधनात सदर लिहायला सांगितले होते. त्याचे वयाच्या पंचविशीपर्यंतचे आयुष्य भटक्या विमुक्तांच्या पालावर गेले होते आणि त्यावर आधारित 'बिराड' हे त्याचे आत्मकथन बरेच गाजले होते. त्याचे अनुभवविश्व मध्यमवर्गीय जाणिवांच्या खूपच पलीकडचे होते. त्याने त्या अंकात लिहिलेला लेख त्याचीच झलक दाखवणारा होता. पुढे अशोकच्या पाच कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. त्याच्या आयुष्यावर एक नाटक निघाले आणि आता एक चित्रपटही आला आहे.

त्या काळात तरुणाईमध्ये 'रेडिओ मिर्ची' लोकप्रियतेच्या शिखरावर होते. आणि त्यातील आरजे शुभ्रा व आरजे स्मिता यांच्या आवाजाच्या व मांडणीच्या प्रेमात हजारो तरुण होते. त्या दोघींविषयी अनेकांप्रमाणेच माझ्याही मनात बरेच कुतुहल होते. म्हणून त्यांची मुलाखत घेण्याचे काम तेव्हा स्नेहा अवसरीकरकडे सोपवले होते. तेव्हा स्नेहा अंतर्नाद मासिकात भानू काळे यांची सहायक होती. त्यानंतर शुभ्रा व स्मिता काही काळ खूप चर्चेत राहिल्या, आता त्या कुठे आहेत व काय करतात हे माहीत नाही. स्नेहा मात्र नंतर आकाशवाणी, नियतकालिके व प्रकाशनसंस्था यांच्यामध्ये काम करीत राहिली. अक्षरधारा दिवाळी अंकाची संपादक म्हणून अलीकडच्या तीन-चार वर्षांत तिची जास्त ओळख आहे.

मी २००४ पासून साधनात लिहू लागलो तेव्हा डॉ.हमीद दाभोलकर मानसोपचरतज्ज्ञ म्हणून काम करू लागला होता. साधनातील माझ्या लेखनाच्या निमित्ताने त्याचा माझा परिचय झाला. डॉ. नरेंद्र दाभोलकर साधनाचे संपादक होते, त्यामुळे भेटी अधूनमधून होऊ लागल्या. पण आपण समांतर व जवळपास सारखाच विचार करत आहोत असे आम्हाला पहिल्या भेटीपासूनच वाटू लागले, साहजिकच आम्ही मित्र म्हणण्याइतपत जवळ आलो.. तो अन्यत्र थोडेबहुत लिहू लागला होता, मात्र मी अधूनमधून आठवण करून देत असूनही साधनात त्याने पुढील पाच-सहा वर्षांत एकही लेख लिहिला नव्हता. त्या युवा अभिव्यक्ती अंकासाठी त्याने लिहावे असा आग्रह मी धरला. तेव्हा फोनवरच त्याने मला 'पुरोगाम्यांच्या बैठकीतून बाहेर आल्यावर मनात आलेले काही विचार' बोलून दाखवले. तेव्हा तोच सर्व आशय त्याने अनावृत्त पत्र या स्वरूपात लिहावा असे मी सुचवले, तो लेख त्या अंकात घेतला. तेव्हा हमीद अंनिसच्या विवेकवाहिनीचेही काम करत होता. त्यानंतरच्या १२ वर्षांत त्याला किती आघाड्यांवर लढावे लागले हे आता सर्वपरिचित आहे.

गंमत अशी की, या अंकात चार-पाच पानांचा लेख आपण लिहावा असा विचार मी केला होता. 'हम है नये, अंदाज क्यूँ हो पुराना', ही मध्यवर्ती कल्पना समोर ठेवून लिहिणार होतो. पण तो अंक अवघ्या आठ-दहा दिवसांत जुळवून आणण्याच्या नादात तो लेख लिहिण्यासाठी मी वेळ काढू शकलो नाही. परिणामी, त्या शीर्षकाचे प्रास्ताविक स्वरूपात एक पानाचे संपादकीय लिहिले. मात्र ती कसर भरून काढण्यासाठी श्री.म.माटे यांचा 'देशोदेशीचे ज्ञानेश्वर' हा माझा विशेष आवडता लेख रिप्रिंट केला. त्या अंकाचे प्रकाशन विवेक सावंत यांच्या हस्ते झाले. तेव्हा त्यांनी या अंकातील सर्वच लेखांचे कौतुक करून माटे यांच्या लेखाचा उल्लेख मास्टरस्ट्रोक असा केला होता. तो लेख माटे यांच्या 'साहित्य मंजरी' या पुस्तकातून घेतला होता. मात्र अगदी अलीकडे साधनाचे अर्काइव्ह करताना लक्षात आले की, १९५७ च्या साधना कुमार अंकात तो लेख पहिल्यांदा प्रसिद्ध झाला होता.

१२ वर्षांपूर्वीच्या या अंकाची पीडीएफ आणि युनिकोडमधील मजकुर असलेली लिंक खाली दिली आहे. हा अंक आताही वाचनीय वाटेल यात तर शंका नाहीच, पण या तरुणाईकडे आणि त्यांच्या अभिव्यक्तीकडे वेगळ्या नजरेने पाहता येईल असा विश्वास वाटतो. साधना साप्ताहिकाचे ४५ वर्षांचे डिजिटल अर्काईव्ह आता सर्वत्र उपलब्ध आहे, म्हणूनच हा अंक सर्वदूर पोहचवता येतो आहे. आणि म्हणूनच या अंकाची पार्श्वभूमी जरा विस्ताराने सांगण्याची संधी घेता आली!

**मूळ अंक वाचण्यासाठी भेट द्या –**

kartavyasadhana.in किंवा weeklysadhana.in

चर्चा मंथन

अजय काळे

# माझे शिक्षण, माझी जबाबदारी

साधनाचा १५ जानेवारीचा अंक हाती आला. नेहमीच्या उत्सुकतेने हातात घेतला आणि संपादकीय पाहिले ते होते 'विद्यार्थ्यांना सोडा, शिक्षकांना धरा!'. 'संपादकीय'चे शीर्षकच असे होते की, हा अंक खाली ठेवणे शक्यच नव्हते. हे वाचल्यानंतर माझे मन भूतकाळात गेले. महाराष्ट्रात २३ मार्च २०२० पासून शाळा बंद झाल्या. सुरुवातीस हे संकट लवकरच हटेल आणि पुन्हा आपण पूर्वीसारखे आपले जीवन सुरू करू हा आत्मविश्वास होता. पण जसजसा काळ पुढे पुढे सरकू लागला तसतसे हे संकट अधिकच गहिरे होत गेले. पहिली लाट आली-गेली, दुसरी रुद्रावतार घेऊन आली ती गेली नाही तोच तिसरीची चाहूल लागली आणि शाळा पुन्हा बंद झाल्या. शालेय विद्यार्थ्यांचे म्हणाल तर गेल्या दोन वर्षांपासून ना नवे दफ्तर, ना नवीन वह्या, ना नवे मित्र. सगळीकडे फक्त अनिश्चितता. असे असले तरी कुठे तरी आशा होती की, एक-दोन महिन्यांत परिस्थिती बदलेल व पुन्हा शाळा सुरू होतील. पण प्रत्येक वेळी ही आशासुद्धा फोल ठरली.

ही परिस्थिती एकीकडे असताना मागील दोन वर्षांपासून मुलांचे शिकणे सुरू राहावे याचे छोटेमोठे प्रयत्न शिक्षकांकडून, शाळाकडून सुरू होते. ऑनलाइन शिक्षणास उत्तम प्रतिसाद हवा असेल तर ऑनलाइन शिक्षणात पालकांचा सहभाग कसा वाढेल यावर भर दिला पाहिजे हे गेल्या दोन वर्षांत प्रकर्षाने जाणवल्याने महाराष्ट्रातील शिक्षकांनी यावर भर दिला. कारण ऑफलाइन असलेला वर्ग ऑनलाइन करण्यासाठी पालकांचे सहकार्य अपेक्षित होते. प्रसार माध्यमांत ऑनलाइन शिक्षणाबाबत बरीच साधक-बाधक चर्चा सातत्याने होत राहिल्याने या पर्यायाकडे शिक्षकांबरोबरच पालकांनी गांभीर्याने लक्ष देण्यास सुरुवात झाली. शासनस्तरावरूनही याचा जोरदार पाठपुरावा सुरू होता. शाळेकडून, शिक्षकांकडून सातत्याने याचा आढावा घेणे, सूचना देणे हे या काळात सुरू होते.

ऑनलाइन शिक्षण सुरू करत असताना शिक्षकांना अगदी प्रारंभिक स्तरापासून सुरुवात करावी लागली. मुलांना तंत्र समजावून सांगणे, पालकांना माहिती देणे, व्हर्चुअल शिक्षणासाठी आवश्यक असणारे ॲप पालकांच्या

> खरे पाहता, 'तंत्रज्ञान हे चांगले अथवा वाईट असत नाही.' ते ज्या कारणासाठी वापरले जाते त्यावर ठरते. म्हणूनच याला 'दुधारी तलवार' असे म्हटले जाते. ऑनलाइन शिक्षण, त्याचा वापर व परिणाम यांवर जरूर आक्षेप आहेत. मतमतांतरे आहेत पण म्हणून हे टाळता येणार नाही. उलट ह्याच्या वापरामुळे निर्माण झालेले प्रश्न व यावर कशी मात करता येईल याचा विचार गंभीरपणे केला पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे. हे ओळखूनच उपक्रमशील शिक्षकांनी 'अति सर्वत्र वर्जते' या सुवचनाचे भान ठेवत व याचा विवेकाने वापर करत गुणवत्तेला तंत्रज्ञानाची जोड देत गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे आपले कार्य अविरतपणे चालू ठेवले आहे.

मोबाइलमध्ये स्थापित करणे, यामध्ये येणाऱ्या अडचणींवर मात करून त्यास ऑनलाइन शिक्षणास तयार करणे, ही सर्व प्रक्रिया ग्रामीण भागातील शिक्षकांना पार पाडावी लागली. याचा परिणाम असा झाला की, ऑनलाइन वर्गाची संख्या व सक्रियता वाढू लागली. दैनंदिन अभ्यासाची देवाणघेवाण सुरू झाली. महाराष्ट्र शासनाच्या 'शाळा बंद पण शिक्षण सुरू' यापासून प्रेरणा घेऊन अनेक ठिकाणी ऑनलाइन शिक्षणाचे नवनवे मार्ग हाताळायला सुरुवात केली. 'डिजिटल शाळा' हा प्रवास शिक्षकांनी समाजातून मिळवलेली मदत– त्यास जिल्हा परिषदा, विद्यमान आमदार, खासदार व सामाजिक संस्था यांनी त्यांच्या निधीतून केलेली भरीव मदत, यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित आहे.

गुणवत्तेला तंत्रज्ञानाची जोड देत असताना महाराष्ट्रातील शिक्षकांनी सोशल मीडियाचा केलेला वैशिष्ट्यपूर्ण वापर ही महत्त्वपूर्ण बाब या दोन वर्षांत नजरेत भरणारी आहे. 'व्हॉट्सॲप' म्हणजे वेळेचा अपव्यय, बिनकामाचा व्याप, डोक्याला ताप असा सर्वसाधारण समज समाजात रूढ झाला आहे. सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यात कार्यरत असणाऱ्या श्री एन.डी. पाटील या शिक्षकाने यास छेद देत 'गणित मंडळ तासगाव' या व्हाट्सॲप ग्रुप माध्यमातून गणिताच्या अभ्यासात हे कसे वापरता येईल हे दाखवून दिले आहे. कसे म्हणाल तर, समजा एखाद्याला गणिताबद्दल काही शंका असेल, ते सुटत नसेल तर ते या ग्रुपवर शेअर केले जाते. या ग्रुपमधील शिक्षक अगदी स्पष्टीकरणासह सोडवून या समूहावर देतात. ज्याला ती समस्या होती त्याला त्याचे उत्तर मिळते. विशेषतः पाचवी, आठवी व नवोदयसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी याचा खूप मोठ्या प्रमाणावर फायदा होताना दिसत आहे. सोशल मीडियाचा गणितात असाही उपयोग होऊ शकतो हे या कल्पक शिक्षकाने दाखवून दिले आहे. एवढेच नव्हे तर श्री पाटील यांनी यापुढे जाऊन यूट्यूबच्या माध्यमातून गणितातील मूलभूत संकल्पना, नियम व सूत्रे यांच्या अभ्यासासाठी यूट्युब चॅनेल सुरू करून गणित विषयाचे स्वनिर्मित व्हिडिओ त्यावर अपलोड केले आहेत. याचा वापर तालुक्यातीलच नव्हे, तर राज्यतील अनेक स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी, शिक्षकांना होत आहे.

सांगली जिल्ह्यातील कवठेमहंकाळ तालुक्यात कार्यरत असणारा असाच एक कल्पक शिक्षक तारीश आत्तार. गेल्या दोन वर्षांपासून शाळा बंद असल्या तरी मुलांचे शिक्षण सुरू राहावे यासाठी झटणारा, त्यासाठी स्वत:च्या घरातच स्टुडिओ उभा करणारा, मुलांकडे मोबाइल नाहीत म्हणून हताश न होता 'गल्ली मित्र' ही अभिनव कल्पना राबवून मुलांच्या शिक्षणाची सोय करणारा उपक्रमशील शिक्षक. नवनवीन संकल्पना घेऊन सहज–सुंदर भाषेत मुलांना समजतील असे छोटे छोटे व्हिडिओ तयार करणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील ज्योती बेलवले व नाशिक जिल्ह्यातील वैशाली भामरे, मुलांच्या कलागुणाला वाव देणारा बीडचा सोमनाथ वाळके, बोलक्या बाहुल्यांच्या मदतीने मुलांच्या भावविश्वात शिरणारी अमरावतीची दिपाली बाभुळकर, शिक्षणातील तंत्रज्ञान वापरास चालना देणारा सोलापूरचा राजकिरण चव्हाण, स्वत:च्या हिमतीवर भारतातील नवोपक्रम विषयावर काम करणाऱ्या 'SIR Foundation' च्या विशाल नेटवर्कचे मुख्य आधारस्तंभ श्री बाळासाहेब वाघ, सिद्धराम माशाळे व हेमा शिंदे, तर संपूर्ण जगाला आपल्या कामगिरीने दखल घ्यायला लावणारा 'ग्लोबल टीचर्स'चा मानकरी रणजित डिसले असो. अशी कितीतरी शिक्षकांची यादी देता येईल. या आणि इतर अनेक शिक्षकांनी 'संकट हीच संधी' मानून केलेले कार्य महत्त्वपूर्ण आहे.

थोडक्यात काय, तर समस्येवर तंत्रज्ञानाची जोड देऊन शोधलेला उपाय खरेच वाखाणण्याजोगा आहे. राज्यभर डिजिटल शाळांच्या वाढत्या संख्येमुळे व तंत्रस्नेही चळवळीमुळे शाळाशाळांत टेक्नोसॅव्ही शिक्षकांचे प्रमाण वाढले आहे. याचा उपयोग विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यात होताना दिसून येत आहे. सर्वसामान्य पालकांच्या मुलांना डिजिटल शाळांमुळे संगणकीय शिक्षण घेण्यात मदत झाली आहे. या मुलांना संगणक हाताळायला व पाहायला मिळतो तो शाळेतच. कारण घरी असेलच असे नाही. अशा वेळी डिजिटल शाळांचे महत्त्व आणखीनच वाढते हे ओळखूनच डिजिटल शाळांच्या प्रसाराला शिक्षकांनी पालक, अधिकारी व पदाधिकारी यांच्या मार्फत हेतुपूर्वक प्रयत्न केले आहेत. त्याला आता चांगले यश दिसते आहे.

खरे पाहता, 'तंत्रज्ञान हे चांगले अथवा वाईट असत नाही.' ते ज्या कारणासाठी वापरले जाते त्यावर ठरते. म्हणूनच याला 'दुधारी तलवार' असे म्हटले जाते. ऑनलाइन शिक्षण, त्याचा वापर व परिणाम यांवर जरूर आक्षेप आहेत. मतमतांतरे आहेत पण म्हणून हे टाळता

येणार नाही. उलट ह्याच्या वापरामुळे निर्माण झालेले प्रश्न व यावर कशी मात करता येईल याचा विचार गंभीरपणे केला पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे. हे ओळखूनच उपक्रमशील शिक्षकांनी 'अति सर्वत्र वर्जते' या सुवचनाचे भान ठेवत व याचा विवेकाने वापर करत गुणवत्तेला तंत्रज्ञानाची जोड देत गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे आपले कार्य अविरतपणे चालू ठेवले आहे.

राज्य सरकारने दिलेला 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' हा मंत्र ध्यानी ठेवून शासनाच्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करून मुलांचे ऑफलाइन व ऑनलाइन शिक्षण सुरू राहावे यासाठी झटणारा, मेहनत घेणारा, आलेल्या समस्येचा बाऊ न करता त्यावर मार्ग शोधणारा 'माझे शिक्षण माझी जबाबदारी' समर्थपणे पेलणारा 'शिक्षक' समाजाला नेहमीच वंदनीय आहे व राहील.

**अजय काळे,** सांगली
Mob. 9921689468
kajay1877@gmail.com

## शिक्षण- अनौपचारिक व औपचारिक : समन्वय व सहयोग हवा

दि. १५ जानेवारीच्या साधनाचे संपादकीय (विद्यार्थ्यांना सोडा, शिक्षकांना धरा!) वाचले. संपादकीयात नमूद केलेल्या सर्व मुद्यांबाबत सहमती ठेवणे कठीण आहे. परंतु शेवटच्या परिच्छेदातील मुद्दा मला शिक्षण (सर्वच स्तरांवरील) या संकल्पनेच्या संदर्भात महत्त्वाचा वाटला, त्याबद्दल माझे मत नोंदवतो.

शिक्षणाची प्रक्रिया ही अखंड चालणारी आणि बहुआयामी आहे, याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. शिक्षण, विशेषत: लहान मुलांचे, हा मोठ्या व्यक्तींचा अभ्यासाचा विषय आहे. असावा लागतो. शालेय पातळीवरील आणि महाविद्यालय पातळीवरील चालणारे शिक्षण हे औपचारिक समजले जाते. प्रत्यक्ष शिक्षणाचा उपयोग मात्र अनौपचारिकपणे चालणाऱ्या जगण्याचा भाग असतो. म्हणून औपचारिक व्यवस्थेत जिथे जिथे शक्य आहे तिथे तिथे अनौपचारिक माध्यम वापरले जाणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विषय शिकविण्याच्या पद्धतीही मुलांसाठी काटेकोरपणे न राबविता त्यातही अनौपचारिकता आणायला हवी. म्हणजे शिक्षण आणि जगणे यांच्यात आवश्यक व उपेक्षित असणारी सरमिसळ होईल, त्यातून शिक्षण आणि जगणेही अनुभवाधारित होत असल्याने अर्थपूर्ण व समृद्ध होण्याची शक्यता वाढेल.

शिक्षण देण्यासाठीचे माध्यम अनौपचारिक असावे इतकाच याचा मर्यादित अर्थ नाही. अनौपचारिक जगण्यातील घटना, घटक हेच औपचारिक शिक्षणाचा पाया असतात याची जाण मोठ्यांना असणे आवश्यक आहे. म्हणून सर्वच विषयांतील अधिकाधिक भाग विद्यार्थ्यांच्या जीवनास व त्यांच्या भावविश्वास जोडण्याचा प्रयत्न महत्त्वाचा ठरतो. प्रत्येक वेळी हे जमेलच असे नाही, याची जाण ठेवून अधिकाधिक तास प्रयत्न करणे गरजेचे आहे.

औपचारिक पद्धत व अनौपचारिक माध्यमांद्वारे (वा साह्याने) दिले जाणारे शिक्षण यांचा समन्वय व सहयोग ठेवत जाणे अगत्याचे आहे. शाळांमधील शिक्षकांसाठी आवश्यक असणाऱ्या व्यावसायिक पात्रतेचे काम विद्यापीठातील अभ्यासमंडळे करतात. पण विद्यापीठांचा शालेय शिक्षणाशी थेट संबंध अत्यल्प असतो. म्हणून अभ्यासमंडळातील व्यक्ती शालेय स्तर आणि विद्यापीठ स्तर अशा दोन्हींतून घेतल्या गेल्यास शिक्षणाची तात्विक बाजू, प्रत्यक्ष व्यवहार आणि औपचारिक-अनौपचारिकता यांची सांगड घातली जाऊ शकते.

अर्थातच शिक्षणाचे भाषामाध्यम, शिक्षकांची भरती नसल्याने शाळांमधील मोठी कमतरता, शिक्षणबाह्य व्यक्तींचा हस्तक्षेप आणि ज्यांच्यावर शिक्षणाची गुणवत्ता अवलंबून आहे, अशा शिक्षकांची तुलनेने कमी संख्या यांचा विचार करता, वरील विषय किती गुंतागुंतीचा बनला आहे याची सुजाण वाचक कल्पना करू शकतात.

**प्रा. नागेश शंकर मोने,** वाई, जि.सातारा
Mob. 9225340935

## मध्ययुगीन संतपरंपरा तशा साधूंमुळेच जिवंत आहे!

दि.२५ डिसेंबर २०२१ च्या अंकांत ‘टिश्यू पेपर’, या नव्या कादंबरी संदर्भात प्रा.डॉ.अरुण कोळेकर यांनी समीक्षा केलेली आहे. या कादंबरीमध्ये हॉटेलची दुनिया एक प्रकारे मध्यमवर्गीय, श्रीमंतांच्या, उच्चभ्रूची थकवा घालविण्यासाठी आराम करण्याची जागा आहे. येथे काही लोक मौज करतात. काही आपली वेदना, दुःख, प्रश्न, नैराश्य, तणाव यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करतात. काही आनंद शोधत असतात. यांच्या आनंदाचे चित्रण करताना लेखकाने हॉटेलमध्ये काम करणारे कामगार वेटर स्त्रिया यांच्या जीवनाची दाहकता मांडली आहे. अरुण कोळेकर यांची समीक्षा वाचकांना कादंबरी वाचण्यासाठी प्रेरित करते. समीक्षकाने सहजपणे कादंबरीसंबंधी व त्यातील व्यक्तिरेखांचा जिवंतपणा व्यक्त केला आहे. हॉटेलचे स्वतंत्र असे नवीन जग आहेच. यामध्ये अनेक गरीब, अठरापगड जमातीची शोषित पीडित मुलं-मुली, युवा-युवती काम करतात. त्यांच्या जीवनाचे दाहक अनुभव येथे पाहायला मिळतात. या काम करणाऱ्या व्यक्तींचे शोषण होत असते. हॉटेलचे हे जग काम करणाऱ्याचे टिश्यू पेपरसारखेच आहे काय? याचे चित्रण या कादंबरीच्या माध्यमातून झालेले आहे

दि. ८ जानेवारीच्या अंकातील संपादकीय ‘साधूंच्या वेषातील सैतान!’ वर्तमानातील निर्भीड पत्रकारितेची परंपरा जोपासणारे आपल्या देशातील वाढत्या विकृती, हिंसक कारवाया, धार्मिक भेदभाव हे आपल्या विश्वगुरू होण्याच्या, महासत्ता बनण्याच्या, वसुधैव कुटुंबकम या कल्पनेला छेद देण्याचा दृष्टीने अत्यंत वाईट परिणाम करणारे आहेत. ‘साधूंच्या वेषातील सैतान’ या संपादकीयामध्ये धार्मिक अहंकाराने किती भयानक रूप धारण केले आहे याचे ज्वलंत उदाहरण व्यक्त होते. धार्मिक अहंकाराने संत, साधूंच्याही हृदयात विषक्त रूप धारण केले आहे. उत्तराखंड राज्यातील हरिद्वार येथे झालेल्या धर्मसंसदेत काही साधूंनी धर्माच्या नैतिकतेचे तीन तेरा करून टाकले आहे.




मध्ययुगातील संतांनी आपल्या विचारातून जाती, धर्म, संप्रदाय से परे जाकर मानवता की बात की थी. परंतु या ठिकाणच्या संतांच्या, साधूंच्या धर्मसंसदेत वेगळेच घडलेले दिसून येते. माणुसकीला काळीमा फासणारी प्रवृती त्या ठिकाणी घडली असून ती वक्तव्ये समाजमाध्यमातून धर्माधर्मात, जातींत हिंसा निर्माण करण्यास कारणीभूत ठरू शकतात. सरकारी यंत्रणा अशा घटनांप्रति सजग झाल्या पाहिजेत. या घटनांचा लगेच बंदोबस्त करण्याची गरज केंद्रीय शासन-प्रशासन यावर आहे. धर्मसंसदेतील भाषणे ही विखारी

प्रवृत्तीची असल्यामुळे एका विवेकवादी साधूने ती धर्मसंसद सोडून जाण्याचा निर्णय घेतला व त्या साधूने ह्या धर्मसंसदेतील भाषणे समाजविघातक आहेत म्हणून ही सभा सोडून मी जात आहे असे म्हणण्याचे धैर्य दाखवल्यामुळे मध्ययुगातील संतपरंपरा आशा साधूंमुळेच जिवंत आहे, याचे प्रमाण मिळाले.

**प्रा.डॉ.विश्वनाथ भालेराव,** उदगीर, जि. लातूर

## भाजपच्या प्रचाराचा आरंभ व सांगता धार्मिक ध्रुवीकरणाशिवाय होत नाही

दि. ८ जानेवारीच्या साधनाचे 'साधूंच्या वेषातील सैतान!' हे संपादकीय वाचले. सुमारे १७० वर्षांपूर्वी कार्ल मार्क्सने एका जागी नोंदवून ठेवले आहे की, 'धर्म ही अफूची गोळी आहे.' एवढी दशके लोटली आणि विज्ञानाचा सूर्य जगभर तळपत असताना या धर्म नामक अफूची मादकता जाणवण्यामागे दिल्ली, उत्तराखंडमधील हरिद्वार आणि छत्तीसगडची राजकीय रायपूर येथे भरलेली तथाकथित हिंदू धर्म परिषद कारणीभूत ठरली आहे. या तथाकथित धर्म संसदेत काही कथित- स्वयंघोषित संत्, महंत, धर्ममार्तंडांनी ओकलेली चिथावणीखोर आणि द्वेषमूलक गरळ त्यांच्या आध्यात्मिक आणि बौद्धिक मर्यादा स्पष्ट करणारी आहे. वास्तविक संत, महंत हे समाजाचे मार्गदर्शन असतात. पण, समाजात दुही माजवणारे हे धर्मगुरू नसून वाचाळवीर आहेत. या धर्म संसदेत राष्ट्रपिता महात्मा गांधींबाबत अनुद्गार काढण्यात आले. हा सारा घटनाक्रम जेवढा मन उद्विग्न करणारा आहे त्याहीपेक्षा अधिक देशाच्या नेतृत्वाचे यासंदर्भातील 'मौन' अधिक घातक आहे. कारण मौनात ब्रह्मांड डळमळीत करण्याची जशी ताकद असते, तसेच या मौनातून अनेक अर्थदेखील निघू शकतात.

दिपक त्यागी ऊर्फ यती नरसिंगानंद यांनी देशात मागील जवळपास आठ वर्षांपासून हिंदुत्ववादी विचारसरणीचे सरकार सत्तेत असतानादेखील पुन्हा एकदा 'हिंदू खतरें में हैं'च्या शिळ्या कढीला ऊत आणण्याचा प्रयत्न केला आहे. 'शस्त्र मेव जयते!'च्या उद्घोषात पार पडलेल्या या धर्मपरिषदेत सरळसरळ एका विशिष्ट अल्पसंख्याक धर्मसमुदायाला देशातून हद्दपार करायचे असेल तर तलवार आदी पारंपारिक शस्त्रे उपयोगाची नाहीत, तर आधुनिक शस्त्रे हिंदू धर्मीयांनी उचलणे गरजेची आहेत, असे जाहीर आवाहन करण्यात आले. तरीही या तथाकथित धर्मगुरूंवर कायदेशीर कारवाई होत नसेल तर त्यांना राजकीय वरदहस्त असल्याशिवाय हे शक्य नाही. उत्तराखंड, उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीची ध्रुवीकरणाची समीकरणे या वरदहस्तामागे आहेत का? कारण निवडणूक कोणतीही असू देत भाजपच्या प्रचाराचा आरंभ आणि सांगता धार्मिक ध्रुवीकरणाशिवाय होत नाही

**बाळकृष्ण शिंदे,** बिबवेवाडी, पुणे

## झाले गेले गंगेला मिळाले असे मानून पुढे चालावे

दि.१५ जानेवारीच्या साधनाचे संपादकीय वाचले. संपादकीयामध्ये 'विद्यार्थ्यांना सोडा, शिक्षकांना धरा!' हे शीर्षक चांगलच आहे यात शंका नसावी. कोविड १९ ने जगभर धैमान घातले आहे, जग या त्याच्या विळख्यात होते आणि आहे. त्यामुळे मागील दोन वर्षांत शाळा ६०० दिवस बंद होत्या. या काळात सर्वाधिक नुकसान शिक्षणक्षेत्राचे झाले. मुलांचे तर न भरून येणारे शैक्षणिक 'वाटोळं' झाले. मी याच क्षेत्रात ३४ वर्षे काम केले आहे. या कोविड काळात शिक्षकांनी फक्त ऑनलाईन, झूम वा मोबाईल टिचींग यांवर समाधान न मानता, अशी भरघोस कर्तव्ये पार पडली नाहीत सत्य आहे.

शिक्षण व शैक्षणिक कामकाज हे तसे पोपटपंची काम. कामाचा आऊटपुट न लक्षात येणारे क्षेत्र. शिक्षक एकदा कायम झाले की बरीचशी 'सुस्ती'ची अनुभूती पाहायला मिळते. 'काम कमी जास्त दाम', त्यात पती-पत्नी एकाच क्षेत्रात असतील तर आनंदी-आनंद. हे एक वास्तव आहे.

मुलांच्या आत्महत्यांमुळे दहावी-बारावी बोर्डाच्या परीक्षातील क्रमांक यादी बंद केली. पुढे जाऊन पहिली ते आठवी 'सब घोडे बारा टक्के' सर्वच पास. नापास करायचे नाही. राज्य शासनाने प्रिंट, डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक या माध्यमांचा वापर करून शिक्षकांना प्रेरणा, प्रोत्साहन व प्रशिक्षण यांच्या माध्यमातून द्यायला हवी होती. मागील दोन वर्षे कोविडमध्ये गेले 'झाले गेले गंगेला मिळाले' असे मानून आता तरी नवीन उपाय करून मुलांचे नुकसान होणार नाही यासाठी राज्य

शासन, संस्था पातळीवर नवीन प्रकल्प राबवणे गरजेचे आहे.

असे म्हटले जाते– डॉक्टर समाजाचे आरोग्य सांभाळतो, वकील समाजाचे मन सांभाळतो, शेतकरी हा समाजासाठी अन्न, धान्य तयार करून समाजाच पोट भरतो. तो अन्न दाता ठरतो. तर शिक्षक हा समाजाचा , देशाचा भावी नागरिक घडवतो. त्याच्यावर मोठी जबाबदारी आहे हे त्यांनी विसरून चालणार नाही.

**विलास भांदिर्गे**, मु.पो.तारळे ता.पाटण, जि. सातारा

## विश्वासरावांचा टोकिओतील तो अनुभव

दि.११ डिसेंबरच्या अंकातील दत्तात्रय जोशी यांचा 'आठवणीतील मुंबई दूरदर्शन' या मथळ्याचा लेख वाचून माझ्या स्मृतीची पाने चाळविली गेली. सुरुवातीला ऐंशी नव्वदच्या दशकात दर रविवारी सकाळी एक तासाचा 'प्रतिमा आणि प्रतिभा' नावाचा विविध क्षेत्रांतील कर्तबगार व्यक्तींच्या मुलाखतीवर आधारित कार्यक्रम असायचा. अशाच एका कार्यक्रमात कामात प्रतिष्ठा शोधणाऱ्या नामवंत विश्वासराव चौगुले यांची मुलाखत पाहिली. कार्यक्रमात सामान्य जपानी माणसाच्या नोकरी, व्यवसाय, मालक आणि एकूणच देशावरील प्रखर निष्ठेची त्यांनी सांगितलेली आठवण माझ्या मनाच्या एका कोपऱ्यात जपून ठेवली आहे आणि त्या आठवणीचा उपयोग तरुणांसमोर बोलताना मी पुरेपूर करत आलो आहे.

त्या आठवणीचा गोषवारा पुढीलप्रमाणे... मुलाखत घेणाऱ्याने विश्वासरावांना शेवटचा प्रश्न विचारला की, धंद्याच्या निमित्ताने त्यांचा जपानशी निकटचा संबंध आहे, तेव्हा अणुबॉम्ब वर्षावाने जर्जर झालेल्या त्या देशाने अवघ्या ३०/३५ वर्षांत नेत्रदीपक प्रगती केली त्याचे गमक कोणते? विश्वासराव नम्रपणे उत्तरले, 'त्या देशाची आणि तिथल्या लोकांची महानता मी काय वर्णू? परंतु पंधराच दिवसांपूर्वी मला टोकियोत आलेला एक अनुभव सांगतो. त्यात तुमच्या प्रश्नाचे उत्तर सापडते का बघा.'

टोकियोतील एका स्टील मिलच्या मॅनेजिंग डायरेक्टरच्या केबिनमध्ये विश्वासराव गोव्यातून कच्चे लोखंड निर्यात करण्याबाबत बोलत होते. संध्याकाळी चार-पाचची वेळ. दारावर टकटक आवाज करत एक माणूस आत आला व एम.डी.ला भिंतीवरील घड्याळाकडे त्यांचे लक्ष वेधून काही तरी म्हणाला. एम.डी.ने विश्वासरावांना टेलिप्रिंटरने भारतात काही निरोप पाठवायचा आहे का म्हणून विचारले. त्यांनी नाही म्हणून सांगितले व माणूस निघून गेला. थोड्या वेळाने चर्चा संपल्यावर न राहवून आणि कुतूहल म्हणून विश्वासरावांनी एम.डी.ला विचारले की, काही वेळापूर्वी आलेल्या माणसाने घड्याळ दाखविले व आपण माझ्याकडे विचारणा केलीत. यावर तो एम.डी. हसून म्हणाला म्हणाला, "तो आलेला माणूस माझा टेलेक्स ऑपरेटर आहे. सध्या माझे कर्मचारी त्यांच्या मागण्या मान्य होईपर्यंत 'वर्क टू रुल' काम करत आहेत म्हणून त्याने माझे घड्याळाकडे लक्ष वेधून सांगितले की, लवकरच त्याच्या कामाची वेळ संपणार असून, त्याअगोदर तुमचा काही निरोप भारतात पाठवायचा असल्यास तो पाठवूनच तो घरी जाऊ इच्छितो."

तो एम.डी. पुढे आपल्या कर्मचाऱ्याबद्दल आणखी काही सांगत होता आणि इकडे मालकाशी झगडतानाही कंपनीचे व मालकाचे नुकसान होऊ नये, म्हणून काळजी घेणाऱ्या टेलेक्स ऑपरेटरच्या कृत्याने भारावलेले विश्वासराव डोळ्यातून ओघळणारे अश्रू थोपवण्याचा प्रयत्न करत होते!

**गोविंद काजरोळकर**, पुणे.


## जोडीदार पाहिजे

वय ३४, उंची ५ फूट ८ इंच, प्रसन्न व्यक्तिमत्त्व, गव्हाळ रंग. शिक्षण एम एस सी केमिस्ट्री, ज्युनियर कॉलेजवर शिक्षक, स्वतःचे कोचिंग क्लासेस, शेतीही करतो. मुलाला वाचण्या-लिहिण्याची आवड आहे. लोकसत्ता, साधना, ॲग्रोवन, पुणे आकाशवाणी केंद्रावरून मुलाच्या लिखानाचे अभिवाचन प्रक्षेपित, तसेच विविध दिवाळी अंकांमधून मुलाचे लेखन प्रसिद्ध झाले आहे. अशा या स्वाभिमानी, निर्व्यसनी मुलासाठी अनुरूप जोडीदार हवा आहे. जातीची अट नाही. संपर्क मोबा. 9403186119/8208218308

सेवाग्राम कलेक्टिव्ह आणि साधना प्रकाशन यांचा संयुक्त प्रकल्प

तीन खंडांचा संच ९०० रुपये
पोस्टाने हवे असल्यास १०५० रुपये

# गांधींविषयी

संच २५ जानेवारी २०२२
पासून उपलब्ध

संपादक मंडळ

**किशोर बेडकिहाळ, अशोक चौसाळकर, रमेश ओझा, सुगन बरंठ, रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ, प्रदीप खेलुरकर, विजय तांबे**



खंड १

**गांधी : जीवन आणि कार्य**
संपादक : किशोर बेडकिहाळ
(२४ लेख, पृष्ठे ५५०,
किंमत ५५० रुपये)



खंड २

**गांधीविचार आणि समकालीन विचारविश्व**
संपादक : अशोक चौसाळकर
(३२ लेख, पृष्ठे ४५०,
किंमत ४५० रुपये)



खंड ३

**गांधी : खुर्द आणि बुद्रुक**
संपादक : रमेश ओझा
(२० लेख, पृष्ठे ३००,
किंमत ३५० रुपये)

या तीन खंडांमध्ये मिळून ७६ लेख आहेत, ते साधना, नवभारत, समाजप्रबोधन पत्रिका, गांधीमार्ग इत्यादी नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत किंवा वेगवेगळ्या पुस्तकांतून घेतलेले आहेत. १९१५ ते २०१५ या शंभर वर्षांत लिहिले गेलेले हे लेख पुढील ४३ लेखकांचे आहेत (अर्थातच काहींचे लेख एकापेक्षा अधिक आहेत)

लोकमान्य टिळक, रवींद्रनाथ टागोर, जवाहरलाल नेहरू, आचार्य विनोबा भावे, आचार्य जावडेकर, आचार्य भागवत, आल्डस हक्सले, रावसाहेब पटवर्धन, ना. ग. गोरे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मे. पुं. रेगे, वसंत पळशीकर, नलिनी पंडित, इंदुमती केळकर, अम्लान दत्त, राम जोशी, मधू दंडवते, दि.के. बेडेकर, गं.बा. सरदार, वि.स. खांडेकर, गो.म. कुलकर्णी, कुमार गंधर्व, फक्रुद्दीन बेन्नूर, भगवंत क्षीरसागर, नरहर कुरुंदकर, पन्नालाल सुराणा, नरेंद्र चपळगावकर, सुरेश द्वादशीवार, सु. श्री. पांढरीपांडे, गणेश देवी, रामदास भटकळ, यशवंत सुमंत, अशोक चौसाळकर, किशोर बेडकिहाळ, प्रभाकर नानावटी, रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ, पराग चोळकर, भारती पाटील, राजेश्वरी देशपांडे, चैत्रा रेडकर, नीलकंठ लोखंडे, माधव चोले, श्याम पाखरे.

**दर्जेदार निर्मिती व हार्डबाऊंड अशा तिन्ही खंडांची** एकूण किंमत **१३५० रुपये**
प्रकाशनपूर्व सवलतीत **९०० रुपये** । पोस्टाने घरपोच हवे असल्यास **१०५० रुपये**

शेजारील QR code स्कॅन करून google pay अथवा phone pay द्वारे रक्कम भरून बुकींग करता येईल.

खालील पत्त्यावर रोख/चेकद्वारे रक्कम पाठवून बुकिंग करा.
**साधना प्रकाशन** 431, शनिवार पेठ, पुणे 411030
sadhana.prakashan@gmail.com
Ph. 020 24459635, Mob.7058286753

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6/31-12-2023
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Regstration No. PCW/080/2021-2023
Posted at PUNE PSO GPO 411001 / Every Monday / Date of Posting: 17-1-2022/ Date of Publication : 17-1-2022

# दोन दशकांनंतर आल्या नव्या आवृत्त्या




## हाजीपीर आणि कांजरकोट

ग. प्र. प्रधान

१९६५च्या २ ऑक्टोबरपासून तीन आठवडे मी भारत-पाक युद्ध-आघाडीवर वार्ताहर म्हणून गेलो होतो. त्या वेळी पंजाब-जम्मू काश्मीरमध्ये आणि युद्ध आघाडीवरील विभागात फिरताना जे पाहिले, ते अनुभव लिहून ठेवावे, असे ठरवले. त्या काळाचा आमच्या सर्वांच्या मनावर जो संस्कार घडला, तो कधी पुसला जाणार नाही. त्यामुळे हे निवेदन प्रसिद्ध करावेसे वाटले. शिवाय हेही नम्रपणाने सांगावेसे वाटते की, मी केवळ वृत्तपत्रीय निवेदन लिहिलेले नाही. साहित्याचा विद्यार्थी असल्यामुळे तत्कालिकाचे अवलोकन करताना मानवी मनाच्या अक्षय भावना दर्शवणारे क्षण टिपण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक व्यक्ती, दृश्ये, घटना आणि संभाषणे अविस्मरणीय वाटली. मनाला लुब्ध करणाऱ्या या गोष्टी वाचकांना सांगाव्या, हाच या निवेदनाचा हेतू.

पृष्ठे १२५, किंमत : १५० रुपये
(ट. ख. वेगळा)




## सोनार बांगला

ग. प्र. प्रधान

१९७१च्या ३ डिसेंबरला भारत-पाक युद्धाला सुरुवात झाली. युद्धकाळात सर्वसामान्य माणसांना नीट भेटता येत नाही. म्हणून युद्ध संपल्यावर २५ डिसेंबरपासून ११ जानेवारीपर्यंत बांगला देशात आम्ही अनेक ठिकाणी फिरलो; अनेकांच्या गाठीभेटी घेतल्या. जे ऐकले व जे पाहिले त्यातून तेथे झालेल्या कत्तलींची व अत्याचारांची भीषणता उमगली. भारतीय जवानांचा पराक्रम, मुक्तिवाहिनीतील सैनिकांचे शौर्य व समर्पण यांच्या स्फूर्तिदायक कथा ऐकल्या. अनेक विचारवंतांच्या व भूमिगत कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेतल्या. या सर्वांतून जीवनातील उदात्तता व भव्यता, क्रूरता व निर्घृणता, मृत्यूची कृष्णछाया आणि नवजीवनाचा प्रकाश यांचे अपूर्व दर्शन मला घडले! त्याच काळात बांगला देशातील विचारवंतांच्या जगात प्रवेश मिळाला, आणि त्यांच्याबरोबर केलेल्या चर्चेतून माझ्या मनातील अनेक प्रश्नांना उत्तरे मिळाली.

पृष्ठे १०८ । किंमत १२५ रुपये
(ट. ख. वेगळा)

संपर्क **साधना प्रकाशन**
**४३१** शनिवार पेठ, पुणे ३०
Ph. 020 24459635 / Mob. 7058286753
sadhana.prakashan@gmail.com

वरील QR कोड स्कॅन करून रक्कम ट्रान्सफर करून साधना प्रकाशनाची पुस्तके मागवता येतील.

also available at amazon.in

इ-बुक स्वरूपात किंडलवर उपलब्ध